म. ग्रं. सं. ठाणें
विषय --चरित्र
ग्रं. क्र. १२७८
१५५८

# शिक्षण – तत्त्ववेत्ते

लेखक
प्रा. ना. द. नांदुर्डीकर,
एम्. ए., बी. टी.
रामनारायण रुइया कॉलेज,
माटुंगा, मुंबई नं. १९.

REFBK-0008218

मूल्य : दोन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ..................
आलं..........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८२१८
दा.

## प्रास्ताविक :

इ. स. १८१८ ते इ. स. १९४७ पर्यंतच्या ब्रिटिश राजवटीमुळें भारतांतील शैक्षणिक जीवनावर फारच मोठा परिणाम झाला आहे. भारतांतील राजवट अबाधित ठेवण्याच्या दृष्टीनें शिक्षणपद्धतीची आंखणी केली जात होती. त्यांतून कोर्ट-कचेऱ्यांतून आवश्यक असलेले कारकूनहि निर्माण व्हावेत असाहि प्रयत्न हेतुतः केला जात असे.

इ. स. १८५४ पासून तों थेट १९३५ पर्यंत नेमलेल्या सर्व शिक्षणसमित्यांनीं वेळोवेळीं सत्ताधाऱ्यांना कानपिचक्या देऊन सुद्धां आर्थिक तुटवड्याच्या नांवाखालीं ब्रिटिशांनीं म्हणण्यासारखी सुधारणा शिक्षणक्षेत्रांत कधींच केली नाहीं. इंग्रजांनीं निर्माण केलेल्या ह्या शिक्षणानें प्रथम नोकऱ्या मिळत असल्यामुळें सुरुवातीला त्या शिक्षणव्यवस्थेबद्दल मनस्वी आदर निर्माण झाला होता. इंग्रजी पद्धतींतून आत्मोद्धाराकरितां निर्माण झालेली ती शिक्षणपद्धति होती असें अनेकांना वाटत असे. त्यामुळें इंग्लंडमधील शिक्षण-व्यवस्था आणि शिक्षण-पद्धति प्रगतिपथावर द्रुत गतीनें जात असतांना सुद्धां आमचेकडील शिक्षण-पद्धति संपूर्णपणें मागासलेली आहे, ह्याची जाणीव फारच थोड्या अग्रणींना होती. आणि त्यांतहि प्रत्यक्ष शैक्षणिक प्रयोग अद्ययावत् शैक्षणिक तत्त्वप्रणालींना अनुसरून शैक्षणिक क्रांतींना हातभार लावण्याचें कार्य फारच थोड्या शिक्षणमहर्षींनीं केलें.

नवीन शिक्षणविषयक कल्पनांना, भारतांत तरी राष्ट्रीय सभेच्या निर्मिती-नंतरच सुरुवात झाली. तरुणांना स्वातंत्र्य-संग्रामांत सामील कसें करवून घेतां येईल व स्वार्थांध होण्याऐवजीं ह्या कार्याकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करा-वयास त्याला कसें उद्युक्त करतां येईल, या विवंचनेंतूनच राष्ट्रीय शिक्षणाच्या

महत्त्वाकांक्षेचा जन्म झाला. ह्या राष्ट्रीय शिक्षणाच्या महायज्ञांत अनेक महर्षि भाग घेत होते. त्यांपैकीं कांहीं महर्षींचा परिचय आणि त्यांच्या शिक्षणविषयक कामगिरींचा अभ्यास आजच्या शिक्षणपद्धतींत परिवर्तन होत असतांना केला जाणें अत्यंत आवश्यक आहे.

प्रातिनिधिक दर्शन घडावें म्हणून शिक्षणक्षेत्रांतील निरनिराळ्या विभागांतील एक एक शिक्षणवेत्ता आणि त्याचें कार्य यांचीच निवड केली आहे. त्या दृष्टीनें प्राथमिक शिक्षण आणि मूलोद्योगांचा महान् प्रयोग म्हणजे महात्माजींचें स्मरण अपरिहार्य. दुय्यम शिक्षण व विश्वविद्यालयीन शिक्षण-व्यवस्थेंतील क्रांति म्हणजे महर्षि टागोर आणि पंडित मालवीयजी यांना वंदन करणें अनिवार्य! धार्मिक शिक्षण देणारीं आणि प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य करणारीं विद्यापीठें स्वातंत्र्यपूर्व कालांत तर थोडींच होतीं, म्हणून बनारस विद्यापीठाचाच विचार अटळ ठरतो!

स्त्री-शिक्षणाचा निराळा दृष्टिकोन आणि केवळ महिलांसाठींच विद्यापीठ म्हणून महर्षि अण्णासाहेब कर्वे व 'कर्वे विद्यापीठ' याबद्दल माहिती मिळविणें आवश्यकच ठरतें. वरील सर्व क्षेत्रांत भरीव कामगिरी करून दाखविणारे प्रयोग भारतवासीयांनीं केले आहेत; परंतु आपल्यापैकीं फारच थोड्यांचें लक्ष 'पूर्व प्राथमिक' शिक्षणाकडे जाऊं शकलें, आणि त्यांतहि आपलें स्वत्व कायम ठेवून प्रयोग करणारा एकहि 'महर्षि' निर्माण झाला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. अजूनहि सरकारी शाळाखातें आणि नगरपालिका पूर्व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था स्वीकारीत नाहीं.

जन्मानें आपल्यापैकीं नसल्या तरी तत्त्वज्ञानानें आणि सेवेनें जवळ जवळ आपल्यापैकीं ठरणाऱ्या 'मादाम मॉंटेसरी'चें कार्य भारतांत पुष्कळच मूळ धरून राहिलेलें आहे. भारतांत 'किंडर गार्टन' पद्धतीपेक्षां 'मॉंटेसरी' पद्धतच जास्त लोकप्रिय झालेली आहे. त्याचें मुख्य कारण म्हणजे ह्या बाई इ. सन १९३९ पासून पुढें त्यांना मृत्यु येईपर्यंत भारतांतच राहिल्या होत्या हें होय. त्या स्वतः आपल्या पद्धतीचें प्रात्यक्षिक देत असल्यानें ती पद्धत हाताळण्यास लागणारा आत्मविश्वास आपल्या शिक्षिकांच्या ठिकाणीं आला हेंहि कारण आहे. परंतु भारताला त्यांची विशेष देणगी म्हणजे तीन ते सहा

वर्षांच्या मुलांच्या वाढीला फार हळुवार हातानें मदत केली पाहिजे ह्याची त्यांनीं दिलेली शिकवण होय. त्यामुळेंच त्यांची योजना येथें करावी लागली आहे.

राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणक्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याची प्रांता-प्रांतांत आज अहमहमिका लागली आहे. त्या दृष्टीनें आजच्या विद्यार्थ्याला ह्या सर्व परिवर्तनाचें डोळस परिशीलन करतां यावें, निदान सहानुभूतीनें आकलन तरी करवून घेतां यावें हाच उद्देश प्रस्तुत परिचय करवून देण्याच्या बुडाशीं आहे. ह्या पांचहि शिक्षणवेत्त्यांनीं निरनिराळ्या क्षेत्रांतील क्रांति-कारक परिवर्तनाच्या दिशा दाखवून दिल्या आहेत.

आज कोणताहि बदल केला जात असतांना ह्यांचें ऋण मान्य केल्या-शिवाय आपणांस संपूर्णपणें भारताची अशी शिक्षणपद्धति निर्माण करतां येणें कटीणच आहे. त्या दृष्टीनेंहि ह्यांच्या तत्त्वप्रणालींचा अगदीं प्राथमिक परिचय करून घेतला जाणें इष्टच आहे. तसा तो होतो आहे, असें वाटल्यास हेतु साध्य झाल्याचा आनंद मिळेल !

प्रस्तुत परिचय पूर्ण करवून घेण्याचें श्रेय श्री. न. शं. कुलकर्णी यांनाच द्यावें लागेल. योजना त्यांचीच आणि चिकाटी त्यांचीच. नाहींतर आतांपर्यंत लेखनाचें धाष्ट्र्य न करणारा असा मी; ह्या प्रांतांत शिरण्याचा धीटपणा मीं केला असताच असें मला वाटत नाहीं.


पुस्तकाची सजावट मार्मिक आणि आकर्षक करण्याचें सर्व श्रेय चित्रकार श्री. भय्यासाहेब ओंकार ह्यांचेंच आहे. त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. तसेंच मुद्रितें तपासणें आणि आवश्यक तेथें योग्य सूचना करणें याबद्दल मी माझे स्नेही श्री. गोपाळराव पोहेकर यांचाहि अत्यंत आभारी आहें.

१४ देवेंद्र चेंबर्स, लेडी जमशेटजी रोड,
मुंबई नं. १४. दिनांक १-२-१९५४

— ना. द. नांदुर्डीकर

# अ नु क्र म


| | | | |
|---|---|---|---|
| १. मादाम मॉटेसरी | ... | ... | ७ |
| २. महात्मा गांधी | ... | ... | २४ |
| ३. महर्षि अण्णासाहेब कर्वे | ... | ... | ४१ |
| ४. पंडित मदन मोहन मालवीय | | ... | ५८ |
| ५. रवीन्द्रनाथ ठाकोर | ... | ... | ७८ |



# १ ☆ ☆ मादाम मॉंटेसरी

## मादाम मॉंटेसरींचा प्रथम परिचय

१८९६ सालची गोष्ट. टुरिनला शिक्षण-परिषद् भरली होती. शिक्षणविषयक अनेक प्रश्नांची चर्चा सकाळ-संध्याकाळ चालू होती. परिषद् अशी तीनच दिवस चालू होती. पण तिसऱ्या दिवशीं मात्र सर्वांना धक्का बसणारी गोष्ट घडली. ऑस्ट्रियाच्या राणीचा खून आणि तोहि इटालियन तरुणानें केला होता! त्यामुळेंच या परिषदेंतील शिक्षणवेत्त्यांना ह्या घटनेचा विचार करावा लागला. ह्या समाज दुष्ट-प्रवृत्ति कशा निर्माण होतात आणि शिक्षणानें या प्रवृत्तींना आळा घातला जाणें शक्य आहे काय, ह्याचा विचार चालू असतांना इटलींतील मोठमोठे शिक्षणतज्ज्ञ आपापले मुद्दे मांडीत होते. पण नवीन प्रकाश पाडण्यास कोणीच समर्थ नव्हतें. तेवढ्यांत 'अध्यक्षमहाराज, मला बोलावयाचें आहे' अशी एक तरुणी विनंति करीत आली. सव्वीस-सत्तावीस वर्षांची ही तरुणी येवढ्या अवघड विषयावर काय बोलणार म्हणून जो तो पाहूं लागला. ती तरुणी म्हणजे मॉंटेसरीच होती. जेव्हां गुन्हा, गुन्हेगारीची प्रवृत्ति,

त्याचा समाज-परिस्थितीशीं आणि शिक्षण-व्यवस्थेशीं असलेला संबंध ह्यावर बाईनें विदारक प्रकाश टाकला, तेव्हां मात्र मी मी म्हणणाऱ्यांच्या माना विनम्र झाल्या आणि मादाम मॉंटेसरीनें सभा तर जिंकलीच, पण रोमहि जिंकलें. रोममधील शिक्षणवेत्त्यांत तिची गणना होऊं लागली आणि इटली-बाहेरहि बाईचें नांव प्रसिद्धि पावलें.

## रोममधील पहिली स्त्री–डॉक्टर

टुरिनमध्यें धीटपणें नवीन विचार मांडणारी ही बाई इ. स. १८९४ मध्यें रोम विद्यापीठाची एम्. डी. ( डॉक्टर ऑफ् मेडिसिन ) ही पदवी घेऊन पहिली स्त्री-डॉक्टर झाली होती. त्या वेळची इटलीमधील परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे मॉंटेसरींचा विक्रम नीटपणें लक्षांत येईल. एकतर मॉंटेसरी बाईंनीं अगदीं गरीब घराण्यांत जन्मास येण्याचें पाप केलें होतें आणि दुसरें म्हणजे त्या वेळची इटली फारच मागासलेला असल्यानें सामाजिक विरोध सहन करण्याचें पण तिच्या नशिवीं लिहिलें होतें. त्यामुळें सामाजिक विरोधांना न जुमानतां, दारिद्र्याशीं लढत लढत पदवीधर होण्याकरितां काय मानसिक यातना सहन कराव्या लागल्या असतील ह्याची कल्पनाच केलेली बरी !

## पदवीनंतर

इतक्या त्रासानें आणि धैर्यानें डॉक्टर झाल्यानंतर प्रवाहपतितांप्रमाणें पैसा मिळविण्याच्या ध्येयानें धंदा करीत न बसतां ‘ मानसोपचार ’ करणाऱ्या एका संस्थेंत बाई सेवा करूं लागल्या. त्या वेळीं मानस-शास्त्राबद्दलचें ज्ञान अपूर्व असल्यानें इटलींत वेड्या लोकांबरोबरच ‘ अर्धवट ( Idiot ) ’ लोकांचा समावेश केला जात असे. वेड्यांच्या इस्पितळांना भेट देत असतांना त्यांच्यामध्येंच अजाणपणें ठेवलेल्या कमकुवत मनाच्या मुलांकडे ( Deficient Children ) बाईचें लक्ष वेधलें. आतांपर्यंत शिक्षणशास्त्राकडे लक्ष द्यावें लागेल असें त्या बाईंना स्वप्नांत सुद्धां वाटलें नव्हतें. त्यामुळें शिक्षणविषयक तंत्राचा वा पद्धतींचा त्यांनीं अभ्यासहि केलेला नव्हता. पण ही गोष्ट त्यांच्या फायद्याचीच ठरली. कारण त्यामुळेंच कमकुवत मनाच्या व नंतर सर्वसाधारण मुलांच्या विकासाच्या प्रश्नाकडे त्या संपूर्णपणें निर्लेप मनानें पाहूं शकल्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर


सर्व वैद्यकीय व्यवसाय सोडून व मेडिकल कॉलेजांतील सहाध्यायाची स्थान करून बाईनें कमकुवत मनाच्या मुलांच्या संस्थेंत 'संचालक' म्हणून कार्य करण्याचें पत्करलें. आपला शांत स्वभाव आणि अमर्याद इच्छाशक्ति ह्यांच्या जोरावर अत्यंत विरोधी परिस्थितीशीं झगडा देऊन त्यांनीं हा महान् प्रयोग चालविला. तीन चार वर्षें रात्रंदिवस ह्या कमनशिबी मुलांच्या सहवासांत राहून भकास आणि दरिद्री अशा त्या मुलांच्या मेंदूंत स्वतःच्या व्युत्पन्नतेनें आणि सतत परिश्रमानें माँटेसरीबाई जीवनामृत ओतीत होत्या. त्या अर्धवट वेड्या मुलांनीं निर्माण केलेल्या साध्या आणि भाबड्या प्रश्नांची गुंतागुंत उकलण्यांत त्यांना कलावंताचा आनंद मिळूं लागला. दिवसाचे सर्व तास अशा रीतीनें त्यांचीं मनें विकसित करण्याच्या प्रयत्नांत जात. थकलेली मादाम माँटेसरी रात्रीं मात्र विश्रांति न घेतां दिवसाच्या कार्याचा आढावा घेण्यांत घालवी. दिवसा केलेल्या निरीक्षणाची नोंद करणें, जुन्या शिक्षणवेत्त्यांनीं व मानसशास्त्रज्ञांनीं सांगितलेल्या गोष्टींचा पडताळा पाहणें, मुलांच्या प्रतिक्रियेचें वर्गीकरण करणें आणि त्यामुळें अप्रवुद्ध वा निर्बुद्ध मुलांच्या विकासाला कशी मदत करतां येईल ह्याचें तंत्र ठरविणें हा नित्याचा क्रम होऊन बसला होता.

## प्रथम प्रकट यश

मुलांच्या रोजच्या खेळण्याचा, खेळावयास दिलेल्या वस्तूंचा, त्यांचा त्यांनीं करून घेतलेल्या उपयोगाचा, त्यामुळें इंद्रियद्वारां होणाऱ्या त्यांच्या विकासाचा इत्यादींचें रोज निरीक्षण करीत असतांना एक दिवस मोठी गंमत बाईंच्या या मुलांच्या शाळेंत झाली. बाईच्या देखरेखीखालीं इतरांच्या कल्पनेप्रमाणें 'अर्धवट ( Idiot )' असलेला एक मुलगा बाईकडे आला. मादाम माँटेसरींनीं प्रयोगादाखल निवडलेल्या खेळांच्या पद्धतीनें व शोधलेल्या 'खेळण्यां'-च्या मदतीनें त्याला शिकवून तयार केला. त्याला नामांकित अशा एका मोठ्या शाळेच्या प्रवेश-परीक्षेला बसविला; आणि काय आश्चर्य ! इतर सुजाण मुलांच्यापेक्षां माँटेसरीबाईंच्या ह्या शिष्यानें जास्त गुण मिळविले. पुनः दुसऱ्या अर्धवट मुलाला हाताशीं धरला. तोहि शहाण्या मुलांशीं चढाओढ करून पहिला आला. आणि मग तर हा नित्यक्रमच होऊन बसला. बाईंनीं अर्धवट समजल्या जाणाऱ्या मुलांना आपल्या नवीन पद्धतीनें शिकवावें व तीं

मुलें इतर मुलांच्या तुलनेंत सरस ठरावींत. ह्याचा परिणाम असा झाला कीं, बाईंचें वैद्यकीवरचें लक्ष पार उडालें ! पण आतां केवळ 'वेडचा', 'अर्धवट' अशा मुलांच्या विकासाकडेच लक्ष देण्याऐवजीं सर्व लहान बालकांच्या विकासाच्या व्यापक प्रश्नाकडे लक्ष द्यावें अशी प्रेरणा बाईंना सहजच झाली.

## मानसशास्त्राचा सखोल अभ्यास

आतांपर्यंतचा सर्व प्रयोग हा मानसशास्त्राचा विशेष रीतसर अभ्यास न करतांना झालेला होता. त्यामुळें जास्त मोठी आकांक्षा झाल्याबरोबर बाईंना आपल्या तोकडचा ज्ञानाची जाणीव झाली. पण तेथेंच तो प्रयोग सोडून न देतां मादामनें पुनः विद्यापीठांत विद्यार्थी म्हणून नांव घातलें आणि तरुण विद्यार्थ्यांच्या चिकाटीनें अर्ध तपापेक्षां जास्त तपश्चर्या करून प्रायोगिक मानसशास्त्राचा सखोल अभ्यास केला. त्यांतहि बालमनाच्या अभ्यासांत त्यांनीं विशेष प्रावीण्य संपादन केलें. त्या वेळच्या शिक्षणतज्ज्ञांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करवून घेण्याकरितां बाईंनीं प्राथमिक शाळांना भेटी देण्याचा सपाटा चालविला. त्यांचा 'कायाकल्प' झालेला असल्यानें आतां जुन्या आणि सनातनी शिक्षणपद्धतींतील दोष आणि अत्याचार बाईंना सुस्पष्ट दिसूं लागले.

## त्या वेळच्या इटलींतील प्राथमिक शाळा

मादाम मॉंटेसरींनीं त्या वेळच्या शाळांचें केलेलें वर्णन त्यांच्याच शब्दांत वाचणें खरोखरीच मनोरंजक होईल. " जेथें जावें तेथें फुलपांखरांना जणूं कांहीं टांचण्या टोचून लावून ठेवल्याप्रमाणें लहान मुलांच्या हालचाल न करणाऱ्या 'हारी' जुनाट आणि अवजड व 'स्थितप्रज्ञ' फर्निचरवर बसलेल्या आहेत, त्यांचा हावभाव करण्याचा, बोलण्याचा, चालण्याचा, नाचण्याचा निसर्गदत्त हक्क हिरावून घेतला आहे, आणि दमलेला भागलेला आणि फोनोला किल्ली दिल्याप्रमाणें सतत घसा फोडणारे शिक्षक असें दृश्य दिसत असे. बटाटयांची जोपासना करणारा व त्यावरची कीड नाहींशी कशी होईल याविषयीं चिंता करणारा शास्त्रज्ञ सुद्धां दिवसभर बटाटयांना दुर्बिणी-खालीं ठेवून, त्यांचें निरीक्षण करून मगच बटाटयांची वाढ कशी करतां येईल ह्याविषयीं निर्णय घेतो. परंतु येथें मात्र तळघरांतच " बटाटयांची "

वाढ होत असलेली दिसली. ' बटाटे ' वाढत होते ते नाइलाजानें! कारण निसर्गाचा नियमच त्यांना ' अंकुरित ' करीत होता. मुलांची इच्छाशक्ति त्या अंकुरांना बाहेर ढकलीत होती. पण ते फिकट, निस्तेज, अंकुर बघून अंत:करण पिळवटून निघत होतें ! " निरनिराळ्या शाळांना भेट देण्याचा हा कार्यक्रम चालू असतांनाच ' मादाम ' या विषयावरचे मिळतील तेवढे सर्व ग्रंथ वाचून हातावेगळे करीत होती. त्या ग्रंथांतून चांगलें कांहीं मिळण्या-ऐवजीं बाईंच्या पदरीं निराशाच पडत होती.

## विचित्र योगायोग !

' मादाम ' अशा रीतीनें ' अर्धवट ' मुलांच्या निरीक्षणांतून सर्वसाधारण मुलांच्या विकासाला—वाढीला—मदत कशी करतां येईल ह्याचा विचार करीत असतांनाच, इटलींत—मूर्तिमंत दारिद्र्य नांदत असलेल्या या देशांत—आणखी एक महान् प्रयोग चालू होता. रोम हें राजधानीचें शहरहि बरेंच मागासलेलें होतें. गरिबांच्या राहणीचा प्रश्न तर विराट स्वरूप धारण करून होता. गलिच्छ वस्ती, बुरसटलेल्या समजुती आणि त्यांचे ते उकिरडे. गरीब लोकांच्या अशा राहणींत सुधारणा करण्याचा प्रयत्न ' सिनॉर टॅलामो ' नांवाचा एक कळकळीचा समाज-सेवक करीत होता. तो प्रश्न त्यानें यशस्वीरीत्या हाताळला होता. या गरीब लोकांच्या वसतीकरितां सामाजिक व सामुदायिक इमारती बांधून त्यांत स्वच्छतेची पराकाष्ठा करून त्यानें क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणलें होतें. पण एक प्रश्न मात्र 'आ' वांसून त्याला भेडसावीत होता.

रोजगारावर जाणाऱ्या ह्या कामगारांचीं मुलें शाळेची व्यवस्था नसल्यानें आई-बाप रोजगारावर गेलीं कीं ' उघडीं ' पडत. हीं लहान बालकें त्या मोठमोठ्या खोल्यांमधून, जिन्यावर, गॅलरींतून वाटेल तो खेळ खेळत असत. भिंतीचे पोपडे पाडणें, जमिनी खणून काढणें, जिन्यांच्या पायऱ्यांची नासधूस करणें वगैरे चाळे तीं अगदीं नियमानें करीत असत. इमारतीची सतत दुरुस्ती करणें हें खर्चाचें होऊन बसलें. इमारतीचा नाशच करूं दिला नाहीं तर हा खर्च वांचेल. पण तें करूं शक्य आहे ? मुलांनीं तसें करूं नये म्हणून काय करतां येईल ? तेव्हां सिनॉर टॅलामोनें एक सोपी युक्ति काढली. सर्व

इमारत खराब होण्यापेक्षां एखादी मोठी खोलीच मुलांच्या स्वाधीन करावी, म्हणून त्यानें प्रत्येक इमारतींत अशा मुलांच्या दांडगाईकरितां एक ' मुलांची खोली ' म्हणून मोकळी ठेवण्याचा उपक्रम सुरू केला. पण त्यामुळें एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला ! ह्या मुलांच्यावर ' देखरेख ' कोणीं करावयाची? योगच तसा विलक्षण म्हणून ' सिनॉर 'ला मादाम मॉंटेसरीची आठवण झाली. त्यांनीं ह्या सर्व मुलांच्यावर देखरेख करण्याची विनंति बाईंना केली. मॉंटेसरीबाईचें आंतडें तर मुलांच्या करतां तुटतच होतें. त्यांनीं तावडतीब ती व्यवस्था हाताशीं घेतली. सिनॉर टॅलामोच्या कल्पनेशीं एकजीव झाल्यामुळें मादाम मॉंटेसरींच्या कल्पनांना निश्चित स्वरूप प्राप्त होऊन ' मॉंटेसरी पद्धत ' बाळसेदार होऊं लागली. अशी संधि मिळाली नसती तर ' शिशुमंदिर ' आज आहे त्या स्थितींत असतेंच असें नाहीं. म्हणूनच ह्या विचित्र योगायोगाचें महत्त्व आहे !

## पहिलें शिशुमंदिर

कामगार-आईबापांच्या मुलांची देखरेख करण्याच्या प्रयत्नांतूनच मॉंटेसरी पद्धतीचें पहिलें ' शिशुविहार ' ६ जानेवारी इ. स. १९०७ मध्यें स्थापन केलें गेलें. पहिल्या शिशुकेंद्राचें हें घवघवीत यश बघून इ. स. १९०८ मध्यें दुसरें ' शिशुविहार ' उघडलें गेलें. इ. स. १९०७ मध्यें सुरू झालेल्या ह्या महान् प्रयोगाची बातमी हां हां म्हणतां पसरली आणि इ. स. १९०९ पर्यंत मादाम मॉंटेसरींचें हें ' शिशुविहार ' पाहण्याकरितां, त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष प्रयोग अभ्यासण्याकरितां देशोदेशींचे शिक्षणतज्ज्ञ ' तीर्थांना भेट देतात ' त्या आत्मीयतेनें रोम शहरांत गर्दी करून ह्या घाणेरड्या वस्तींत पायधूळ झाडूं लागले. इ. स. १९१२ पर्यंत मादाम मॉंटेसरीबाई जगद्विख्यात होऊन शिक्षणक्षेत्रांतील एक अत्यंत अभिनव आणि उपयुक्त योजना म्हणून त्यांच्या या योजनेचा स्वीकार केला गेला.

## भारतांत आगमन, सेवा आणि मृत्यु

भारतांतील शिक्षणतज्ज्ञांचें लक्ष मॉंटेसरीबाईंच्या ह्या प्रयोगाकडे वेधलें होतेंच. परंतु प्रात्यक्षिक बघण्याचें भाग्य अर्थातच कोणाच्याहि नशिबीं नव्हतें.

मॉंटेसरीबाईचें लक्ष महात्मा गांधींच्या विशाल चळवळीमुळें, आणि रवीन्द्रांच्या काव्यामुळें भारताकडे होतें! भारतांतील दारिद्रय आणि अज्ञान ह्यांची कल्पना मादामना असल्यामुळें भारताच्या सर्वांगीण उन्नतीची व स्वातंत्र्याच्या महान् लढ्याची नीट कल्पना यावी आणि इटली देशासारखीच स्थिति असलेल्या या देशांत जाऊन तेथील ' दरिद्री नारायणा 'ची सेवा करावी असें बाईना नेहमींच वाटत होतें. त्यामुळें इ. स. १९३४ पासून बाई भारतांत येणार, येणार अशा बातम्या पसरत होत्या. भारतांतील शिक्षण-तज्ज्ञ त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. पण बाईंच्या भेटीचा योग इ. स. १९३९ पर्यंत येऊं शकला नाहीं. इ. स. १९३९ च्या नोव्हेंबर महिन्यांत मद्रास शहरीं मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचें शिक्षण देण्याकरितां बाईंनीं स्वत: ' शिक्षणवर्ग ' चालविला. त्याकरितां ३१५ शिक्षक आणि शिक्षिकांची निवड केलीं गेली होती. इ. स. १९४० सालीं त्यांनीं मुंबईला प्रथम भेट दिली. तेथून पुढें मादाम मॉंटेसरींना दुसऱ्या महायुद्धाची झळ लागल्यानें ब्रिटिश सत्तेच्या कृपेला (?) बळी पडावें लागलें. ब्रिटिशविरोधी गटांत सामील होऊन इटली लढत असल्यानें भारतांतील सर्व इटालियन रहिवाश्यांना ' स्थानबद्ध ' करण्यांत आलें होतें. त्यांत मादामनाहि स्थानबद्ध करण्यांत आलें. त्यांचीं शांततावादी मतें, झोटिंगशाहीला त्यांनीं केलेला विरोध, येवढेंच नव्हे तर ' विश्वशांती 'ची त्यांची तळमळ यांपैकीं कोणत्याच गोष्टीपासून बोध न घेतां ब्रिटिश सरकारच्या ' लाल फिती 'नें त्यांचा असा सत्कार केला. पण भारताला मात्र ती इष्टापत्तीच होती. युद्ध संपल्यावर येथील वास्तव्याचा पुरेपूर फायदा बाईंना घेतां आला. वृद्धावस्थेंत सुद्धां सर्व देशभर हिंडून बाई आपल्या पद्धतीचा अर्थ समजावून देत होत्या. बालमनाचें संगोपन आणि विकास करीत करीतच त्यांनीं इ. स. १९४८ मध्यें भारताच्या भूमीवर आपली इहलोकींची यात्रा संपविली. भारतवासीयांशीं त्या इतक्या समरस झाल्या होत्या कीं, शेवटीं शेवटीं त्या परदेशीय आहेत हें सांगून सुद्धां कित्येकांना खरें वाटत नव्हतें. त्यांच्या नऊ-दहा वर्षांच्या वास्तव्याचा चिरंतन टिकणारा ठसा भारतीय शिक्षणपद्धतीवर उठलेला आहे. त्यांनींच भारतांत रस्त्यावर उघडीं पडलेलीं बालकें महात्मा एकनाथांसारखीं कडेवर उचलून त्यांची

शिशुमंदिरांत स्थापना केली. नाहीतर भारतांतील ही संपत्ति अजूनहि धुळींत उकिरड्यावर लोळत पडली असती. म्हणूनच राष्ट्रीय पुनर्निर्मितीच्या कार्यांत 'ॲनी बेझंट' सारखेंच श्रेय ह्या बाईंना पण द्यावें लागेल.

## 'माँटेसरी–पूर्व' बालोद्यान 'Kindergarten'

तीन ते सहा वयाच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रयत्न माँटेसरीबाईंच्या पूर्वी जर्मनींत झालेला होता. त्या पद्धतीवर चालणारीं 'बालोद्यानें' भारतांत तुरळक तुरळक स्वरूपांत चालविलीं जात होतीं, पण त्यांना एवढें मोठें स्वरूप कधींच प्राप्त झालें नव्हतें. आज सुद्धां 'किंडरगार्टन' शाळा चालू आहेतच. पण माँटेसरींची लोकप्रियता लक्षांत घेतां 'किंडरगार्टन' शाळा त्यांच्या पासंगालाहि पुरणार नाहींत इतक्या थोड्या आहेत.

माँटेसरी शाळा इ. स. १९०७ मध्यें सुरू झाली, तर किंडरगार्टन अथवा बालोद्यान हें इ. स. १८३७ मध्यें सुरू झालें होतें. त्याचा प्रवर्तक हा एक जर्मन शिक्षण-तज्ज्ञ होता. त्याचें नांव फ्रॉबेल. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना शिकवीत असतांना तेथें येणाऱ्या मुलांची स्थिति बघून त्यानें हा प्रयोग केला होता. प्राथमिक शाळेंत येणाऱ्या मुलांची तयारी अगदींच तोकडी असे. शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या विषयांचें आकलन नीट करवून घेतां येणें या मुलांना अशक्यच असे. शाळेंत नांव घालण्याइतकें वय होईतों मुलांच्याकडे कोणीच लक्ष देत नसत. त्याचा स्वतःचा मुलांच्या सुसंवादी आणि सुसूत्र विकासावर भर असल्यानें तर त्याला समाजाच्या ह्या कृत्याची फारच चीड येई.

त्याच्या ह्या प्रयत्नांतूनच त्यानें इ. स. १८२५ मध्यें त्याची शिक्षणविषयक कल्पना 'मानवाचें शिक्षण' ह्या प्रबंधांतून स्पष्ट केली होती. पुढें पुढें तर त्यानें 'अनाथालय'च चालवावयास घेतलें होतें. ह्याच 'अनाथालया'च्या अनुभवांतून त्याला 'बालोद्याना'ची कल्पना स्फुरली होती. सहा वर्षांपूर्वींचीं हीं बालकें रस्त्यावर पडूं देण्यापेक्षां त्यांना रमण्यास योग्य असें 'उद्यान'च निर्माण करण्याच्या कल्पनेमुळें त्याला निराळेंच स्फुरण चढलें. तसेंच, तीं बालकें रमावींत म्हणून त्यानें त्यांच्याकरितां खेळ आणि साधनें शोधिलीं होतीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........
क्रमांक ........ मादाम मॉटेसरी
वि: ........

या सर्व पद्धतीचा प्रचार त्यानें इ. स. १८३७ ते १[illegible] कालापर्यंत सर्व युरोपभर केला होता. त्याकरितां लेख व व्याख्यानें ह्यांचा धूमधडाका सुरू ठेवला होता.

त्याची पद्धति लोकप्रिय झाली तरी त्याची पहिली शाळा मात्र टिकेल असें वाटत नव्हतें. कारण त्याला द्रव्यसहाय्य मिळणें मुष्किल झालें होतें. आणि दुष्काळांत तेरावा महिना म्हणूनच कीं काय, त्याला सरकारनें समाजवादाचा पुरस्कर्ता ठरवून त्याची मुस्कुटदाबी केली. त्याला शाळा काढण्यासच प्रतिबंध केला. म्हातारपणीं असा विरोध सहन करणें बिचाऱ्या फ्रॉबेलला शक्य नव्हतें आणि त्यांतच त्याची कंबर खचली, आणि हा दुर्दैवी शिक्षणतज्ज्ञ इ. स. १८६२ मध्यें मृत्यु पावला.

फ्रॉबेलची ही पद्धति मादाम मॉंटेसरींच्या योजनेच्या आधीं जवळजवळ पन्नास वर्षें निर्माण झाली होती. परंतु या तत्त्वज्ञानांत जें 'विश्वऐक्या'चें तत्त्व मूलतत्त्व म्हणून फ्रॉबेलनें स्वीकारलें होतें तें गूढच वाटत असे. आणि लहान मुलांच्या नैसर्गिक वाढीचें स्पष्टीकरण करीत असतांना 'हें तत्त्वज्ञान प्रतीत व्हावें' असा जो आग्रह धरला होता तोहि तसा समजून घेण्यास कठीणच होता. त्या तत्त्वाच्या आहारीं गेल्यामुळें त्याच्या 'खेळण्यांना'सुद्धां तो 'गूढ' अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असे.

प्रा. रॉबर्ट क्विक ( Quick ) हे केंब्रिज विद्यापीठांतील एक मोठे शिक्षणतज्ज्ञ फ्रॉबेलच्या तत्त्वज्ञानाबद्दल लिहितांना म्हणतात, "एखाद्याचें शिक्षणविषयक तत्त्वज्ञान मान्य करण्यापूर्वीं निदान तें समजलें तरी पाहिजे. ही साधी गोष्ट सुद्धां फॉब्रेलचें तत्त्वज्ञान वाचीत असतांना समजणें अशक्य होतें. कांहीं वेळेला तर फ्रॉबेल कोठल्या कोठें वाहवत जातो. जे शब्द आपण वाचीत आहोंत ह्यांना कांहीं गूढ अर्थ आहे का ते निरर्थकच आहेत, हें मला स्वतःला सुद्धां निश्चित सांगतां येत नाहीं." वरील विधानावरून किंडरगार्टन जास्त लोकप्रिय कां होऊं शकलें नाहीं ह्याची कल्पना सहज करतां येईल. मादाम मॉंटेसरीबाईंनीं असें "गुह्यात् गुह्यतम्" कांहीं न आणल्यानें सहजच त्यांना लोकप्रियतेची पराकाष्ठा लाभली. फक्त अमेरिकेंत मात्र 'शिशुविहारा'पेक्षां बालोद्यानांचीच कल्पना जास्त आवडलेली दिसते.

# मॉंटेसरी पद्धतीच्या शिशुविहारांतील दिनचर्या

मादाम मॉंटेसरींबाईच्या तत्त्वप्रणालीचें महत्त्व समजावून घेण्याकरितां आणि वैशिष्टय लक्षांत येण्याकरितां संपूर्णपणें त्यांच्याच देखरेखीखालीं चालत असलेल्या एखाद्या 'शिशुविहारा'स भेट देण्यानें आपला पुष्कळच फायदा होईल. रोममधील अशा एका 'शिशुविहारा'चें डोरोथी फिशर ( Dorothy Fisher ) ह्या अमेरिकन शिक्षिकेनें मोठें मार्मिक व 'चक्षुर्वैसत्यं' वर्णन केलेलें आहे. फारच मनोरंजक आहे म्हणून तें त्या शिक्षिकेच्या शब्दांतच वाचणें बरें.

"मीं शिशुविहारांत जें दृश्य पाहिलें त्याचें प्रामाणिकपणें जसें पाहिलें तसें वर्णन करणार आहें. वाचकांचा विश्वास बसणार नाहीं आणि तो बसणें जरा कठीणच आहे. निदान माझा तरी मीं पाहिलें नसतें तर बसला नसता. मीं दारांत प्रवेश केला तों सुमारें पंचवीस बालकांचा समूह मला दिसला. त्यांपैकीं कांहीं तर तीन वर्षांचींच होतीं. उंच, स्वच्छ आणि हवेशीर अशा एका खोलींत तीं सर्व मुलें इतस्ततः विखुरलीं होतीं. त्या खोलींत कांहीं भागांत चिमुकलीं खुर्च्या-टेबलें विराजमान झालेलीं होतीं, तर बाकीचा भाग तसाच मोकळा पडूं दिलेला दिसत होता.

"तेथें कांहीं बालकें सतरंजीवर बसलेलीं दिसत होतीं. एक मूल तर उताणें पडून हवेंत सायकल चालविण्याच्या स्वप्नांत दंग झालेलें होतें. सर्व खोलींत गोडशी कुजबुज सुरू होती. मी आंत गेल्यानें तीं बालकें इतर शाळेंतील मुलांप्रमाणें बुचकळ्यांत न पडतां आपआपल्या उद्योगांतच गर्क होतीं. ज्यांचें लक्ष मजकडे गेलें त्यांनीं सस्मित वदनानें आणि अगदीं सहजच मला 'नमस्ते' केला. शिक्षिकेनें कोणत्याच मुलाला पुढें ढकलून हस्तांदोलन करावयाची सक्ती केली नाहीं. त्या सर्व वातावरणांत कोणत्याच 'नकार घंटा' वाजवून मुलांच्या बालप्रवृत्तींवर बंदी घातली जात नव्हती असें दिसलें. आपआपल्या खेळांत व उद्योगांत गुंग असलेल्या फुलपांखरांवर 'मुकादमी' कोणीच करीत नव्हतें. इतका वेळ तर शिक्षिकेचें अस्तित्व सुद्धां मला जाणवलें नाहीं.

"नंतर दूर एका कोपऱ्यांत बसलेल्या शिक्षिकेकडे माझें लक्ष गेलें. तिनेंहि मला पाहिलें होतेंच. ती पुढें आली. ती धांदरट दिसत नव्हती वा बावरलेली

किंवा ' भागलेली ' दिसत नव्हती. इतर शिक्षिकांची जशी कींव करावीशी वाटते तसें येथें कांहींच झालें नाहीं. उलट ती इतक्या शांतपणें व आत्मविश्वासानें वावरत होती, कीं तिचा हेवा मात्र करावासा वाटला. दाराजवळ येतांना तिची पाठ वर्गाकडे झाली. पण त्याची तिला खंतच नव्हती. कारण इतर शाळांतील शिक्षिकांप्रमाणें तिला मुलांना डोळ्यांच्या दाबांत ठेवावयाचें नव्हतें. तिकडे सर्व मुलें जणू कांहीं निराळें असें घडलेंच नाहीं या भावनेनें खेळांत व उद्योगांत गुंग होतीं. येवढें त्या खेळांत काय असेल, अशी उत्सुकता साहजिकच माझ्या मनांत निर्माण झाली म्हणून मी जरा पुढें गेलें. ज्या साधनांनीं मुलांना एवढें शिस्तबद्ध करून ठेवलें होतें तीं साधनें व त्यांचा साधेपणा पाहून मला तर मोठा अचंबा वाटला.

" माझ्याच डाव्या हाताला बसलेल्या मुलाकडे मीं पाहिलें. तो एका चौकटीवर बसविलेल्या कापडावरचीं बटणें त्याच्या काजांत घालण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्याच शेजारीं बसलेला मुलगा ठोकळ्यांची उतरंड रचतांना बराच आवाज करीत होता. पण त्यामुळें बटणें अडकविण्याच्या कामांत कोठेंच व्यत्यय येत नव्हता. हें करीत असतांनाच त्याचें आपल्या अंगरख्याकडे लक्ष गेलें. त्यावर असलेलीं बटणें त्याला मनोवेधक वाटलीं. मग तो त्याच बटणाशीं चाळा करूं लागला. हें काम मान मोडून करावें लागत होतें, तरी तो खचला नाहीं. खूप प्रयत्नानंतर त्याला स्वतःच तीं बटणें लावतां आलीं.

" दुसऱ्या बाजूला एक मुलगी तशाच एका चौकटीवर लावलेल्या बंदांच्या गांठी मारण्यांत दंग होती. तिच्या पलीकडे कातडें लावलेल्या एका चौकटीशीं आणखी एक मूल खेळतांना दिसलें. बुटावर असतात तशीं बटणें लावलीं होतीं. तींच नीट घालण्याच्या उपक्रमांत तें सारें देहभान विसरलें होतें. त्यानंतर तें लगेच खालीं वांकलें आणि पायांतल्या बुटांच्या बटणावर आपलें कौशल्य लावून पाहूं लागलें. तेथून पुढें सरकलें तों एक चिमुरडी पोर निरनिराळीं नाणीं घेऊन त्यांच्याशीं खेळत बसली होती. सारख्या आकाराचीं नाणीं निरनिराळी करावीं, त्यांची चळद बनवावी असा तिचा उद्योग चालू होता. तिची न चुकतां सारखीं सारखीं नाणीं वेगळीं काढण्याची कुशाग्रता पाहून मी घटकाभर देहभान विसरलें.

" त्या समाधींतच मी पुढें सरकत होतें. आणि अय्या ! ठेंचाळलें कीं एका दुकलीवरच ! तीं मुलें दहा सारख्याच जाडीच्या चौरस पट्ट्या घेऊन खेळत होतीं. त्यांतली सर्वात छोटी पट्टी ही सर्वांत मोठ्या पट्टीची एक-दशांश होती. त्यांच्यावर तांबडे आणि निळे पट्टे ओढलेले होते. तीं मुलें त्यांच्या लांबीप्रमाणें क्रमाक्रमानें त्या पट्ट्या लावीत होतीं. अंकगणिताचा हा पाठ संपूर्णपणें निराळाच वाटला. तेवढ्यांत माझें लक्ष शिक्षिका एका मुलाच्या डोळ्यांवर रुमाल बांधत होती तिकडे गेलें. आतां हें मूल आंधळी कोशिंबीर खेळणार कीं काय, म्हणून मी उत्सुकतेनें बघूं लागलें. त्याच्यापुढें मखमलीचे, सॅटिनचे, रेशमाचे, लोकरीचे, मांजरपाटाचे असे विविध तुकडे ठेवण्यांत आले, आणि एक एक तुकडा हातांत घेऊन केवळ स्पर्शज्ञानानें कापडाचे प्रकार बरोबर ओळखले गेले.

" तेवढ्यांत मीं शिक्षिकेला विनंति केली, ' कृपा करून मला त्या तांबड्या आणि निळ्या पट्ट्यांचा अर्थ सांगतां का ? तुम्हांला वेळ असला तरच हं ! ' ती शिक्षिका उत्तरली, ' मी मुळींच कामांत नाहीं. मुलांना जरूर लागली तर येतील मला हांका मारायला. चला आपण जाऊं.' त्या शिक्षिकेनें तो खेळ मला समजावून तर सांगितलाच आणि त्यांतूनच मॉंटेसरी शिक्षणपद्धतींतील मोठ्या तत्त्वांचाहि प्रत्यय आणून दिला. तीं तत्त्वें म्हणजे " स्वशिक्षण " आणि " संपूर्ण स्वावलंबन. " इतर वर्गांतील विद्यार्थ्यांप्रमाणें हीं मुलें शिक्षिकेवर मुळींच अवलंबून नव्हतीं. शेजारच्या खोलींत तर आणखी एक गंमत पाहावयास मिळाली. छोटीं टेबलें व्यवस्थित मांडून ठेवलेलीं होतीं. त्यांवर स्वच्छ पांढरी चादर अंथरली होती आणि चार चिमुकल्या मुली शांतपणें दुपारचें भोजन करीत होत्या. ' यांनाच तेवढें आधीं जेवण कां ? ' मीं विचारलें. ' आज त्या सर्व मुलांना जेवावयास वाढणार आहेत. आज त्यांची पाळी आहे. म्हणून त्यांना आधीं जेवावयास बसावें लागतें. ' काय रम्य वातावरण होतें तें ! कशाला हीं बालकें ह्या चिमुकल्या विश्वांत गोंधळ करतील ? एखादा शास्त्रज्ञ जसा त्याच्या प्रयोगाशीं एकरूप झालेला असतो, अगदीं थेट तसेंच हीं बालकें आपल्या खेळांशीं समरूप होतात – असा कांहीं विचार मी करीत असतांनाच मला संगीताचे मधुर स्वर कानावर आले.

" शिक्षिकेनें मुलांना हांक सुद्धां मारली नाहीं. परंतु केवळ अंतःप्रेरणेनेंच सर्व बालकें तिच्या पियानोच्याभोंवतीं हळूहळू जमा झालीं. त्यांतलीं मोठीं मुलें अर्धवर्तुळाकार रांगेंत उभीं राहिलीं. छोट्यांनीं त्यांचें वानर अनुकरण करतात तसें अनुकरण केलें आणि चिमुकल्या सामुदायिक संगीताला सुरुवात झाली. कोठें गडबड नाहीं, गोंधळ नाहीं, सक्ती नाहीं. कसें सर्व विश्रब्ध ! वनदेवतेच्या प्रांतांत मी आहें असेंच मला भासलें. त्या गानसमाधींतून मी जागीं होतांच मला त्या चार छोट्या मुलींची आठवण झाली. मी तिकडे गेलें. त्या हळूहळू सर्व टेबलावर वस्तु आणून ठेवीत होत्या. कांहीं शंका निर्माण झालीं कीं आपआपसांत खल करून जेवण्याचे चमचे, कांटे वगैरे योग्य ठिकाणीं ठेवण्याची खटपट करीत होत्या. मधून मधून नेहमींच्या संवयी-प्रमाणें त्या अडचणींत दिसल्या, कीं त्यांच्यांत जाऊन लुडबुड करण्याचा मोह मला होत असे. थोड्या अवधींतच टेबलावर वीस मुलांच्या भोजनाची तयारी अगदीं चोख केली गेली. मुलें बाहेर क्रीडांगणावर होतीं त्यांना बोलाविण्यांत आलें. सर्व मुलें आपआपल्या जागेवर स्थानापन्न झालीं. पाण्यानें भरलेलीं कांचेचीं भांडीं घेऊन त्या चार मुली आल्या. चिनी मातीच्या भांड्यांत निर-निराळ्या वस्तु त्या आणीतच होत्या. कांचेच्या आणि चिनी मातीच्या वस्तु आपण एवढ्या लहान मुलींना दिल्या नसत्या. पण न फोडतां, न धांदल करतां सावकाश व व्यवस्थितरीत्या चाललेलें तें भोजन आणि वाढणें बघून मला खरोखरीच मादाम मॉंटेसरीबाईंच्या पद्धतीबद्दल असामान्य आदर वाटू लागला. ह्याचें नांव खरें शिक्षण. यालाच ' वास्तविक ' शिक्षण म्हणावयास पाहिजे. नाहींतर आमची नेहमींची शिक्षणपद्धति ! तीं आनंदी, स्वतःच्या खेळांत सुबुद्धपणें व्यग्र झालेलीं, कांहीं शिकतों आहोंत ह्यांची मुळींच जाणीव न ठेवतां शिकत असलेलीं, आणि हें सुद्धां आपल्या घरांतील नेहमींच्या वातावरणापेक्षां आमूलाग्र शुद्ध वातावरणांत होत असलेलें पाहून खरोखरच मला आश्चर्याचा धक्का बसला. "

## मॉंटेसरी पद्धतीचें वैशिष्टय

शिशुविहाराचें वरील वर्णन वाचून आपणांस पुष्कळच बोध होईल. मुलांचा

विकास आणि निसर्गावर त्यांनीं करावयाची मात आस्ते आस्ते साध्य करून घेणें, आणि ती सुद्धां स्वतःच्या खऱ्याखुऱ्या प्रयत्नांतून करून घेणें हा पहिला विशेष सहजच लक्षांत येईल. तसेंच हात-पाय धुणें, तोंड धुणें, दांत घांसणें, स्वतःच कपडे घालण्यास शिकणें, स्वतःच्या सर्व वस्तु व्यवस्थितरीत्या ठेवण्याचा परिपाठ ठेवून त्याची संवय लावून घेणें, इतर शारीरिक हालचाली आणि गरजा पूर्ण करण्याचें ज्ञान प्राप्त करणें इत्यादि स्वावलंबनाचा धडा गिरविणें हा दुसरा विशेष डोळ्यांत भरतो. आपणांस आवडणाऱ्या वस्तूंचा व खेळण्यांचा उपयोग करून आपल्या ज्ञानेंद्रियांना कार्यक्षम करणें हा तिसरा विशेष. आणि अत्यंत महत्त्वाचा, जो आजहि आपणांस शिक्षण-क्षेत्रांत आणतां येत नाहीं तो विशेष म्हणजे हें सर्व "संपूर्ण स्वातंत्र्याच्या" वातावरणांत झालें पाहिजे असा कटाक्ष हा होय. नाहींतर हालूं नका, जागा सोडूं नका, ह्याला हात लावूं नका, तें फुटेल, तें खराब होईल अशा नन्नाच्या बाराखडी-पलीकडे आपण जात नाहीं. पण येथें मात्र ह्या फुलपांखरांना इतस्ततः बागडण्याचें, जीवनांतील आनंद स्वैरपणें आणि मुबलक लुटण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें होतें. ह्या फुलपांखरांनीं वाटेल तेथें खेळावें, लोळावें, गुण-गुणावें, हवें असल्यास झोंपावें. काय वाटेल तें करावें; फक्त शेजाऱ्यास त्रास दिला नाहीं म्हणजे झालें. खऱ्या अर्थानें रस्त्यावर पडलेलीं हीं अर्भकें मादाम मॉंटेसरीनें उचलून शिशुविहारांत आणलीं आणि "आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिंकडे । हा मंत्र गात त्यांना जीवन जगूं द्या." म्हणून सर्व शिक्षणतज्ज्ञांना जवळजवळ आज्ञाच केली आहे.

लोकशाहीच्या दृष्टीनें पण बाईंनीं त्यांच्या पद्धतीचें महत्त्व सिद्ध करून दिलेलें आहे. झोटिंगशाहीवर विश्वास असणारे राज्यकर्ते शिक्षण-व्यवस्थेंतूनच मुलांच्या मनावर ठायीं ठायीं संस्कार करून आपल्याला अनुकूल अशी पिढी निर्माण करतात. मग बाई असें विचारतात कीं, खऱ्या लोकशाहीवर ज्यांची श्रद्धा वा निष्ठा आहे त्यांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष द्यावयाला नको का? संपूर्ण स्वातंत्र्याच्या वातावरणांत वाढलेला आणि संपूर्णपणें स्वावलंबी पद्धतींतूनच स्वतंत्ररीत्या विचार करणारा मतदार निर्माण केला जाणें शक्य आहे. तशा शिक्षण-पद्धतीतूनच हें सर्व शक्य. आणि अशी लोकशाहीची गरज लक्षांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.........
क्रमांक.........



घेतां 'माझी शिक्षणपद्धतीच संपूर्णपणें शास्त्रशुद्ध आहे.' इतका त्यांनी या पद्धतीवद्दल आत्मविश्वास होता.

## भारतानें मान्य करावयाचें ॠण

भारतांत स्वातंत्र्योत्तर कालांत जीवनसंघर्ष तीव्रतर होत चाललेला आहे. इतके दिवस श्रमजीवी वर्गांतील स्त्रियांनाच झळ लागलेली होती. आतां वुद्धिजीवी मध्यमवर्गांतील स्त्रियांना सुद्धां पुरुषांच्याबरोवर जीवनसंघर्षाकरतां नोकऱ्या कराव्या लागत आहेत. अशा स्थितींत 'गृह-संस्था' भग्न होऊं पाहात आहे. अशा वेळीं राष्ट्रांतील 'वालरूपी' संपत्तीची जोपासना करून भविष्यकाळांत राष्ट्राची कोणत्याच स्वरूपांत हानि होऊं न देण्याचें सामर्थ्य मादाम मॉंटेसरींच्या 'शिशु-विहारांत' आहे.

भारतांत आजपावेतों तरी शिशु–शिक्षणाकडे सरकारचें फारसें लक्ष गेलेलें नाहीं. प्राथमिक क्षिक्षणाची सर्वच जवावदारी नगरपालिका आणि जिल्हा लोकलवोर्ड यांचेकडे आहे. त्यांना त्यांच्या दारिद्रयामुळें प्राथमिक शिक्षणच प्रगति-पथावर नेतां येत नाहीं. मग ते पूर्व-प्राथमिक शिक्षणाकडे काय लक्ष देणार ? गरिबांना त्यांचीं मुलें शिशुविहारांत पाठवितां येत नाहींत, कारण त्यांना शिशुविहारांची फी देणें अशक्यच. व पुष्कळशा गांवांतून ती सोय पण नाहीं. एवंच, आज तर चैन म्हणून श्रीमंत ही सोय आपली मिरासदारी समजत आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार केंद्रीय सरकारनें केला पाहिजे. तीन ते सहा वर्षांपर्यंतच्या प्रत्येक शिशूला शिशूविहारांत वाढण्याचा मौलिक हक्क मिळाला पाहिजे. त्या रीतीनें प्रयत्न करतां यावा म्हणून आर्थिक मदत केंद्रीय व प्रांतिक सरकारनें सढळ हातानें केली पाहिजे. तसें केलें गेलें तरच भारताच्या भवितव्याची काळजी करावी लागणार नाहीं.

केंद्रीय सरकारनें नुकतेंच त्या दृष्टीनें पाऊल टाकलें आहे.

८२९८

## पूर्व-प्राथमिक शिक्षण-समिति

स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर सहा वर्षांनीं कां होईना परंतु यांत निश्चित लक्ष घातलेलें दिसत आहे. दि. १० डिसेंबर १९५६ रोजीं केंद्रीय विधान सभेंत पूर्व-प्राथमिक शिक्षणाकरितां नेमलेल्या समितीच्या शिफारसी जाहीर करण्यांत

आल्या आहेत. श्रीमती अ. रुस्तुमजी ( मुंबईतील सेकंडरी टीचर्स ट्रेनिंग कॉलेजच्या माजी प्राचार्य) ह्या त्या समितीच्या अध्यक्ष आहेत. श्रीमती हंसा मेहता, श्रीयुत के. जी. सय्युद्दिन, श्रीमती राजन नेहरू आणि श्रीमती शिवराव हे सर्व त्या समितीचे सदस्य आहेत. समितीनें पूर्व-प्राथमिक शिक्षणाबाबत केंद्रीय सरकारला वेळोवेळीं सूचना करावयाच्या आहेत. त्या सूचनांचा पहिला हप्ता १० डिसेंबर १९५३ रोजीं जाहीर केला गेला.

## सूचनांचा तपशील

१. प्रत्येक हाउसिंग सोसायटीनें निदान दोन प्रशस्त खोल्या मुलांना खेळण्याकरितां रिकाम्या ठेवल्या पाहिजेत. ( पन्नास घरांच्यावर घरें असतील तर.)

२. नगरपालिकांना अशीच योजना अमलांत आणण्याबद्दल विनंति सरकारनें करावी.

३. फॅक्टरी कायद्यान्वयें मुलांची काळजी घेणें व पोषण करणें याबद्दलचें कलम जारीनें प्रत्यक्षांत आणणें.

४. पूर्व-प्राथमिक शिक्षणाला ' कम्युनिटी ' योजनांच्यामध्यें स्थान देणें.

५. सरकारनें ( प्रांतीय ) शिक्षकांना पूर्व-प्राथमिक शिक्षणाची योजना शिकविण्याकरितां मोफत वर्ग काढावेत.

६. शिक्षणविषयक उपकरणें व साधनें देऊन फिरत्या वर्गाची व्यवस्था करावी.

७. प्राथमिक शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजेसमधून पूर्व-प्राथमिक शिक्षण दिलें जावें.

भारत सरकारचा हा प्रयत्न स्तुत्य आहे. याबद्दल मतभेद असावयाचें कारण नाहीं, पण तो तोकडा आहे. प्रत्यक्ष नवीन ' शिशुविहाराचें ' भारतभर जाळें पसरविण्याचा त्यांत अल्प सुद्धां प्रयत्न नाहीं. गरिबांच्या मुलांची सोय ताबडतोब करण्याची कळकळ सुद्धां त्यांत दिसत नाहीं. परंतु त्या दृष्टीनें विचार करावयास आपण लागलों आहोंत ही काय थोडी समाधानाची गोष्ट आहे ? ह्या चळवळीला वेग मिळवून देऊन शक्य तितक्या लवकर ध्येयमार्गाकडे जाणें

तर आतां शक्य होईल ! आणि ह्याचें बरेंचसें श्रेय पूर्व-प्राथमिक शिक्षणाचें महत्त्व भारताला समजावून देणाऱ्या मादाम मॉंटेसरीबाईंनाच द्यावें लागेल !


भारताच्या राजनीतींत लोकशाहीला फार महत्त्वाचें स्थान आहे. गेल्या सहा वर्षांच्या अनुभवावरून आपण अजून लोकशाही राजव्यवस्थेला सर्वस्वीं समर्थ झालों आहोंत असें वाटत नाहीं. भारताच्या लोकशाहीला कोणताहि धक्का लागूं नये असें वाटत असेल तर शिक्षणव्यवस्थेंत आमूलाग्र बदल करून योग्य वेळीं योग्य गोष्टीवर भर दिला गेला पाहिजे. तसा तो देत असतांना नुसतें प्राथमिक व त्यानंतरच्या शिक्षणांतच साध्य होईल असें केव्हांच मान्य करतां येत नाहीं. गर्भावस्थेंत असल्यापासूनच व्यक्तीच्या विकासाला सुरुवात होते हें महाभारत कालापासून मान्य असलेलें तत्त्व पुनः उद्घोषित करावें लागणार आहे. मॉंटेसरीबाईंनीं तें प्रात्यक्षिक देऊन सिद्ध केलें आहे.

जागतिक क्षेत्रांत भारताचें आणखी एक विशेष कार्य आहे. तें म्हणजे शांतता निर्मितीचें. इतर कोणत्याहि पुढारलेल्या देशापेक्षां भारताचें स्थान ह्या बाबतींत निश्चितरीत्या मान्य केलें गेलें आहे. त्या दृष्टीनेंहि मादाम मॉंटेसरी यांच्या शिक्षणपद्धतीचें ऋण भारताला मान्य करावें लागेल. एका शांतता-परिषदेपुढें भाषण करतांना मादाम मॉंटेसरीबाई म्हणाल्या होत्या :

"प्रौढ लोकांना हत्यारी बंदोबस्तापेक्षां, लष्करी सुरक्षिततेपेक्षां मानवतेच्या नैतिक तयारीचाच अर्थ चांगला समजला पाहिजे. त्यांनीं हें पक्कें समजावें कीं, आजचें मूलच विश्वशांतीचा निर्माता ठरणार आहे. योग्य वातावरणांत त्याला वाढूं दिलें तर त्याच्या ठिकाणीं सामाजिक भावनांचें पोषण होऊन ज्या समाजोपयोगी प्रवृत्ति तें दाखवील त्यांतच उद्यांच्या जगाचा तरणोपाय आहे. त्यांतूनच तें मानवतेला विश्वशांतीच्या मोक्षाकडे घेऊन जाईल."

अशा रीतीनें विश्वशांतीचें ध्येय साध्य करावयाचें असेल, लोकशाही चिरायु करावयाची असेल, सुदृढ व निकोप नागरिक निर्माण करावयाचा असेल, तर मादाम मॉंटेसरींच्या पुण्यस्मृतीला अभिवादन करून रस्तोरस्तीं धूळ खात पडलेल्या अर्भकांच्या विकासासाठीं लाखों 'शिशुविहार' निर्माण होणें आवश्यक आहे. त्यांतच उद्यांच्या भारताची प्रगति सामावलेली आहे.

× × ×



## २ ☆ ☆ महात्मा गांधी

### वर्धा शिक्षणयोजनेचें स्वागत (मूलोद्योग)

भारतांतील शिक्षणविषयक-प्रयोगांत वयानें सर्वांत लहान परंतु महत्तेनें सर्वांत श्रेष्ठ शैक्षणिक क्रांति ही गांधीजींची " मूलोद्योग शिक्षणपद्धती " च करूं शकली आहे. इ. स. १९३७ मधील घटना आहे ही. जुन्या बुरसटलेल्या; निरुपयोगी जीवनविन्मुख अशा शिक्षणांत मश्गूल झालेल्या लोकांना थंड पाण्याचा जोरदार शिपका मारून जागें करावें तसें गांधीजींच्या ' वर्धा-शिक्षण-योजने 'नें खडबडून जागें केलें. मधमाशांच्या मोहोळाला कोणीं हात लावतांच त्या जशा सर्व बाजूंनीं त्याच्या-वर तुटून पडतात, तसेच सर्व लोक, विशेषत: शिक्षणक्षेत्रांत कार्य करणारे व विद्यापीठांचे असलेले लोक ' अब्रह्मण्यं ', ' अब्रह्मण्यं ' म्हणून गांधींच्यावर टीकेची झोड उठविते झाले. वर्धा योजना समजून घेण्यापूर्वींच ती भयंकर आहे असा हलकल्लोळ भारतांत सर्व दिशांधीं केला गेला. पण महात्मा गांधी या सर्वांचें बारसें जेवलेले होते. रतिभरहि विचलित न होतां त्यांनीं सर्वांची परिषद् बोलावली आणि युक्तिप्रयुक्तीनें नव-शिक्षणप्रयोगाची आपली कल्पना त्यांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ...
नों. दि.


डोक्यांत उतरवून ते मोकळे झाले. त्या वेळच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाला ती व्यवहारांत आणण्याचे प्रयत्न करावे लागले आणि नंतरच्या मंत्रिमंडळांनाहि तोच प्रयोग पुढें चालू ठेवावा लागला आहे. प्रत्यक्ष सरकारनें जरी ह्या योजनेला पाठिंबा दिला असला, तरी ह्या योजनेच्या यथार्थतेबद्दल अजून गैरसमज पुष्कळच आहेत. विशेषत: ती संपूर्णपणें न अवलंबितां तिचें हल्लीं सोईस्कर स्वरूप करून घेतलें गेलें आहे. त्यामुळेंहि ‘ मूलोद्योग ’ पद्धति म्हणजे एक ‘ अव्यवहार्य शैक्षणिक योजना ’ अशी कल्पना प्रसृत झालेली आहे.

## महर्षि गांधीजी

गांधीजींच्या ह्या योजनेचा खरा अर्थ समजून घ्यावयाचा असेल तर ती योजनाच फक्त बघून चालावयाचें नाहीं; तर त्यांच्या चरित्रांतील आपण फारशा लक्षांत न घेतलेल्या प्रसंगांकडे सुद्धां जास्त लक्ष द्यावें लागेल. पुढील पिढी राष्ट्रोपयोगी, समाजोपयोगी होऊनहि व्यक्तिव्यक्तींचें विकसन निकोप आणि जीवनोपयोगी कसें होईल याविषयींची चिंता सर्वच समाजधुरीणांना लागत असते. समाज सुखी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांतूनच त्यांना समाजाला शिक्षण देऊन सुदृढ करण्याचे मार्ग शोधावे लागतात. त्या त्या समाजशास्त्रज्ञाच्या समाजविषयक कल्पनांना आणि तत्त्वज्ञानाला अनुसरून त्यांना शिक्षणविषयक विचार तयार करावे लागतात. पाश्चिमात्य देशांत प्लेटोपासून आजपर्यंत सर्व समाजधुरीणांनीं व आपणांकडे महर्षि टागोर, पंडित मालवीय ह्यांच्यापासून तों महर्षि कर्वे यांच्यापर्यंतच्या समाज-सुधारकांनीं व तत्त्ववेत्त्यांनीं असाच प्रयत्न केला आहे. महात्मा गांधीहि त्याला अपवाद नाहींत. फरक एवढाच आहे कीं, त्यांचे स्वातंत्र्य संपादण्याचे प्रयत्न इतके प्रभावी होते, त्यांची अस्पृश्यता नष्ट करण्याची तळमळ इतकी तीव्र होती कीं, शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांना ओळखण्याची आवश्यकताच लोकांना वाटत नाहीं. महात्मा गांधींची राजकारणी पुरुष म्हणून जितकी श्रेष्ठता आहे तितकीच, किंबहुना कांकणभर जास्तच त्यांची शिक्षणतज्ज्ञ म्हणून श्रेष्ठता आहे. याचें कारण म्हणजे त्यांचें वैयक्तिक जीवनच होय. जीवन संपूर्ण व समृद्ध करण्याची जितकी जास्त धडपड तितकीच जास्त संपूर्ण आणि सर्वांगीण शिक्षणपद्धति त्या व्यक्तीला शोधतां येते. म्हणून सुरुवातीला असें म्हटलें होतें कीं, राज-

कारणाच्या दृष्टीनें क्षुल्लक समजल्या गेलेल्या त्यांच्या चरित्रांतील कांहीं प्रसंगांवरून त्यांची वर्धा योजना चांगल्या रीतीनें समजून घेण्यास मदत होते.

## चरित्रांतील ठळक प्रसंग

महात्मा गांधींचें लोकप्रिय चरित्र सर्वांच्यासमोर अजूनहि ताजें आहे. विशेषत: इ. स. १९२० पासून त्यांनीं स्वातंत्र्याकरितां केलेलीं आंदोलनें, इ. स. १९४२ ची 'चलेजाव' चळवळ आणि त्यानंतर त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून इ. स. १९४७ सालीं मिळालेलें स्वातंत्र्य आणि त्यानंतरचें गांधीजींचें कष्टमय जीवन हा सर्व चित्रपट आपल्या पुढून अजूनहि कसा सुस्पष्ट सरकत असतो. तसेंच पाहिलें तर त्यांचें आफ्रिकेंतील कार्यहि लोकांच्या स्मरणांत नाहीं असेंहि नाहीं. या सर्व घटना इतक्या स्पष्ट आणि ठळक आहेत कीं, त्या अजून अनेक वर्षेपर्यंत पुसट होतील असें वाटत नाहीं. पण या 'ठळक' असल्यानेंच गांधीजींचें चरित्र म्हणजे ह्याच प्रसंगांची नोंद असा गैरसमज आपण करून घेतों आणि ज्या ध्येयाकरतां हीं आंदोलनें गांधीजींनीं घडवून आणलीं त्या ध्येयाकडे सुद्धां आपण दुर्लक्ष करतों. या प्रवृत्तीनेंच गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा या तत्त्वांची पण भारतानें कांहीं कमी कुचेष्टा केली नाहीं. तीच गोष्ट त्यांच्या 'सत्याग्रही' जीवनाची. आणि ह्या दोहोंची कुचेष्टा झाल्यामुळेंच त्यांच्या शैक्षणिक योजनेचीहि कुचेष्टा होऊं शकली. कारण मानव कसा असावा, समाजघटना कशी असावी याबद्दलचीं त्यांचीं मतें ज्यांना पटूं शकलीं नाहींत त्यांना तसा तो मानव आणि गांधीजी-कल्पित समाजरचना साध्य होण्यासाठीं त्यांनीं जें माध्यम वर्धा योजनेंत उपयोजिलें होतें तेंहि अमान्य होणार हें ठरलेलेंच होतें.

शिक्षणविषयक क्रांतिकारी शिक्षणपद्धति, महात्माजींना लोक समजतात तशी ती अचानक स्फुरलेली नसून, त्या योजनेच्या पाठीशीं महात्मा गांधींची साठ वर्षांची तपश्चर्या होती, ही गोष्ट आपण लक्षांत घेणें अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थी, शिक्षक, चालक आणि सुबुद्ध नागरिक म्हणून त्यांना जे जे अनुभव आले त्या त्या अनुभवांचा योग्य उपयोग करूनच त्यांनीं आपली वर्धा योजना भारताला सादर केली आहे, आणि त्यामुळेंच आतांपर्यंत जें इतरांना विशेषत्वानें सांगतां आलें नाहीं तें गांधीजी सांगूं शकले.

## विद्यार्थी मोहनदास

विद्यार्थी म्हणून गांधीजी यथातथाच होते. अभ्यासाकडे तसें त्यांनीं कधीं लक्षच दिलें नाहीं. खेळांत म्हणूनहि कधीं त्यांनीं आत्मीयतेनें भाग घेतला नाहीं. एवढेंच नव्हे तर वडिलांच्या सेवेकरितां म्हणून त्यांनीं खेळांच्या तासांतून आपली सोडवणूक करून घ्यावी आणि घरीं जाऊन आजारी वडिलांची सेवा करावी हाच त्यांचा क्रम असे. ह्याबद्दल त्यांना पुढें अर्थातच फार वाईट वाटलें. म्हणूनच शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावयास पाहिजे असें आग्रहानें मोठेपणीं ते म्हणत असत. तरी पण इतर विद्यार्थ्यांच्या मानानें वैशिष्टयपूर्ण असें त्यांचें आचरण कांहीं गोष्टींत निश्चित होतें. गळवाला जपावें तितक्याच हळुवारपणें ते विद्यार्थिदशेंतहि शीलाला जपत असत. थोडेसें कुणी उणें-अधिक बोललें आणि गांधीजींच्या खरेपणाबद्दल अविश्वास दाखविला कीं त्यांच्या अंत:करणाला घरेंच पडत असत. त्यामुळें शिक्षकानें 'कॉपी' करण्यास सांगितलें तरी शिक्षक असें कधीं सांगणारच नाहींत म्हणून गांधीजी खोटें आचरण कधींच करीत नसत.

## मोह

विद्यार्थिदशेंतला फार मोठा प्रसंग म्हणजे एका उनाड विद्यार्थ्याशीं गांधीजींनीं केलेली मैत्री. स्वातंत्र्य मिळविण्याकरितां मांसयुक्त पदार्थ खावे लागतात असें तो गांधीजींना सांगत असे. प्रथम प्रथम गांधीजींनीं त्याचें मन वळविण्याचे बरेच प्रयत्न केले. तो मित्र मोहनदासाच्या मानानें धडधाकट असा होता. धांवण्यांत खेळण्यांत सुद्धां तो मोठा काटक होता आणि एकंदर धाडसी वृत्तीचाच होता. त्याच्या मानानें मोहनदास फाटकातुटका, अशक्त आणि भित्रा असाच होता. त्यामुळें त्याचा परिणाम असा झाला कीं, मांसभक्षणानेंच हा निरोगी आणि धिप्पाड आहे असें मोहनदासाला वाटूं लागलें. त्याला मोहनदासासारखी चोराचिलटांची किंवा भुताखेतांची भीतीहि वाटत नसे. त्यामुळें भित्रा मोहनदास त्याच्या सर्व आग्रहाला बळी पडला आणि एक दिवस त्यानें मांस खाण्याची दीक्षा घेण्याची तयारी दाखविली. ही सुधारणा झाली तरच स्वराज्य मिळेल अशी सोईस्कर कल्पना लढवून ती गोष्ट वडिलांपासून लपवून ठेवण्यासहि मोहनदास कबूल झाला. दूर नदीतीरावर

मोहनदास, हा मित्र आणि मोहनदासाचा थोरला भाऊ अशी मंडळी हा समारंभ उरकण्यास गेलीं. पाव आणि मांस खाण्याचा पहिला प्रसंग तो. शाकाहारी माणसाला जें व्हावयाचें तें सर्व मोहनदासाला झालें. खाणें तसेंच टाकून तेथून निघून जावें लागलें. आपण एका सजीव प्राण्याच्या नाशास कारणीभूत झालों आहोंत ही कल्पना डोक्यांत थैमान घालूं लागली. पोटांत तें बिचारें कोंकरूं बँ बँ करतें आहे असें तर त्याला रात्रभर वाटत होतें; पण सुधारणेचें कर्तव्य केलेंच पाहिजे या समजुतीनें ह्या सर्व भीतीला ते दाबून टाकीत असत. तो मित्र आतां नवीन नवीन पदार्थ खाऊं घालूं लागला. दिवसेंदिवस त्याच्यांतील रुचीची कल्पना गांधीजींना येऊं लागली. याच दोस्तानें महात्मा गांधींना एका वेश्येच्या घरीं नेऊन फजिती करण्याचा चंग बांधला. परंतु गांधीजी सहीसलामत त्यांतून तर सुटले; पण विडया ओढण्याच्या नादांतून मात्र सुटूं शकले नाहींत. घरांतील मोठ्या माणसांना चुकवून चोरून विडया ओढण्यांत मोहनदासाला आतां मजा वाटूं लागली होती. तल्लफ भागविण्याकरितां एक-दोन वेळां चोऱ्या करण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. त्या वेळच्या त्या समाजपद्धतींत, बालविवाहांत, आपल्या चमत्कारिक शिक्षणपद्धतींत ह्या सर्वांचीं कारणें लपलेलीं होतींच. पण मोहनदास हा इतरांप्रमाणें मोहनदास नांवाचाच असता तर त्यानें त्या सर्व गोष्टी तशाच चालू ठेवल्या असत्या, आणि अधःपतनाच्या घसरगुंडीवर संपूर्णपणें जाऊन स्वतःचा संपूर्ण नाश करवून घेतला असता. पण मोहनदासाच्या मनांत मात्र सत्य, निष्ठा आणि अनैतिक आचरण ह्यांचा फार मोठा झगडा सुरू होता. आतांपर्यंत मोहानें ' मोहन 'वर मात केली. पण आतां डाव उलटला होता. अधःपतनाला वेळींच ब्रेक लावून रोखलें नाहीं तर काय होईल ह्याची त्याला कल्पना होती. मोहनदासानें सर्व आचरण कागदावर लिहून काढलें आणि वडिलांना ती चिठ्ठी मिळेल अशी व्यवस्था केली. त्यांत अर्थातच कृतकर्माच्या पश्चात्तापाबरोबर क्षमायाचना होतीच. प्रत्यक्ष तोंडी सर्व सांगणें भित्र्या मोहनदासाला अशक्यच होतें. चिठ्ठी मिळाल्यानंतर वडील जोरानें कडाडतील, आकांडतांडव करतील, शिक्षा करतील, त्या सर्वांला तोंड देण्याइतकी मात्र मनाची तयारी त्यानें करून ठेवली होती. वडील आजारी असल्यानें ते झोपलेले असतांना चिठ्ठी ठेवून सर्व गोष्टी त्यांना कळवाव्यात असें ठरविलें.

निजून उठल्यावर चिठ्ठी वाचली, डोळ्यांतील अश्रु घळघळा चिठ्ठीवर टपकले. चिठ्ठी त्यांनीं फाडून टाकली. अंग तसेंच बिछान्यावर टाकून दिलें. त्या अश्रूंच्या प्रवाहांतच मोहनदासाच्या पापाचें परिमार्जन झालें. वडिलांना होणाऱ्या वेदनांची मोहनदासाला चांगलीच कल्पना आली. तोहि रडूं लागला. अहिंसेचें पहिलें प्रात्यक्षिक त्याला मिळालें. ' अहिंसेनेंच जग जिंकतां येईल '. ह्याचा प्रथम पाठ महात्मा गांधींना मिळाला. येथून पुढें मात्र मोहनदास पुनः ' मोहदास ' कधींच झाला नाहीं. सत्याचा जय झाला आणि भारताला एक पुत्र परत मिळाला.

विद्यार्थिदशेंतील हे सर्वच अनुभव फार महत्त्वाचे आहेत. त्यांचा खोलवर परिणाम गांधीजींच्या मनावर झाला असणें अपरिहार्य आहे. शिक्षणपद्धतींतील दोष आणि अव्यवहार्यता हीं इतक्या जवळून पाहावयास मिळाल्यानेंच त्यांना तिच्याविषयीं विचार करून तीवर शस्त्रक्रिया करावी लागली.

## प्रौढदशा

प्रौढदशेंतील अनुभव तर याहिपेक्षां जास्त अभ्यसनीय आहेत. इ. स. १८८७ सालीं मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर पुढें काय हा प्रश्न त्यांचेपुढें होताच. पण त्यांच्याच एका हितचिंतकानें त्यांना इंग्लंडला जाण्याचा सल्ला दिला. इंग्लंडला जाण्यांत पैशांची तर अडचण होतीच, पण त्याहूनहि धर्माची होती. समुद्रपर्यटन निषिद्ध आणि त्यांतच इंग्लंडला कोणी गेलें तर बाटतात हा लोकांचा समज होता. त्यामुळें तर जमातीचा सर्वांत मोठा विरोध. पण हे विरोध झुगारून आणि सात्त्विक आचरणाचें मातेला वचन देऊन गांधीजी एकदाचे लंडनला गेले. तेथें मात्र त्यांनीं मोहाला आणि आपणास संमत नसलेल्या शिष्टाचारांना बळी पडावयाचें नाहीं असा अगदीं नियमच केला होता. आणि अनेकांचा रोष सहन करून मांस वगैरे न खाण्याचा निग्रह चालू ठेवला. अशा परिस्थितींत इ. स. १८९१ मध्यें बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते भारतांत परत आले.

## अयशस्वी बॅरिस्टर

भित्रा मोहनदास तीन वर्षें इंग्लंडांत राहिला होता तरी त्याचा भित्रेपणा

फारसा कमी झालेला नव्हता. गांधींनीं बॅरिस्टर म्हणून मुंबईत प्रथम प्रॅक्टिस सुरू केली. बऱ्याच दिवसांच्या प्रतीक्षेनंतर एक लहानशी केस मिळाली. केस एक दिवसाचीच होती. आरोपीचें वकीलपत्र त्यांनीं घेतलें होतें. फिर्यादी पक्षाच्या साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याकरितां बॅरिस्टर गांधी उभे राहिले. बॅरिस्टरला न्यायाधीश सुद्धां घाबरतात असें त्यांनीं ऐकलें होतें; पण ह्या बॅरिस्टरचें मात्र निराळेंच होतें. साक्षीदाराच्या अंगाला घाम फुटण्याऐवजीं बॅरिस्टरसाहेबांनाच दरदरून घाम फुटला. डोक्यांत गरगरा फिरूं लागलें. सर्व कोर्टच फिरतें आहे असाहि भास होऊं लागला. प्रश्न सुचेना. सुचलेले प्रश्न तोंडांतून बाहेर फुटेनात. शेवटीं बॅरिस्टरसाहेबांनीं अंग खुर्चीत टाकून दिलें. बॅरिस्टरनें केस जिंकण्याऐवजीं केसनेंच बॅरिस्टरला जिंकलें. केस चालवितां येत नाहीं अशी कबुली आपल्या अशिलाला द्यावी लागली. आपण वकिलीच्या धंद्यांत पडूंच नये असें त्यांना वाटूं लागलें.

मुंबईंत राहून वकिली करण्याचें जमत नाहीं असें पाहून गांधीजींनीं दुसरा धंदा शोधण्याचें ठरविलें. त्या दृष्टीनें वर्तमानपत्रांतील 'नोकर पाहिजे' या जाहिराती वाचण्यास त्यांनीं सुरुवात केली. अशाच जाहिराती वाचीत असतांना 'इंग्रजीचा शिक्षक पाहिजे' ही जाहिरात पाहून तेथें गांधीजींनीं अर्ज केला. परंतु बॅरिस्टर गांधी पदवीरहित असल्यानें सर्व भारताच्या गुरुपदीं गेलेल्या ह्या शिक्षकाला ती नोकरी मिळूं शकली नाहीं. सहनशीलतेचा अंत झाला. मुंबईंतील खर्च झेपेना, तेव्हां सर्व गाशा गुंडाळून गांधीजींनीं मुंबईला रामराम ठोकला. ते राजकोटला परत गेले. अपयश हात धुऊन मागें लागलें म्हणजे सांवलीसारखा पिच्छा पुरवल्याशिवाय राहत नाहीं. किंवा असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं, जीवनविषयक नवीन मूल्यें निर्माण करतां येण्यासाठींच जणूं कांहीं जीवनांतील आत्यंतिक कटुता गांधीजी पूर्वायुष्यांत पचविण्याची तपस्या करीत होते. राजकोटचा अनुभव हा असाच होता. तेथील गोऱ्या अधिकाऱ्यांनीं त्यांचा केलेला मानभंग, लहान लहान संस्थानांतील किळसवाणी वशिलेबाजी आणि काळीं कृत्यें यांनीं गांधीजींच्या तरुण मनावर फार मोठे आघात केले. दूर कोठेंतरी जाऊन जीवनाचें हें 'ओंगळ' स्वरूप शक्य तितकें दृष्टीआड ठेवावें असे 'जीवनपाखंडी' पण ते बनूं लागले. पण इतक्यांत —

# आफ्रिकेंत प्रयाण : राष्ट्रकार्याचा ओनामा

एका 'मेमन फर्मनें' गांधीजींना आफ्रिकेंत नोकरी देऊं केली. गांधीजींनीं फारसे आढेवेढे न घेतां हिंदुस्थानांतून दूर जाण्याची संधि वायां घालविली नाहीं, आणि इ. स. १८९३ त दक्षिण आफ्रिकेंत जाण्यास सज्ज झाले. दक्षिण आफ्रिकेंत अनेक गोष्टी त्यांची वाट पाहातच होत्या. दक्षिण आफ्रिकेंत अनुभवलेल्या अनेक गोष्टींमुळेंच गांधीजींच्या व्यक्तित्वाला खरी धार आली आणि गांधीजी एक असामान्य पुढारी आणि शिक्षक म्हणून भारताला लाभले.

युरोपियनांचा हिंदवासीयांबद्दलचा द्वेष अगदीं शिगेला पोहोंचला होता. गांधीजी आगगाडीनें प्रवास करीत असतांनाच त्याचा अनुभव त्यांना आला. फर्स्ट क्लासचें तिकीट असतांना सुद्धां गांधीजींना एका गोऱ्या प्रवाशाच्या लहरीमुळें पोलिसांकरवीं त्यांचें सामान सक्तीनें बाहेर लोटून त्या गाडीला मुकावें लागलें. रेल्वे नसतील त्या ठिकाणीं प्रवास 'कोच' मधून करावा लागत असे. त्या ठिकाणीं तर एका क्षुल्लक कंडक्टरकडूनच गांधीजींना मार खाण्यासारखी मानहानि पत्करावी लागली. गांधीजी खरोखरीच या सर्व अनुभवांमुळें इतके वैतागले, कीं लगोलग परत मायभूमीला जावें असेंहि ठरविण्यापर्यंत त्यांचे विचार गेले होते. परंतु हा अपमान इतर हिंदी लोकांप्रमाणें मुकाट्यानें गिळून ते बसले नाहींत. ह्यांतच त्यांचें वैशिष्ट्य होतें. त्यांनीं प्रत्येक वेळीं योग्य त्या अधिकाऱ्यांच्याकडे तक्रार नोंदवून 'माणुसकीचा' हक्क अबाधित राहिला पाहिजे असा प्रयत्न केला. ट्रान्सवाल आणि नाताळमधील रहिवाशांशीं ह्याबद्दल चर्चा करीत असतांना गांधीजींना हें सर्व नित्याचेंच आहे आणि त्याबद्दल आम्ही कोठेंहि तक्रार वगैरे करीत नाहीं असें समजतांच त्यांनीं त्यांची कानउघाडणी केली, आणि या बाबतींत चिकाटीनें खटपट करून हे अन्याय दूर करून घ्या म्हणून सुचविलें.

या प्रवासांत 'सत्याग्रही' गांधी लोकांच्या पुढें आले. कोचमधून जात असतांना प्राण गेला तरी न हालणारा सत्याग्रही म्हणून जसें त्यांनीं सर्वांना आश्चर्यचकित केलें, तसेंच ट्रान्सवाल रेल्वेंतून फर्स्ट क्लासनें हिंदी लोकांना

जाण्याची परवानगी नसतांना सत्याग्रही वृत्तीनें प्रवास करणारे गांधी लोकांच्या कौतुकाचा व कुतूहलाचा विषय बनले.

मध्यंतरीं ज्या केसच्या कामामुळें गांधीजी आफ्रिकेला आले होते ती केस हाताळतांनाहि गांधीजींनीं आपली मुत्सद्देगिरी पणाला लावली होती. कोर्टांत वर्षांनुवर्षे केस चालविणें मोठमोठ्या इंग्रजी वकिलांकडे 'फी'च्या रूपानें बराचसा पैसा नेऊन ओतणें इत्यादि गोष्टी त्यांना मुळींच पसंत पडण्यासारख्या नव्हत्या. त्यामुळें शेठ अब्दुल्ला आणि सय्यदसाहेब ह्यांच्यांतली ही तेढ कमी झाल्याशिवाय व खटला खाजगीरीत्या मिटविल्याशिवाय दोघांचेंहि कल्याण नाहीं, ही गोष्ट प्रथम त्या दोघांच्या मनावर बिंबविली आणि नंतर एखादा कुशल वैद्य जसा नाजूक हातानें शस्त्रक्रिया करून पुन्हा सर्व गोष्टी योग्य त्या काळजीनें जुळवून ठेवतो तसेंच गांधीजींनीं त्या दोघांतील शल्य नाहींसें करून खटला सामोपचारानें मिटविला; आणि कार्य झालें म्हणून हिंदुस्थानला परत जाण्याचा निश्चय जाहीर केला.

इतका मोठा खटला सामोपचारानें मिटविण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें असल्यानें त्यांचें जाहीर स्वागत करून व आभार मानून मग त्यांची 'पाठवणी' करावी असें ठरलें. सर्व समारंभ व्यवस्थित पार पडला. निरोपादाखल गांधीजी चार शब्द बोलण्यास उठले आणि सर्व समारंभाला निराळेंच वळण मिळालें. अन्यायाविरुद्ध सर्व शक्ति एकत्रित आणून व संघटित करून जर युद्ध केलें नाहीं तर आफ्रिकेंतील काळ्या लोकांना गुलामांपेक्षांहि वाईट जिणें जगावें लागेल अशी सूचना ते तेथें जमलेल्यांना देत होते. त्याच सुमारास हिंदी लोकांचा 'मतदानाचा' हक्क काढून टाकण्याचा कायदा नाताळ 'संसदें'त चर्चेला घेतला होता. त्याच्या परिणामाची कल्पना फक्त गांधीजींनाच होती. बरेचसे व्यापारी कमी शिकलेले म्हणून त्यांना या सर्व गोष्टी समजत नसत. हा 'कायदा' हाणून पाडला पाहिजे असें गांधीजींनीं सांगतांच "पाटीलबुवा लग्न करा" या न्यायानुसार लोकांनीं गांधीजींनाच विनंति केली व त्यांनींच पुढाकार घेऊन मदत करावी असें आवर्जून सांगण्यांत आलें. निरोप घेण्याकरितां आलेल्या गांधींना 'विरोधसमिति' स्थापन करावी लागली. संसदेकडे पाठवावयाच्या तक्रारीअर्जाचा खर्डा तयार करावा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... महात्मा गांधी : २१
क्रमांक .................... वि: ....................

लागला. स्वयंसेवक तयार करून सर्व जबाबदार लोकांच्या शुश्रूषा करण्याचें महादुष्कर कार्य करावें लागलें. गांधीजींच्या आयुष्यांतलें अन्यायाविरुद्ध लढण्याचें नवीन विधायक पर्व सुरू झालें !

नाताळांत राहून कार्य करावयाचें ठरविलें म्हणून त्यांना तेथील कोर्टांत सनद मिळविण्याचा प्रयत्न करावा लागला. ती सनद मिळविण्याकरितांहि त्यांना बराच त्रास झाला. आणि पुनः 'वर्णविद्वेष' म्हणजे काय ह्याची प्रचीति आली. सुप्रीम कोर्टापुढें तक्रार-अर्ज नोंदवूनच त्यांना सनद मिळूं शकली. सनद मिळाल्यानंतर त्यांनीं आपल्या सामाजिक कार्याकडे जास्त लक्ष दिलें व कार्याला सुसंघटित स्वरूप यावें म्हणून 'नाताळ इंडियन काँग्रेस'ची स्थापना केली. काँग्रेसचें कार्य सुरळीत चाललें आहे असें पाहून त्यांनीं इ. स. १८९५ त हिंदुस्थानांत लोकांना जाऊन भेटण्याकरितां आफ्रिकेंतील लोकांची परवानगी घेतली. हिंदुस्थानांत येतांच नातेवाईक मंडळींत तल्लीन होण्याऐवजीं आफ्रिकेंतील वर्णद्वेषाची व हिंदी लोकांवर होत असलेल्या अन्यायाची कल्पना भारतांतील लोकांना देतां यावी म्हणून पुस्तिका लिहून तयार केली. तिच्या दहा हजार प्रती छापून त्यांनीं सर्व वर्तमानपत्रांकडे पाठवून दिल्या. त्याचा सारांश लंडनकडे पाठविला गेला आणि लंडन तारेनें नाताळमधील वृत्त-पत्रांच्याकडे ती माहिती पाठविली गेली आणि हा सर्व खटाटोप करण्या-करितां गांधीजींनीं मदत कोणाची घेतली ? तर ती शाळेंतील विद्यार्थ्यांची ! शाळेंतील काम संपलें कीं हीं मुलें गांधीजींना मदत करण्यास येत असत. मोबदल्यांत त्यांच्याकडून पोस्टाचीं तिकिटें घेत असत. विद्यार्थ्यांच्या मदतीचें महत्त्व - विशेषतः स्वातंत्र्य संपादण्यांत - हें त्याच वेळीं प्रथम लक्षांत आलेलें होतें.

हिंदुस्थानांत लोकमत तयार करण्याचा प्रयत्न चालू असतांनाच गांधीजींना त्यांचे राजकीय गुरु कै. नामदार गोखले ह्यांचा परिचय झाला. लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ति रानडे यांच्याकडूनहि समाजकारणाचे व राजकारणाचे धडे ते घेतच होते. परंतु एवढ्यांत नाताळचें 'विधिमंडळ' जानेवारींत उघडावयाचें असल्यानें गांधीजींना परत बोलावण्यांत आलें. गांधीजींना एका मोठ्या दिव्यांतून जाण्याचें निमंत्रण होतें तें.

गांधीजींनीं हिंदुस्थानांत केलेल्या प्रचाराचे पडसाद आफ्रिकेंतील वर्तमान-पत्रांतहि उमटले होतेच. त्यामुळें श्वेतवर्णीयांचीं मनें गांधीजींविरुद्ध प्रक्षुब्ध

झालीं होतीं. गांधीजींना आफ्रिकेच्या किनाऱ्यावर पाय सुद्धां ठेवूं देऊं नका अशा आरोळ्या रस्त्यारस्त्यांतून ऐकूं येऊं लागल्या. तसें दडपण सरकारवर आणलें गेलें. त्याचा परिणाम म्हणजे गांधीजी ज्या जहाजांतून येत होते तें जहाज बंदरांत येऊं देण्यासच अधिकारी तयार होईनात. गांधी सहकुटुंब परत भारतांत गेले तर त्यांच्या जाण्याचा खर्चहि स्वीकारण्यास गोरे तयार होते. उलट गांधीजी इतक्या विरोधांतून जर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरले तर त्यांना ठार मारण्याच्या धमक्या दिल्या गेल्या. गांधीजींचें सर्व सामर्थ्य पणास लावण्याची वेळ होती ती. तेवीस दिवस जहाज व जहाजांतील उतारू सर्वच बंदराबाहेर समुद्रांतच वसती करून होते. शेवटीं जहाज बंदरांत घेण्याचें ठरलें. कस्तुरबा आणि मुलें ह्यांना टॅक्सीतून सुरक्षित स्थळीं पोंचविण्यांत आलें. श्री. लॉटन या अब्दुल्ला कंपनीच्या वकिलाला घेऊन गांधी मुद्दाम पायींच गांवांतून जाऊं लागले. निवासस्थान दोन मैल तरी दूर होतें. थोडेंसें दूर जातात न जातात तोंच कांहीं तरुण मुलांनीं त्यांना ओळखलें. लोकांची गर्दी गांधीजींच्या मागून त्यांचा उद्धार करीत जात असतांना वाढूं लागली. श्री. लॉटन या गृहस्थांनीं रिक्षांतून जाण्याचा मार्ग सुचविला. परंतु जमावानें रिक्षावाल्याला धमक्या देऊन तेथून घालवून दिलें. गर्दी वाढत होती. पुढें तर चालणेंच अशक्य झालें. लोकांनीं लॉटन साहेबाला गांधींच्यापासून दूर नेलें, आणि मग गांधीजींना लाथाबुक्क्यांचा आहेर सुरू केला. गांधींनीं शांतपणें एका घराचा कठडा धरून ठेवला आणि धैर्यानें सर्व सहन केलें. इतक्यांत सौ. अलेक्झँडर नांवाच्या पोलिस अधिकाऱ्याच्या पत्नीनें तें सर्व पाहिलें. जमावापासून गांधीजींना वांचविण्याचे आत्यंतिक प्रयत्न स्वतःचे प्राण धोक्यांत घालून करण्यास त्या पुढें आल्या. पशु झालेल्या लोकांना तिच्यामुळें कां होईना लाज वाटली, आणि जगाच्या कल्याणाकरितां गांधीजींचा बळी त्या दिवशीं घेण्याचें टळलें. गांधीजींचें त्या वेळचें धैर्य आणि त्यानंतर सुद्धां कोणावरहि सूड न उगविण्याचें उदार वर्तन यामुळें गांधीजींची प्रतिष्ठा भूमिति-श्रेणीनें वाढली. आणि दरबानमधील गोऱ्या व सुधारलेल्या लोकांना आपल्या गैरवर्तनाची लाज वाटूं लागली. गांधीजींचा पहिला मोठा नैतिक विजय झाला, अहिंसेवरचा विश्वास द्विगुणित झाला.

## शिक्षणविषयक पहिला प्रयोग

आफ्रिकेंत सहकुटुंब व सहपरिवार प्रथमच आल्यानें एक नवीनच प्रश्न दत्त म्हणून समोर उभा राहिला. गुजराथी शाळा मुळींच नव्हत्या. तेव्हां मुलांचें शिक्षण कसें पूर्ण होणार? वर्धा शिक्षणयोजना देणाऱ्या गांधीजींनीं आपला शिक्षणविषयक प्रयोग येथें सुरू केला. शिक्षणाकरितां मुलांना परत हिंदुस्थानांत पाठवावयाचें, का आफ्रिकेंतच इंग्रजी मुलांच्या शाळेंत पाठवावयाचें? ही समस्या त्यांच्यापुढें होती. मुलें परत पाठवावयाचीं म्हणजे अत्यंत संस्कारक्षम काळांत त्यांना आईवडिलांपासून दूर ठेवावयाचें. पुस्तकी ज्ञानापेक्षां वास्तविक वातावरणांत वाढत असतांना आईबापांच्या सान्निध्यांत होणारी वाढ आणि विकास हाच मार्ग त्यांना विशेषत्वानें आवडत होता. इंग्लिश शाळेंतील वातावरण तर गांधीजींना मुळींच आवडत नव्हतें. या सर्वांतून योग्य मार्ग म्हणजे मुलांच्या शिक्षणाची घरींच सोय करणें. गांधीजींनीं तोच मार्ग पत्करला. मुलांना शिकविण्याकरितां एका आंग्ल शिक्षिकेची नेमणूक केली. स्वतःहि शिक्षक बनले. पुस्तकी शिक्षणपद्धतीवर त्यांचा हा जो अविश्वास होता त्यामुळेंच त्यांनीं इ. स. १९२० आणि इ. स. १९३० च्या स्वातंत्र्यसंग्रामांत शाळा-कॉलेजांतील तरुणांना हे कारखाने सोडून देण्यास आवाहन केलें.

## विधायक सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ

धंद्यांतील चलती आणि कौटुंबिक जीवनांतलें स्वास्थ्य यांतच समाधान मानण्याची वृत्ति आतां गांधीजींची असणें अशक्यच होतें. कांहींतरी समाजोपयोगी विधायक कार्य नित्यशः करावें आणि जीवन अधिकाधिक साधें कसें करावें याविषयींची तळमळ आतां त्यांना जास्तच त्रास देऊं लागली. जवळच असलेल्या एका धर्मार्थ दवाखान्यांत गांधीजी नियमानें दोन तास कंपौंडरचें व नर्सिंगचें काम करूं लागले. याचा फायदा त्यांना पुष्कळच झाला. एकदां तर कस्तुरबांचें एक बाळंतपणच डॉक्टर आणि सुईण यांच्या मदतीशिवाय गांधीजींनाच करावें लागलें. स्वावलंबनाची पराकोटी त्यांनीं येथेंच गांठली होती. त्यामुळेंच त्यांच्या शिक्षणविषक योजनेंत त्यांनीं स्वावलंबनावर मोठा भर दिला आहे. येथील नर्सिंगच्याच अनुभवावर गांधीजींनीं बोअर युद्धांत सुमारें ११०० हिंदी स्वयंसेवकांचें एक शुश्रूषापथक तयार केलें होतें. त्या

युद्धांत प्रत्यक्ष गोळ्यांच्या फेरी जेथें झडत होत्या त्या युद्धभूमीवर जाऊन जखमी सैनिकांना उचलून आणण्याचें असामान्य धैर्य गांधीजींनीं दाखविलें होतें. ‘ काळा ’ आदमी म्हणून चेष्टा करणाऱ्या गोऱ्या लोकांना आणखी एक धडा गांधीजींनीं दिला.

## आत्मोद्धार

साध्या राहणीचें प्रतीक म्हणून सर्व जगानेंच गांधीजींचा गौरव केला आहे. परंतु ह्या साध्या राहणीला व स्वावलंबनाला खरी सुरुवात इ. स. १८९२ त गांधीर्जींनीं केली. धोबी आणि त्याचा अभिजात अनियमितपणा सर्वांना माहीतच आहे. गांधीजींना पण त्याचा कंटाळा आला. विशेषत: त्याच्या अधीन करणारा परावलंबीपणा त्यांना लज्जास्पद वाटूं लागला. झालें ! गांधीजींनीं धुण्याच्या शास्त्रावरील पुस्तकें गोळा केलीं. अभ्यास केला. (कॉलर) गळपट्टी ताठ राहावी म्हणून त्याला कांजी पण लावली. पहिला प्रयत्नच तो ! बॅरिस्टर गांधींची ती मूर्ति पाहतांच सर्व वकिलांनीं त्यांची चेष्टा सुरू केली ! परंतु बेडर बॅरिस्टर गांधी त्यांना काय भीक घालतात ? उलट त्यांनाच गांधीजींनीं स्वावलंबनावर प्रवचन ऐकविलें. एकदां तर यावरहि कडी केली ! त्याचें असें झालें कीं, गांधी एका गोऱ्या न्हाव्याकडे गेले. गोऱ्या न्हाव्यानें काळ्याचे केस कापण्याचें नाकारलें. गांधीजींना हा अपमान सहन होणें शक्यच नव्हतें. ते त्याच पावलीं बाजारांत गेले. कंगवा, कात्री व मशिन घेऊन आले. आरशांत बघून जसें जमेल तसे केस कापून टाकले आणि त्याच डोक्यानें कोर्टांत गेले. केस उंदरांनीं खाल्ले कीं काय म्हणून जो तो विचारूं लागला. सगळ्यांची हंसतां हंसतां मुरकुंडी वळली. पण गांधीजी कसले ! त्यांचें स्पष्टीकरण ऐकून तर सर्व आश्चर्यचकितच झाले. गांधीजींचें स्वावलंबन अशा गमतीदार पद्धतीनें सुरू झालें.

## आश्रम व शिक्षणविषयक पहिला प्रयोग

‘ टॉलस्टॉय ’ आश्रमांत गांधीजींनीं त्यांच्या या कल्पनांना जास्त मूर्त स्वरूप दिलें. आश्रमांतील लोकांना शाकाहार, ब्रह्मचर्य याविषयींचे कडक नियम तर घालून दिलेच, परंतु आश्रमांतील प्रत्येक व्यक्ति स्वावलंबी असलीच पाहिजे असाहि दंडक त्यांनीं घालून दिला. उपवासाचें अंत:शुद्धीकरितां

असलेलें महत्त्व याच वेळीं त्यांच्या प्रत्ययास आलें. टॉलस्टाय आश्रमांत मुलें पण बरींचशीं होतीं. नेहमीचें शिक्षण कुचकामी, निरर्थक गोष्टी देणारें आणि केवळ पुस्तकी असल्यानें गांधीजींनीं आश्रमांत त्याला कोठेंच स्थान दिलें नाहीं. गांधीजी स्वत: त्यांचे शिक्षक बनले. मुलांच्याकडून बागेंतील साफ-सफाई करवून घेणें, खड्डे खणून त्यांत रोपटीं लावणें, सागाचीं झाडें तोडणें, ओंडके उचलून वाहून नेणें, त्यांतूनच त्यांना शेतकीपासून तर जोडे तयार करण्यापर्यंत कोणत्या तरी एखाद्या धंद्याचें शिक्षण देणें हा अभिनव प्रयोग ते करून पाहात होते. शिक्षण जीवनोन्मुख करून वास्तविक व खऱ्या वातावरणांत दिल्यानेंच शीलसंवर्धन व व्यक्तीची सर्वांगीण उन्नति होते हें मत निश्ठेनें त्यांनीं येथेंच निश्चित केलें. यांतूनच सर्व शिक्षणव्यवस्थेवर आघात करणारी ' वर्धा योजना ' अनुस्यूत झालेली आहे.

यानंतरचें गांधीजींचें चरित्र सर्वश्रुतच आहे. आफ्रिकेंतला सत्याग्रह, इ. स. १९२० आणि इ. स. १९३० मधल्या सत्याग्रहाच्या चळवळी आणि स्वातंत्र्यसंपादनाकरितां त्यांनीं केलेले सर्व प्रयत्न यांची पुनरावृत्ति करावयाचें कांहींच कारण नाहीं. ह्याच स्वातंत्र्यविषयक चळवळींत त्यांनीं तरुण पिढीची ओळख करून घेतली होती. शिकलेल्यांचें ढोंगी वर्तन, स्वत:बद्दलची स्वाभि-मानशून्यता, किंकर्तव्यमूढता व जीवनावरची अश्रद्धा बघून भारताचें खरें कल्याण करावयाचें असेल तर तरुणांच्या खऱ्या आत्मिक विकासाच्या दृष्टीनें, त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीनें, आमूलाग्र बदललेली शिक्षणपद्धति दिली पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा गांधीजींना त्रास देऊं लागली. ह्याच तळमळींतून त्यांची मूलोद्योग शिक्षणपद्धति जन्मास आली.

## इंग्रजप्रणीत शिक्षणांतील दोष

महात्मा गांधीजींच्या वर्धा शिक्षण योजनेचें स्वरूप व वैशिष्ट्य समजून घेण्यापूर्वी आपल्या नेहमींच्या शिक्षणपद्धतींतील दोषांची नोंद घेऊं या !

पहिला दोष म्हणजे इंग्रजांनीं सर्व शिक्षणपद्धति ' कारकून ' निर्माण करण्याकरितांच योजलेली होती. त्यामुळें त्यांनीं तिचें स्वरूप केवळ पुस्तकी ठेवलें होतें. प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें नवीन नवीन प्रयोग होत असत. त्यांची पड-छाया सुद्धां आपलेकडे येऊं दिली नाहीं. राज्ययंत्र चालविणारे दुय्यम अधि-

कारीच त्यांना हवे होते, म्हणून इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व दिलें होतें. अनेक मुलांच्या डोक्यावर लादून सुद्धां त्यांचा परस्पर अनुबंध नव्हता. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या दृष्टीनें ती सर्वांच्या आटोक्यांत आणून देण्याचें मुळीं सुद्धां प्रयत्न केले गेले नाहींत. त्याचबरोबर एकंदर जीवनाशीं आणि ग्रामीण जीवनाशीं ती सुसंगत राहील असा कोणताच हेतु त्यांत असणें शक्य नव्हतें. उलट थोडेंसें इंग्रजी शिकून पांढरपेशे झालेले अर्धशिक्षित सुद्धां खेड्यांकडे नाकें मुरडून शहराकडे पळ काढीत होतें. शेतकीप्रधान देशांतील खेडेगांवचें जीवन उद्ध्वस्त झालें तर त्या देशाचा विनाशकाल जवळ येतो, ह्याची पण दखल कोणी घेईलसें वाटत नव्हतें. या सर्वांवर कळस म्हणजे कोणत्याहि उद्योगधंद्यांत प्रावीण्य संपादन न केल्यानें हा शिक्षित नुसता बेकार म्हणूनच हिंडू लागला होता. गांधीजींस या सर्व गोष्टी बेचैन करून टाकीत होत्या. स्वातंत्र्य मिळवावयाचें असेल तर व नंतर टिकवावयाचें असेल तर चांगला कणखर परंतु प्रामाणिक नागरिक तयार झाल्याशिवाय, तो संपूर्णपणें स्वावलंबी असल्याशिवाय, त्याचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय तें शक्य नाहीं ह्याची खात्री पटल्यानेंच गांधीजींनीं आपली वर्धा योजना इ. स. १९३७ सालीं भारतांतील विचारवंतांच्या पुढें सादर केली.

## योजनेचें स्थूल स्वरूप

१. मोफत व सक्तीचें शिक्षण सात वर्षें देणें.

२. सर्व शिक्षणक्रमांतील माध्यम हें 'मातृभाषा'च ठेवणें.

३. सर्व शिक्षण एखाद्या 'मूलोद्योगा' भोंवतीं निगडित करून ठेवावयाचें.

४. शिक्षणाच्या दैनंदिन उद्योगांतून 'अर्थोत्पत्ति' करून स्वावलंबनाचें शिक्षण मुलांना द्यावयाचें.

## योजनेचा अर्थ : मोफत व सक्तीचें शिक्षण

आज सुद्धां प्राथमिक शिक्षण सातवीपर्यंत सक्तीचें नाहीं. म. गांधींच्या योजनेनें तें प्रथमच राष्ट्रीय सरकारांना मान्य करावयास लावलें आहे. आज भारतेतर देशांत अशा रीतीच्या जबाबदाऱ्या तेथील सरकारकडून पार पाडल्या जात आहेत. भारतांतच फक्त हा सक्तीचा काल पांच वर्षांचा आहे. आज दुय्यम शिक्षणक्रम हा अत्यंत खर्चाचा झालेला आहे. त्यामुळें कित्येकांना

तो परवडतच नाहीं, परंतु वर्धा योजनेप्रमाणें सात वर्षांच्या ह्या अभ्यासक्रमांत इंग्रजीशिवाय मॅट्रिकपर्यंतचे सर्व विषय शिकविले जाणार आहेत. म्हणजे आजच्या मॅट्रिकपर्यंतचें सर्व शिक्षण यामुळें मोफत व सक्तीनें देण्यांत येणार आहे.

## मातृभाषा आणि माध्यम

आज दुय्यम शिक्षणाचें माध्यम जरी मातृभाषाच असलें तरी इंग्रजीचें वर्चस्व आपण अजूनहि झुगारून देऊं शकलों नाहीं. इंग्रजीमुळेंच आपला उद्धार होणार आहे ही निष्ठा आजहि आपण उराशीं कवटाळून बसलों आहोंत. महात्मा गांधींनींच प्रथम अत्यंत धीटपणें ' मातृभाषेचें शिक्षण ' म्हणजे खऱ्या सुशिक्षणाचा पाया आहे असें हिंदुस्थानांतील विचारवंतांना सांगितलें. मातृभाषेच्या अभ्यासांतून सांस्कृतिक, सामाजिक ठेवा खुला होतो. त्यांतूनच सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तींचें दर्शन घडतें असा त्यांचा विश्वास होता.

## मूलोद्योगकेंद्रित धारणा व स्वावलंबन

आजचें सर्व शिक्षण हें जीवनापासून फारकत करवून घेतलेलें आहे. त्यामुळें त्यांतील बऱ्याच गोष्टींचा अर्थ व उपयुक्तता हीं आजन्म आपणांस आकलन होत नाहींत. कृत्रिम वर्गाच्या चार भिंतींत कोंडल्यामुळें आजचीं मुलें गुदमरल्यासारखीं झालीं आहेत. त्यांना महात्मा गांधींनीं हाताशीं धरून मोकळ्या वातावरणांत खेळावयास, हंसण्यास, नाचण्याबागडण्यास, पाहिजे त्या गोष्टींत, हव्या त्या उद्योगाच्या खटपटींत ' ठोक ठोक ' करण्यास संपूर्ण परवानगी दिली आहे. आपणांस आवडणाऱ्या उद्योगाच्या परिपूर्णतेसाठीं तो इतर विषय शिकणार असल्यानें सर्व विषयांचा ' समवाय ' ' अनुबंध ' परस्पर नातें राखूनच तो तें सर्व समजून घेणार आहे. म्हणून तें सर्व ' अर्थवाही ' ठरणार आहे. त्यांतच त्या उद्योगांत तो ज्या वस्तु निर्माण करणार आहे त्या सर्व सरकारनें विकत घ्यावयाच्या आहेत. आपण पैसे मिळवितों या आनंदांतूनच तो खराखुरा स्वावलंबी बनणार आहे. राष्ट्रीय जबाबदारीचे प्राथमिक पाठ तो येथेंच गिरविणार आहे.

## महात्माजींचें ऋण

ही योजना म्हणजे खेड्यांतील मुलांच्या शिक्षणांत एक मोठी क्रांति आहे. आणि विशेष म्हणजे त्यांत पश्चिमेकडून येणाऱ्या भल्याबुऱ्या वाऱ्यांचे संस्कारहि नाहींत. 'हात हें ज्ञानाचें, विचाराचें प्रभावी इंद्रिय आहे आणि तें बुद्धि व भावना जागृत करणारें हमखास साधन आहे,' हें तत्त्व आपण प्रथमच मान्य करणार आहोंत. सर्व विषयांची आंवळ्यांच्या मोटेप्रमाणें मोट बांधावयाचा उपद्व्याप सोडून आपल्या जीवनाच्या व्यापाराशीं ज्या ज्या गोष्टींचा अनुबंध आहे त्या त्या गोष्टींत जागरूक राहावयास शिकणार आहोंत.

आपणांस केवळ 'ज्ञानवृद्धीची' आवश्यकता नाहीं. त्यामुळें 'बौद्धिक भुतेंच' तयार होतात व तीं स्वतःच्या पाशवी तृष्णा शांत करण्याकरितां मानवतेचें 'संहारयज्ञ' केव्हांहि करूं शकतात. हेंच विशेष जोर देऊन गांधीजींनीं सांगितलें आहे. आज आवश्यकता आहे ती जीवनसमृद्धीची. जीवन जसजसें संपन्न होईल तसतसें तें अधिक समृद्ध करण्याकरितां जास्त ज्ञान संपादन करावें; ही भूक वाढतच जाते. अशा रीतीनें मिळविलेलें ज्ञान भाररूपहि होत नाहीं. त्यांतूनच मानवतेच्या कल्याणाचें खरेंखुरें समाधान मिळतें.

आज नोकऱ्याच मिळविणें हें आपलें ध्येय आहे. परंतु या योजनेनें 'जगण्यासाठीं शिक्षण' ही संकुचित वृत्ति सोडून द्या असेंच गांधींनीं सांगितलें आहे. गांधीजी आपणांस सांगत आहेत कीं, "जगत असतांना शिक्षण घ्या व शिक्षणद्वारा जीवनाची ओळख करून घ्या."

बाकी सर्व गोष्टी जरी आपण दूर सारल्या तरी मुलांच्या लहानशा, वयाला अनुसरून व प्रत्यक्ष विधायक कार्य करीत असतांना, खेळत असतांना, हंसत असतांना त्यांना शिकूं द्या, एवढेंच त्यांनीं सांगितलें असतें तरी आपणांस भारताच्या या पित्याचें ऋण मान्य करण्याकरितां कृतज्ञता म्हणून अभिवादन करावेंच लागलें असतें.

× × ×



# ३ ☆ महर्षि अण्णासाहेब कर्वे

## पेशवाईनंतर

मुंबई प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत इ. स. १८१८ मध्यें संपूर्णपणें आला. नवीन राज्यपद्धति सुरू झाली. नवीन राज्यव्यवस्थेला उपयोगी पडणारे कारकून आणि त्यांचे-वरचे अधिकारी मात्र तावडतोब मिळणें अशक्यच होतें. कारण पेशवेकाळांत जे संस्कृत पंडित शिकून तयार होत असत त्यांचा या दृष्टीनें इंग्रजांना फारसा उपयोग होणें शक्यच नव्हतें. त्यामुळें राज्ययंत्र चालविण्याच्या सोयीचें हिंदी लोकांना शिक्षण देणें आवश्यक वाटूं लागलें होतें. यांतूनच नवीन शिक्षण-व्यवस्था निर्माण झाली आणि जुन्या पाठशाला हळूहळू बंद करण्यांत आल्या. प्रथम प्रथम इंग्रजी चार बुकें शिकलेल्या लोकांना सुद्धां नोकरी तावडतोब द्यावी लागत असे. यामुळें आपली जुनी शिकण्याची पद्धत टाकाऊ आहे, आपली संस्कृति हीन असल्यानें त्यांच्याच पद्धतीचें अनुकरण करून आपल्या तरुणांना शिक्षण दिलें तरच आपली उन्नति होईल अशी खात्री लोकांना वाटूं लागली होती. सुरुवातीला नोकऱ्या त्वरित मिळत असल्यानें तर इंग्रजी

शाळांचें आकर्षण वाढतच होतें. ह्याच शिक्षणांतून स्त्रियांची उन्नति घडवून आणतां येईल असाहि गैरसमज मोठमोठे पुढारी सुद्धां करून घेत असत. सर्वच लहानथोर प्रवाहपतितांनीं 'इंग्रजी ज्ञानगंगे'च्या या लाटेपुढें आपलीं मस्तकें आदरानें झुकविलीं. परंतु परकीयांनीं त्यांच्या फायद्याकरितां सुरू केलेल्या ह्या पद्धतींत आपला फायदा होण्यापेक्षां शेवटीं नुकसानच आहे, त्यांतच आपली अधोगति आहे, इंग्रजांच्या वेगडी अनुकरणांतच भारताचें अकल्याण आहे हें फार थोड्यांच्या लक्षांत आलें, ही लाट थोपवून धरली नाहीं तर, आणि स्वतःच्या गरजा लक्षांत घेऊन शास्त्रशुद्ध शिक्षणपद्धति निर्माण केली नाहीं तर आपण भलतीकडे वाहावत जाऊं हें जाणून ह्या प्रचंड लाटेचा वेग थोपवून धरण्याचे 'भगीरथ' प्रयत्न ज्यांनीं केले त्यांपैकीं महर्षि कर्वे हे एक होते. त्यांनींच भारताला ह्या शिक्षणपद्धतीच्या आहारीं जाऊं नको असें आवर्जून सांगितलें. म्हणूनच त्यांची शिक्षणविषयक कामगिरी बहुमोल ठरते. देश स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणपद्धतींत जे बदल होऊं घातले आहेत ते सर्व नीटपणें समजून घ्यावयाचे असतील तर शिक्षणमंदिराच्या ह्या 'पुंडलिका'च्या पायरीला वंदन केल्याशिवाय गाभाऱ्यांत जातांच येणार नाहीं.

## जन्मभूमि

महर्षि कर्वे यांचा जन्म इ. स. १८५८ त म्हणजे मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेनंतर दोनच वर्षांनीं झाला. त्यांची खरी जन्मभूमि शेरवली; परंतु बरेंचसें बालपण 'मुरुड' येथें गेल्यानें त्यांना मुरुडच जन्मभूमि वाटते. ह्या मुरुडबद्दल कर्वे यांना प्रेम आणि अभिमान अतोनात होता. एकतर मुरुड हें दक्षिण कोंकणांतलें उत्तम हवेचें गांव आणि दुसरें म्हणजे या मुरुड गांवांतूनच कै. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक व कै. वामन आबाजी मोडक (एल्फिन्स्टन हायस्कूलचे पहिले हिंदी प्रिन्सिपॉल) यांच्यासारखे मोठे पुरुष निर्माण झालेले होते.

## पूर्ववृत्त

अण्णासाहेब कर्वे यांचे पणजे रघुनाथराव फार मोठे कर्तृत्ववान् सावकार आणि दुकानदार होते. इ. स. १७४४ त त्यांनीं पुण्यांत तर मोठें दुकान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत,
अनुक्रम ........ महर्षि अण्णासाहेब कर्वे : ४३
क्रमांक ........

ठेविलेलें होतेंच, पण गुजराथेंत सुद्धां ते मक्त्यानें जकाती वसूल असत. त्यांच्या कर्तबगारीची एकच गोष्ट सांगितली म्हणजे पुरे ! त्यांनीं दमाजी गायकवाड सेनाखासखेल यांना साडेसहा लाख रुपये कर्जाऊ दिले होते. परंतु सुदैवानें अण्णासाहेबांना ह्या श्रीमंतीचा फायदा मिळावयाचा नव्हता. सुदैवच म्हणावयाचें ! कारण ते जर अशा श्रीमंतींत वाढले असते तर इतर श्रीमंतांच्या मुलांप्रमाणें नुसतें ' धोंडो 'च राहिले असते. त्यांच्या कर्तृत्वाला खरा उजळा त्यांच्या गरिबीनेंच दिलेला होता. त्यांच्या वडिलांनीं म्हणजे केशवरावांनीं वडिलोपार्जित संपत्ति म्हणून ' वीसपंचवीस रुपये ' आणि तेवढ्याच किंमतीचीं भांडीं घेऊन संसाराला सुरुवात केली. लाखों रुपयांची लक्ष्मी दोन पिढ्यांतच कर्वे घराण्यावर रुसली होती; परंतु सरस्वती मात्र तेथेंच नांदत होती. त्यामुळेंच संपत्ति गेली तरी घराण्याची सुसंस्कृतता अढळच होती. आपल्या ह्या सुसंस्कृततेबद्दल अण्णासाहेबांना मोठा अभिमान. ' सुवृत्त व उद्यमशील मातापितरांच्या पोटीं जन्माला आलों ' असें म्हणून ते आपल्या आयुष्यांत पितृऋणाची परतफेड करण्यास फार जपत. आजोळबद्दलहि असाच अभिमान त्यांना होता. कारण त्याच घराण्यांतून रँगलर र. पु. परांजपे यांच्यासारख्या श्रेष्ठ व्यक्ति निर्माण झालेल्या आहेत. कर्वे घराण्याची परंपरा आणखी उज्ज्वल करण्याची पराकाष्ठा आज अण्णासाहेबांचीं मुलें करीत आहेत. शंकरराव हुषार डॉक्टर, रघुनाथराव निरपेक्ष सुधारक, दिनकरराव यशस्वी प्राचार्य तर भास्करराव मान्यता पावलेले शिक्षणतज्ज्ञ म्हणून सर्वत्र महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत.

## बालपण

भारतीय महिला विद्यापीठाच्या स्थापनेसारखी अत्यंत मोठी कामगिरी करणाऱ्या ह्या समाजसुधारकाचें आणि शिक्षणतज्ज्ञाचें बालपण मात्र अगदींच सामान्य होतें. त्यांचें सहाव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण मुरुड गांवांतच झालें. शाळेंत हुषार म्हणून ते चमकले नसले तरी त्यांची वाणी खणखणीत, शुद्ध आणि स्पष्ट असे. वाचनहि फार चांगलें होतें. परंतु वाणी खणखणीत असली तरी ' मुख ' मात्र ' दुर्बल 'च होतें. कारण योग्य वेळीं स्वतःचें मत किंवा स्वतःची बाजू समजावून सांगण्याची संधि आली कीं शाळेंतला धोंडू मुखावाटे शब्द

काढील तर शपथ ! ओठांच्या बाहेर शब्द लोटणें या ' मुखदुर्बला 'ला म्हणजे महाकर्म कठीण !

इ. स. १८७५ ची गोष्ट. त्या वेळीं सहाव्या इयत्तेची परीक्षा शिक्षणखात्या-तर्फे होत असे. परीक्षा कांहीं ठराविक केंद्रांतच होत असे. सप्टेंबरांत ती घेतली जात असल्यानें पावसाचा त्रास भयंकर ! मुरुडहून मुंबईला जावयाचें म्हणजे रत्नागिरीहून समुद्रानें जावें लागे. त्यांत खाड्या आणि समुद्र यांमुळें प्रवास नेहमीं अनिश्चितच. कांहीं वेळां तर गलबत मध्येंच थांबावयाचें. या गोष्टी लक्षांत घेऊन श्री. कर्वे यांनीं चिपळूणवरून सातारा शहरीं जावयाचें ठरविलें. जवळजवळ पन्नास कोसांचा प्रवास पायींच करावा लागला. मजल दरमजल करीत त्यांनीं व त्यांच्या सोबत्यांनीं कसेंबसें परीक्षेच्या दिवशीं सकाळीं सातारा गांठलें. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना कमिटीसमोर जाऊन नांव नोंदवावें लागे. आजच्यासारखी फॉर्म्स पाठविण्याची सोय नव्हती. कर्वे यांचे सर्व सोबती नांवें नोंदवूं शकले. शरीराची लहानशी ठेवण असल्यानें कर्वे यांना मात्र तूं लहान आहेस. तुला १७ वर्षें पुरीं झालीं कीं ये, असें ऐकावें लागलें. मुरुडच्या हेडमास्तरांनीं वयाचा दाखला दिलेला असतांना सुद्धां ' धोंडूनें ' तोंडांतून ' ब्र ' काढला नाहीं आणि पन्नास कोसांची वाटचाल धुळीस मिळविली. परंतु चिकाटीनें ध्येयप्राप्तीकरितां पन्नास कोसांची मजल मारणाऱ्या कर्वे यांची तपस्याच शंभर वर्षांची आयुष्यवाट सामर्थ्यानें चालण्यास मदत करूं शकली.

मित्रा धोंडू इंग्रजी शाळेंत सुद्धां असाच मुखदुर्बल होता. इंग्रजी पांचवीतील गोष्ट. ते मुरुड सोडून मुंबईच्या रॉबर्ट मनी हायस्कुलांत इंग्रजी शिकण्याकरितां आले होते. इंग्रजी शिकविण्याकरितां त्यांना जॅक्सन साहेब हा शिक्षक होता. रोज प्रत्येक विद्यार्थ्यानें सकाळी कॉपी काढून ठेवावयाची, नंतर जॅक्सन साहेबानें फुरसत मिळतांच ती तपासून त्यावर शेरे द्यावयाचे व नंतर पुस्त्या परत करावयाच्या. एक दिवस कर्वे यांच्या पुस्तीला Good शेरा मिळालेला बघून कांहीं विघ्नसंतोषी मुलांच्या पोटांत दुखूं लागलें. कर्वे यानें पुस्ती दुसऱ्या कोणाकडून तरी काढून घेतली असली पाहिजे असें शिक्षकांच्या डोक्यांत भरवून दिलें. झालें ! जॅक्सन साहेब भडकले. छडी आणली गेली. वस्तुत:

कर्व्यांनीं स्वतःच खूप काळजीनें कॉपी काढलेली असल्यानें हस्ताक्षर चांगलें आलें होतें. २१ वर्षांच्या ह्या 'छोटचा' विद्यार्थ्याला सर्व वर्गासमक्ष न केलेल्या अपराधाबद्दल आतां छडीचा प्रसाद खावा लागणार होता. कर्व्यांच्या अंतःकरणांत काहूर उठलें. परंतु काहुराला वाचा फुटेना. 'मीं कॉपी स्वतःच लिहिली आहे' हे शब्द ओठापर्यंत येत; परंतु भित्रा धोंडू त्या शब्दांना बाहेर लोटावयाच्या ऐवजीं आंतच ढकलीत होता. सुदैवानें जॅक्सनच्या डोक्यांत पुनः कॉपी काढण्यास सांगण्याची कल्पना आली, आणि कर्वे यांची विटंबना थांबली. आपल्या भित्रेपणाची जाणीव त्यांना त्यांच्या आयुष्यभर होत होती. म्हणूनच ते म्हणत, "माझ्या भित्रेपणाला कधींहि औषध मिळालेलें नाहीं."

## हुषार विद्यार्थी

विद्यार्थिदशेंतील कर्वे यांचा भित्रेपणा बाद केला तर मात्र नमुनेदार विद्यार्थी म्हणूनच निर्देश करावा लागेल. त्या वेळचे पंचविशीच्या आंत बाहेर असणारे विद्यार्थी फुरसतीचा वेळ कीर्तन, प्रवचन व कलावंतिणीचें गायन ह्यांच्या श्रवणभक्तींत खर्च करीत असत. परंतु कर्वे मात्र एकमार्गी असल्यामुळें आणि अभ्यास व आपण यापलीकडे फारसें लक्ष देत नसल्यामुळें त्यांना शाळेंत पहिली शिष्यवृत्ति मिळत असे. शिष्यवृत्ति मिळविण्याचें हें व्रत त्यांनीं विल्सन व एल्फिन्स्टन या दोन्ही कॉलेजांत सुरू ठेविलें होतें. हुषार असल्यानेंच ते इ. स. १८८४ त बी. ए. ची. परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास होऊं शकले.

## नोकरीचा श्रीगणेशा

कॉलेजचें शिक्षण सुरू असतांनाच ते युरोपियन अधिकाऱ्यांना व मिशनरींना गणित वगैरे शिकवीत असत. बी. ए. होतांच त्यांच्या प्राध्यापकांनीं त्यांची विशेष शिफारस केली आणि कर्वे हे एल्फिन्स्टन हायस्कुलांत गणिताचे शिक्षक झाले. सरकारी नोकरी म्हणजेच जीवितसर्वस्व असें त्यांनीं मानलें असतें तर ते तेथेंच कायम राहूं शकले असते. पण पुढें करावयाचा असलेला शिक्षणप्रयोग त्यांना तसें करूं देणें अशक्य होतें. त्यांनीं सरकारी नोकरींत चिटकून राहावयाचें नाहीं असेंच ठरविलें आणि शिकवण्या करून एम्. ए. चा अभ्यास चालू ठेवला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अवांतर आणि पुरवणी वाचनाची

आवश्यकता फार असते. ह्या अवांतर वाचनाच्या अभावीं स्त्रीशिक्षणविषयक नवें तत्त्वज्ञान त्यांना भारतांत असें नांवलौकिकास आणतांच आलें नसतें. अत्यंत महत्त्वाचें असें वाचन ह्याच काळांत त्यांनीं केलेलें होतें. राल्फ व्हाल्डो ट्राइन या अमेरिकन लेखकाचें 'अनंताशीं साधर्म्य' हें पुस्तक ह्याच वेळीं त्यांनीं आत्मसात् केलें होतें. स्पेन्सर व आगरकर यांचे लेख तर मोठ्या भक्तिभावानें ते वाचीत असत. खरा समाजसुधारक होण्याची पूर्वतयारी अशा रीतीनें आगरकरांच्या चरणीं बसूनच ते करीत असत.

## गृहस्थाश्रम : संयुक्त कुटुंबाचा प्रयोग

अनाथ बालिकाश्रमासारख्या मोठ्या कुटुंबाची स्थापना पुढें करतां यावी म्हणूनच कीं काय, आश्रमव्यवस्थेचे प्राथमिक पाठ मुंबई येथील गृहस्थाश्रमांत ते गिरवीत होते. इतर समाजसुधारकांनीं गृहस्थाश्रमांत जें करून दाखविलें नाहीं तें प्रा. कर्वे यांनीं करून दाखविलें आहे. तो प्रयोग म्हणजे संयुक्त कुटुंबाचा प्रयोग! स्वतःचेंच कुटुंब नीटपणें चालविणें मुळांत दुर्घट. मग मित्राचें आणि आपलें असें एकत्र कुटुंब यशस्वीरीत्या अनेक दिवस चालविणें तर त्याहूनहि महा कठीण! पण श्री. कर्वे यांच्या सोशिकतेमुळें आणि प्रेमळपणानें हा एक अभिनव प्रयोग यशस्वी होऊं शकला. नरहरपंत जोशी आणि कर्वे त्यांतील मुख्य घटक होते. एकत्र राहात असल्यानें बोलाचालीचे प्रसंग आलेच नाहींत असें नाहीं. पण 'भांड्यास भांडें लागल्याचें' बाहेर मात्र कोणाला ऐकूं आलें नाहीं. त्यामुळेंच गैरसमजहि निर्माण झाले नाहींत. ह्याच अनुभवाचा फायदा त्यांना हिंगणें येथील अनेक संस्था चालवितांना झालेला होता. मुलांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेंतहि हीच योजकता त्यांनीं दाखविली होती. सर्वांत मोठा मुलगा शंकर. त्यानें उत्तम डॉक्टर व्हावें म्हणून त्याला लागणारा सर्व खर्च कर्ज समजून त्यानें डॉक्टर होतांच परत करावा. त्या फेडीतून दिनकर जर्मनीला जाऊं शकला. दिनकरनें सर्व ऋण परत केल्यावर भास्कर इंग्लंडला जाऊं शकला. सर्वच मुलें विलायतेस कशीं गेलीं, या प्रश्नाला किती चोख उत्तर आहे हें!

## सामाजिक कार्याचा ओनामा

गृहस्थाश्रमांतील सर्व जबाबदाऱ्या पार पाडीत असतांना त्यांनीं सामाजिक

जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष मात्र मुळींच केलें नाहीं. कारण कुटुंबसुखांत गुरफटून न जातां साधेल तितकें इतरांकरितां झटणें हें जणूं कांहीं त्यांच्या रक्तांतच भिनलेलें होतें. त्यामुळें मुरुडला असतांना सुद्धां व नंतरहि कोठें देवालयाचा जीर्णोद्धार कर, गांवांतलें शालागृह बांधून दे, गांवांत इंग्रजी शाळा स्थापन करण्याची खटपट कर, तर एखाद्या स्नेहवर्धक मंडळीची स्थापना कर, इत्यादि सामाजिक खटपटी चालूच होत्या. क्रिकेट-पटूनें साध्या सामन्यांतून धांवांचे डोंगर रचण्याचा अभ्यास करून मोठ्या सामन्यांत नेत्रदीपक टोलेबाजी करावी तद्वतच त्यांचे हे सामाजिक कार्यांतील पहिले-वहिले प्रयत्न म्हणतां येतील.

## प्रथम पत्नी राधाबाईंची सोबत

श्री. कर्वे ह्यांच्या ह्या कार्यात मुख्य मदत जर त्यांना कोणाची झाली असेल तर ती राधाबाईंचीच होय. संयुक्त कुटुंबाच्या खस्ता खाण्याचें असो किंवा स्वतःच्या खर्चाला कात्री लावून ' मुरुड फंड ' उभा करावयाचा असो, राधाबाईंनीं नेहमींच आपल्या पतीला साथ दिलेली होती. म्हणूनच जेव्हां जेव्हां त्यांचें स्मरण कर्वे यांना होई तेव्हां तेव्हां ' राधाबाई फार थोर मनाची बायको होती, ' या उद्गारांनीं त्यांचा गौरव केला जात असे. कर्वे यांची संगत इ. स. १८९१ मध्यें राधाबाईंनीं सोडली व त्या निजधामास गेल्या.

## घन तमीं शुक्र बघ राज्य करी

कधीं कधीं वाइटांतूनच चांगलें निघतें म्हणतात. राधाबाईंच्या निधनाची आपत्ति एका अर्थानें अशीच इष्टापत्ति ठरलेली दिसते. त्यांच्या निधनानेंच कर्वे यांच्या आयुष्याला निराळें वळण लावलें, एवढेंच नव्हे तर त्यांच्या कर्तृत्वाची परीक्षा पण घेतली. प्रथम योगायोग म्हणजे शालेय वातावरणांतून निघून ते कॉलेजच्या वातावरणांत शिक्षक म्हणून जाऊं शकले. एखाद्याच्या पाठीमागें दैव हात धुऊन लागतें, तर कित्येकांच्या पाठीमागें दैव जणूं कांहीं हात जोडून उभें असतें. कर्वे यांना तरी निदान दैवानें नेहमींच हात दिलेला होता. त्यामुळें सामाजिक कार्याला आवश्यक असें स्थलांतरहि घडलें. फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाल्यानें ते टिळक-आगरकरांच्या कर्मभूमींत राहूं शकले. मुंबई सोडून पुणें शहरांत वास्तव्य करूं लागल्यानेंच

त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला एक विशेष प्रकारची धार येऊं शकली. पुणें शहरांत गेल्यानंतर सुद्धां ' माझ्या एकमार्गी स्वभावाप्रमाणें आपलें घर व कॉलेज यापलीकडे मीं पाहिलें नाहीं, कोणत्याहि सभेला अगर व्याख्यानाला गेलों नाहीं, कोणा मोठ्या मनुष्याची ओळख करून घेतली नाहीं, आपले धडे घरीं तयार करावेत आणि कॉलेजांत जाऊन शिकवावें. पांच-सहा मैलांचें तरी हिंडणें दररोज झाल्यावांचून मला कधीं चैन पडलें नाहीं. ' असें ते म्हणत. कॉलेजांत शिकविण्याचें काम इतक्या प्रामाणिकपणें केल्यानेंच त्यांना सोसायटीनें लाईफ मेंबर करून घेतलें होते.

## सामाजिक सुधारणेचें पहिलें पाऊल : ' पुनर्विवाह '

स्त्रियांची स्थिति आणि त्यांतहि हिंदु बालविधवांची करुणाजनक स्थिति आणि ह्याचें प्रत्यक्ष स्वरूप कर्वे ह्यांनीं स्वतःच्या परिसरांत पाहिलेलें होतें. आगरकरांचे ते भक्त असल्यानें स्त्रियांच्या सुधारणेबद्दलचीं त्यांचीं मतें बरींच प्रगतिपर होतीं. त्यांतच महाराष्ट्रांतील पहिल्या पुनर्विवाहानें भर घातली होती. हा पुनर्विवाह मुंबईला ता. १५ जून १८६१ मध्यें घडून आलेला होता. त्यांतील पुनर्विवाहित वधू रेणुबाई ही मुरुडचीच होती. त्यामुळें त्या वादळाचे प्रत्यक्ष तडाखे मुरुडपर्यंत गेलेले होते. नरहरपंतांच्या वडील बहिणीचें अत्यंत हृदयद्रावक वैधव्य त्यांनीं जवळून अभ्यासिलेलें होतें. या सर्वांचा परिणाम प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्यांचें विवेकी मन त्यांना खडसावून विचारी, " तूं सामान्य माणसाप्रमाणें भ्याड मनानें जनरूढीला बळी पडणार, कीं मनाला पवित्र वाटणाऱ्या व कांहीं थोर विभूतींनीं घालून दिलेल्या नवीन मार्गाचें धैर्यानें अवलंबन करणार ? " मोठमोठ्या सुधारकांना सुद्धां जें करून दाखवितां आलें नाहीं तें श्री. कर्वे यांनीं पुण्यांतील सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता ११ मार्च १८९३ रोजीं करून दाखविलें. नरहरपंत जोशी यांच्या विधवा बहिणीशीं – गोदूताईशीं – त्यांनीं ' पंडिता रमाबाईंच्या ' सदनांत पुनर्विवाह केला. प्रसिद्ध डॉ. भांडारकर त्या वेळीं स्वतः आशीर्वाद देण्याकरितां हजर होते. पुनर्विवाहाचें व्रत किती कठीण होतें ह्याची स्पष्ट कल्पना समाजानें त्यांना कसें वागविलें हें बघून सहजच येतें.

## सत्त्वपरीक्षा

विवाह झाल्यानंतर श्री. आणि सौ. कर्वे यांना प्रि. आगरकरांनीं जेवायला बोलावलें होतें. सौ. आगरकरांनीं गोदूताईची (आतां आनंदीबाईंचीं) खणा-नारळानें ओटी भरली. परतु पुण्यांतील एकंदर मागासलेल्या लोकांना मात्र त्यांत फारच आश्चर्य वाटलें. आणि पुनर्विवाहाचीं 'माणसें' तरी कशीं आहेत हें बघण्याकरितां रस्त्यावर दुतर्फा ही गर्दी जमली होती. जणूं कांहीं इंग्लंडच्या राजाची गाडीच तिकडून जाणार होती. हें झालें सर्वसाधारण माणसांचें ! परंतु कर्वे यांच्या कॉलेजमधील प्रोफेसर सुद्धां त्यांना 'अस्पृष्ट' मानीत. त्यांच्या बायका सौ. आनंदीबाई पुनर्विवाहाच्या म्हणून त्यांना कुंकू लावण्याचें सुद्धां टाळीत. कर्वे यांना खरा आहेर मुरुडच्या लोकांनींच दिला. लग्नानंतर जेव्हां कर्वे प्रथम मुरुडला गेले तेव्हांचा प्रसंग. कर्वे गांवांत आल्याची बातमी हां हां म्हणतां विद्युत्‌वेगानें गांवभर पसरली. दहा-दहा, पांच-पांच लोकांचे थवे रस्त्यावर जमून त्यामध्यें कर्वे यांना कसें वागवावयाचें यासंबंधीं चर्चा होऊं लागली. 'गांवकी' बोलवावयाचें ठरलें. अठरा वर्षांवरील प्रत्येक ब्राह्मण गांवकीचा सभासद म्हणून हजर राहिला. त्यांत गांवांतील नवशिक्षित लोकहि हजर होते. कर्वे ह्यांच्या बाजूनें एकहि आवाज निघाला नाहीं. ज्या मुरुड गांवाकरितां त्यांनीं वऱ्याच खस्ता खाल्ल्या होत्या त्याच ठिकाणीं खालील ठराव सर्वसंमत म्हणून मान्य करून घेतला गेला :

(१) कर्वे यांना एका बैठकीवर घेऊन कोणीं बसूं नये.

(२) ते ज्या सभेंत असतील त्या सभेला कोणी जाऊं नये.

(३) ते घरीं उतरले तर त्यांच्या बंधूसहि बहिष्कृत करावें.

ह्या कडक शिक्षेमुळे तर त्यांच्या बंधूस भ्रमिष्टासारखेंच झालें. त्यामुळेंच सात-आठ वर्षे कर्वे ह्यांना स्वतःच्या घरांत पाऊल ठेवतां आलें नाहीं. केवढी कडक शिक्षा ! आणि अपराध काय तर एका गतभर्तृकेला पुनः जीवन मिळवून दिलें. 'धिक्कार असो तुला हिंदुधर्मा ! ' असेंच आगरकरांसारखें नाइलाजानें म्हणावें लागतें.

## रूढि पिशाचिकें

पुनर्विवाहानंतर कर्वे याचा हा कटु अनुभव पुष्कळसा त्यांच्या सुधारणा-

विषयक कार्याला जबाबदार आहे. हिंदुधर्मातील ह्या रूढयांची त्या वेळीं तर त्यांना फारच चीड आली होती. म्हणून ते तळमळून म्हणत. "रूढि पिशाचिके, तूं कसल्या शृंखलांनीं या हिंदुसमाजाला जखडून टाकलें आहेस ? वरून धर्माचें पांघरूण घेऊन अधर्म हाच धर्म असें तूं अज्ञ हिंदुसमाजाला भासवीत आहेस ! हातापायांतील श्रृंखलांना हीं हस्तपादभूषणें म्हणून तूं कवटाळीत आहेस व हें पाहून आपल्या पराक्रमाचें कौतुक करीत तूं आनंद-सागरांत डुलत आहेस ! धिक्कार असो या तुझ्या कृतीला !" ह्याच रूढींच्या विरुद्ध त्यांना युद्ध पुकारावें लागलें. पहिला पुनर्विवाह निदान पुण्यांत तरी इ. स. १८७४ मध्यें झालेला होता. त्यानंतर १९ वर्षेपर्यंत रूढीच्या प्राबल्यानें दुसरा पुनर्विवाह होऊंच शकला नाहीं. पुढेंहि तीन वर्षांत कर्वे ह्यांचा असा एकच पुनर्विवाह झाला. त्या बावीस वर्षांच्या कालांत फक्त चारच पुनर्विवाह ! लोकांत जागृति करतां यावी व रूढि-पिशाचिकेला हुसकावून लावतां यावें म्हणून इ. स. १८९४ मध्यें कर्वे यांनीं विधवाविवाहाला उत्तेजन देणारी संस्था स्थापन केली. याच संस्थेला पुढें इ. स. १८९५ नंतर 'विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळी' असें नांव दिलें गेलें. प्रा. कर्वे यांच्या सर्व सामाजिक कार्याचें बीज ह्याच प्रथमच्या कार्यांत आहे.

## विधवाविवाहांतून विधवा-शिक्षणाकडे

समाजसुधारकाचें कार्य बहुतांशीं लढवय्याप्रमाणेंच असतें. एखाद्या लहानशा लढाईंत जय मिळवावा म्हणजे मोठला लढाईंत जय मिळविण्याची आकांक्षा उत्पन्न होते. त्यांत तो यशस्वी झाला म्हणजे मोठाल्या युद्धांत जय मिळविण्याचें सामर्थ्य अंगीं येतें. अगदीं तसेंच कर्त्या समाजसुधारकांचें असतें. अगदीं लहानशी समाजसुधारणा हातीं घ्यावी कीं लगेच त्यापेक्षां जास्त महत्त्वाची सुधारणा हातीं घेण्याची आवश्यकता त्यांना पटावी. ती हातीं घेतांच त्यापेक्षां जास्त मूलगामी समाजसेवा करण्यास त्यांनीं उद्युक्त व्हावें. आणि त्यांतून समाजाला शाश्वत स्वरूपाचें तत्त्वज्ञान द्यावें. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्याचीं व मानवतेचीं तत्त्वेंसुद्धां आफ्रिकेमधील लहानशा अन्यायविरोधी चळवळींतूनच अनुस्यूत झालेलीं आहेत. कर्वे ह्यांच्या महिला-विद्यापीठाच्या कल्पनेचा उगम सुद्धां त्यांच्या ह्या विधवांच्या कळकळींतच होता असें सहजच म्हणतां येईल.

पुर्नविवाहाच्या कार्यांत मन घातल्यापासून लोकांशी जो संबंध आलेला होता त्यावरून त्यांना असें वाटूं लागलें होतें कीं, पुर्नविवाहास आवश्यक असलेलें धाष्टर्य लोकांच्या ठिकाणीं फार कमी होतें. विधवा सुद्धां ह्या विवाहाला कोत्या धर्मकल्पनांमुळें, चमत्कारिक नीतिकल्पनांमुळें विरोध करीत. त्यामुळें विधवांना सुशिक्षण देऊन योग्य नीति-कल्पना समजावून दिल्याशिवाय त्या धैर्य तरी कशा दाखवणार ? सनातनी लोकांत पुष्कळ प्रयत्न करून एखादा दुसरा विवाह घडवून आणतां येत असे. 'पुर्नविवाहाच्या प्रश्नांशीं झगडत राहून जितक्या विधवांना कष्टमय स्थितींतून वाहेर काढतां येईल त्यापेक्षां विधवांच्या शिक्षणाचा प्रश्न हातीं घेऊन किती तरी पट अधिक विधवांना सामाजिक जुलुमांतून मुक्त करतां येईल,' असाहि विचार अण्णासाहेबांच्या डोक्यांत येऊं लागला होता. पुर्नविवाह ही धार्मिक वाव म्हणून त्याला तीव्र विरोध होता. तसा धर्माच्या नांवाखालीं विधवाशिक्षणाला विरोध सनातन्यांना करतां येणें कठीणच होतें, म्हणून विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळांतून त्यांनीं अनाथ वालिकाश्रमाची स्थापना केली.

८२९८

## अनाथ बालिकाश्रम

सुरुवातीला म्हणजे इ. स. १८९६ मध्यें आश्रमांत सात विद्यार्थिनी दाखल झाल्या आणि ९७ सालापर्यंत कर्वे यांनी सर्वच जातां ३२०० रु. आश्रमाकरतां केवळ शिल्लक म्हणून ठेविले होते. मुहूर्तमेढ तर चांगली रोविली गेली. प्रथम आश्रम पुण्यांतील सदाशिव पेठेंत होता. परंतु गतभर्तृकांचा आश्रम साधारण गांवापासून दूर पाहिजे असा कर्वे ह्यांचा आग्रह होता. जागेची अडचण, लोकांचा विरोध वगैरेंमुळें अर्थातच तो आश्रम प्रथम गांवांतच ठेवावा लागला. पण इ. स. १८९५ ते इ. स. १८९९ पर्यंत पसरलेल्या पुण्यांतील प्लेगनें कर्वे यांना आश्रम दूर नेण्याची उत्तम संधि आणून दिली. गांवांतील विरोधी वातावरणांतून निघून हिंगणें येथील प्रशान्त माळावर इ. स. १९०० मध्यें आश्रम न्यावा लागला. तेथें कर्वे यांना एक लहानसें झोंपडें आश्रमाकरितां मिळालें होतें. तरी पण कोंदट हवेंतून एखादें रोपटें स्वच्छ मोकळ्या हवेंत नेऊन ठेवल्यावर तेथें मिळणाऱ्या प्रसन्न वातावरणांत सूर्य-किरणानें जशी त्याची झपाट्यानें वाढ होते, तसेंच या छोट्या आश्रमवेलीचें

झालें. ह्याच वेलींतून हजारों स्त्रियांना ‘ सुशिक्षणाची शीतल छाया ’ देणारा महान् वृक्ष निर्माण व्हावयाचा होता.

## आश्रमाचें कार्य

आश्रमांत जास्तींत जास्त विधवांनी येऊन शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावें म्हणून कर्वे यांनीं प्रथमपासूनच ती संस्था पुनर्विवाहाच्या चळवळीपासून संपूर्णपणें अलिप्त ठेवली. नाहींतर पुनर्विवाहाला ते उत्तेजन देतात म्हणून लोकांनीं विधवांच्या शिक्षणाला पण विरोध केला असता. त्यामुळें त्यांच्या किती तरी मित्रांनीं त्यांच्यावर फार तीव्र स्वरूपाची टीका केली. पण कर्वे यांच्या मनाला एखादी गोष्ट पटलेली असली कीं मग ते कोणाला भीक घालीत नसत. आपल्या विरोधकांना विनाकारण उत्तरें देत बसण्यांत त्यांनीं कालापव्यय मात्र मुळींच केला नाहीं. शिक्षणाकरितां निर्माण केलेल्या संस्थेचें कार्य त्यांनीं स्वतःच्या कल्पनेप्रमाणें सुरू ठेवलें. आपल्या अनाथ बालिकाश्रमाचा अप्रत्यक्ष उपयोग फार चांगला होत आहे ह्याबद्दल त्यांना संपूर्ण विश्वास होता. चांगल्या रीतीनें शिकून तयार झालेल्या व्यापक दृष्टीच्या स्त्रिया आश्रमांतून निर्माण होतील ह्या निष्ठेनेंच त्यांनीं आश्रमाकरितां सर्व बल एकवटविलें. त्यांतून समाजाला अत्यंत उपयोगी पडणारी स्त्रीसेविका निर्माण होईल ह्याची त्यांना खात्री होती. म्हणून केवळ पुनर्विवाह घडवून आणून त्यांना चुलीशेजारीं बसविण्यापेक्षां सामाजिक जीवन जबाबदारीनें पार पाडणाऱ्या स्वार्थत्यागी विधवा सेविका समाजाला मिळवून द्यावयाच्या होत्या. ‘ हिंदूंच्या पुढारलेल्या जमातींत विधवाविवाह रूढ नाहीं. या सर्व जातींतील अल्पवयी विधवांना शिक्षण देऊन त्यांचीं मनें सुसंस्कृत करून त्यांना स्वावलंबी होतां येईल असें साधन त्यांना हस्तगत करून देणें व आपलें जीवित उपयोगी असून तें कोणत्या तरी कार्याला लावितां येईल असा स्वतःबद्दल विश्वास उत्पन्न करणें ’ हें कर्वे ह्यांच्या आश्रमाचें ध्येय होतें. शिक्षणाचीं नवीन व जीवनाभिमुख ध्येयें भारतांतील शिक्षण-पद्धतीला कर्वे यांनीं त्यांच्या ‘विद्यापीठां-तून जीं दिलीं त्या सर्व ध्येयांचीं बीजें वरील विचारसरणींत निश्चित सांपडतात. समाजाच्या अज्ञानामुळें आणि अडाणीपणामुळें करपून गेलेल्या किती तरी विधवांच्या अंतःकरणांत ह्या आश्रमानें आशेचे नवनवे अंकुर निर्माण केले आहेत, आणि त्यांतच महर्षि अण्णासाहेबांच्या कार्याची सांगता आहे.

## प्रगतीचें आणखी एक पाऊल

अनाथ बालिकाश्रमांत आलेल्या विधवांना शिक्षण देऊन त्यांना सुसंस्कृत आणि नवमतवादी बनविण्याचा प्रयोग बराच यशस्वी झालेला होता. परंतु मूठभर विधवांना शिकविण्यांतच इतिकर्तव्यता मानणारे महर्षि कर्वे नव्हते. हिंदु समाजांत अशिक्षित आणि म्हणून बुरसटलेल्या फक्त विधवा नव्हत्या. तर सर्वच स्त्रिया साधारणतः अडाणी आणि कोत्या मनोवृत्तीच्या होत्या. तेव्हां विधवांच्याबरोबरच इतर स्त्रियांच्या शिक्षणाचे चांगले प्रयत्न झाले पाहिजेत असें कर्वे यांना वाटूं लागलें होतें. कांहीं कुमारिकांच्या पालकांनीं आपण होऊनच आपल्या मुली आश्रमांत पाठविण्याचा आग्रह धरला होता. त्यामुळें जें मुद्दाम करण्याचा प्रयत्न करूनहि जमलें नसतें तें सहजच घडून येत होतें. अनाथ बालिकाश्रमांतील विद्यार्थिनींची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली. आश्रमांतूनच सर्व स्त्रीवर्गाकरितां नवीन पद्धतीवर चालवलेली चांगली 'शाळा' निर्माण होणें आतां अटळ होतें. याचाच परिणाम म्हणून मार्च इ. स. १९०७ मध्यें कर्वे यांच्या शिक्षणकार्यानें एक पाऊल पुढें टाकलें आणि 'महिला-विद्यालया'ची स्थापना झाली. इंग्रजी पद्धतीवर चालणाऱ्या शाळेपेक्षां ह्या शाळेंत कांहीं महत्त्वाचे फरक होते. कर्वे ह्यांच्या शाळेंत 'कारकुनी अभ्यास-क्रमापेक्षां' व्यक्तिविकास, सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव, जीवनोपयोगी ज्ञान यांवरच विशेष भर दिला जात होता. हिंदुस्थानांत तरी हा प्रयोग अभिनव होता. त्यांतूनच स्त्रीशिक्षणाची नवीन चळवळ निर्माण व्हावयाची होती.

## विद्यापीठाची गर्भावस्था

महिला विद्यालयाचा प्रयोग जसजसा यशस्वी होऊं लागला तसतसें कर्व्यांना आपलें कार्यक्षेत्र व्यापक करावेंसें वाटलें. इंग्रजी शिक्षणपद्धतीचें अनुकरण मुलींच्या शिक्षणपद्धतींतहि होतें. विशेषतः मुलांच्या बरोबर मुलींना शिक्षण देण्याच्या अपरिहार्यतेमुळें कारकुनोपयोगी शिक्षणच मुलींना दिलें जात होतें. याच वेळीं म्हणजे इ. स. १९१५ च्या सुमारास जपानमधील महिला विद्यापीठाचें कार्य त्यांना माहीत झालेलें होतें. त्यामुळें "हिंगण्याच्या संस्थांतून जर महाराष्ट्रासाठीं स्त्रियांची युनिव्हर्सिटी उत्क्रांत होईल तर मोठी

बहार होईल " अशीं सुखस्वप्नें त्यांना पडूं लागलीं होतीं. हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतींतील मोठा दोष म्हणजे इंग्रजीला दिलेलें फाजील महत्त्व ! आणि त्यामुळेंच झालेली मातृभाषांची हेळसांड. इंग्रजांनीं तयार केलेली शिक्षणपद्धति राज्याच्या सोयीकरितां असल्यानें राष्ट्रीय बुद्धिमत्तेचें विकसन होईल अशा साधनांचा त्यांत संपूर्ण अभावच होता. राष्ट्राची आधिभौतिक प्रगति ज्या आधुनिक कल्पनांवर व शास्त्रांवर खरोखर अवलंबून असते त्या कल्पना व तीं शास्त्रें तर बंदच होतीं. पण जें कांहीं त्याविषयीं थोडेंसें ज्ञान दिलें जात होतें तेंहि इंग्रजींत. या कल्पना व हीं शास्त्रें जोंपर्यंत परकी भाषेंत मोहोरबंद पडून असतात तोंपर्यंत प्रगतिपर कल्पनांचा प्रसार होणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली होती. इंग्रजी शिक्षण-पद्धतीची निर्बुद्ध उसनवार त्यांना बेचैन करून टाकीत होती. ह्या सर्व विचारसरणीच्या अनुषंगानें महर्षि कर्वे यांनीं स्वतःच्या शिक्षणविषयक कल्पना निश्चित करण्यास सुरुवात केली होती. ज्या शिक्षणपद्धतींत मातृभाषेला बोधभाषा म्हणून मानाचें स्थान आहे आणि जींत विद्यार्थ्यांना त्यांनीं मिळविलेलें ज्ञान पचनीं पाडतां यावें, स्वतंत्रपणें विचार करतां यावा म्हणून त्याची योजना केलेली असते, तीच शिक्षण-पद्धति निर्माण व्हावी असें त्यांना वाटूं लागलें होतें. इ. स. १९१५ सालीं पंडित मदनमोहन मालवीयांनीं सुद्धां आपल्या शिक्षणविषयक स्वप्नांना ' बनारस हिंदु युनिव्हर्सिटी 'च्या स्वरूपांत साकार केलेलें होतें. हिंदु युनिव्हर्सिटीचा कोनशिलासमारंभ चालू असतांना कर्वे त्या समारंभांतच शिक्षणाधिकाऱ्यांना भेटून महिला विद्यापीठाची कल्पना समजावून देऊन त्यांचा आशीर्वाद घेऊन आले होते. शिक्षणमंदिराची उभारणी पुष्कळच भव्य प्रमाणांत झालेली होती. आतां त्याच्यावर नुसता कळस चढवावयाचा होता. महर्षि अण्णासाहेबांनीं एखादी गोष्ट हातांत घेतल्यावर ते स्वस्थ बसणें अशक्यच ! अक्षरशः भगीरथ प्रयत्न जर कोणीं केले असतील तर ते कर्वे यांनींच ! त्यांच्या ह्या भगीरथ प्रयत्नांमुळेंच ते ज्ञानगंगा अवतीर्ण करूं शकले, आणि मित्रांच्या सहाय्यानें इ. स. १९१९ च्या सुमारास त्यांनीं नवीन ध्येया-वर व उद्दिष्टांवर आधारलेली आपली महिला विद्यापीठाची कल्पना प्रत्यक्षांत आणून ' नाथीबाई ठाकरसी भारतीय महिला विद्यापीठा 'ची स्थापना केली.

## भारतीय महिला विद्यापीठ : वैशिष्टयें

कर्वे ह्यांच्या विद्यापीठाच्या कल्पनेच्या बुडाशीं खालील चार प्रमेयें होतीं :

(१) आपण जबाबदार मानवी व्यक्ति आहोंत, ही भावना ठेवून आत्मविश्वास ज्याच्या योगानें निर्माण होईल असें शिक्षण देणें.

(२) राष्ट्ररूपी देहाचे घटक जीं कुटुंबें तीं जोमदार व मनोहर बनविणें.

(३) राष्ट्रीय भावनांचें बीज निर्माण करणें.

(४) कांहीं कारणानें संसारांत पडूं नये असें वाटणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या ध्येयसिद्धीकरितां ज्या शिक्षणाची जरूरी असेल तें शिक्षण त्यांना देणें.

या तत्त्वांवरच ह्या विद्यापीठाची उभारणी झालेली असल्यामुळें इतर विद्यापीठांपेक्षां हें विद्यापीठ स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण निश्चितच आहे. एक तर स्त्रियांचे प्रश्न आणि कार्य यांच्याकरितां तें स्वतंत्रपणें विचार करूं शकतें. स्त्रिया आणि पुरुष यांना एकच एक अभ्यासक्रम देण्यापेक्षां दोघांचें कार्य व सामर्थ्य विभिन्न आहे हें लक्षांत घेऊन दोघांच्या व्यक्तिविकासाला वातावरण निरनिराळें पाहिजे हें या वेळीं प्रथमच आग्रहानें सांगितलें गेलें. इंग्रजी शिकणाऱ्या व इंग्रजी पद्धतींतून शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना विनाकारणच चूल व मूल यांच्याबद्दल तिटकारा येऊं लागला होता व शिकलेल्या स्त्रीनें शिक्षिका होण्यापलीकडे दुसरें कांहींच करूं नये अशी नवी रूढि पडूं पाहात होती. कर्वे यांनीं महाराष्ट्रांत तरी स्त्रियांना कौटुंबिक जीवनाबद्दल आत्मीयता तर निर्माण करून दिलीच, पण त्याचबरोबर समाजाभिमुख ती स्त्री कशी होईल ह्याचाहि विचार केला. अशा रीतीनें नैसर्गिक व्यक्तिविकासांतून समाजविकास व त्यांतूनच राष्ट्रकल्याण कसें होईल हा प्रश्न सोडविण्याचा पहिला विधायक प्रयत्न महर्षि कर्वे यांनींच केला. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे केवळ इंग्रजविरोधी शिक्षण असा इतरांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ केला होता, तर राष्ट्रीय शिक्षण म्हणजे राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ गरजा लक्षांत घेऊन राष्ट्रीय जीवनाशीं संपूर्णपणें निगडित असलेलें स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण शिक्षण असा नवीन अर्थ कर्वे लावू पाहात होते. भारतीय शिक्षणपद्धत याचमुळें महर्षि कर्वे यांची सदैव ऋणी होऊन राहणार आहे. आपण कांहीं तरी नवीन व

समाजोपयोगी करीत आहोंत ही निष्ठाच कर्वे यांना नवीन अभ्यासक्रम धिटाईनें विश्वविद्यालयांत घ्यावयास लावीत होती. लोकांनीं कितीहि नाकें मुरडलीं तरी या विद्यापीठानें आग्रहानें 'मातृभाषांनाच' बोधभाषा म्हणून मान्यता दिली. लोकांनीं तुच्छता दर्शविली तरी गृहशास्त्र, पाकशास्त्र, शरीरशास्त्र, आरोग्य-विज्ञान या अत्यंत उपयुक्त शास्त्रांना कर्वे यांनीं अभ्यासक्रमांत वरचें व महत्त्वाचें स्थान दिलें.

## शिक्षकांचे शिक्षक

शैक्षणिक प्रांतांत इतकी महत्त्वाची कामगिरी सतत वयाच्या ९६-९७ व्या वर्षापर्यंत अविरतरीत्या झटत राहून केलेली असल्यानेंच महर्षि कर्वे सुद्धां गुरूंचे गुरु आहेत हें मान्य करावें लागतें. पढिक पदवीवर शिक्षणतज्ज्ञांना नवीन शिक्षणविषयक कल्पना, प्रात्यक्षिकें देऊन महर्षि कर्वे यांनींच दिलेल्या आहेत. सतत सत्तर वर्षें स्वतःचें आयुष्य वेंचून भारतांतील शिक्षणविषयक कल्पनांना 'तरफ' लावणाऱ्या ह्या एकाकी वीराचें भारतांतील शिक्षणविषयक क्षेत्रांतील स्थान ध्रुवाइतकेंच अढळ आहे. दुर्दैव त्यांचें कीं, प्रांतद्वेषानें आणि इंग्रजी शिक्षणानें पछाडले गेलेले आम्ही त्या आम्हांला त्यांचीं नवीन मूल्यें समजूंच शकत नाहींत. लोकमान्य टिळकांसारख्यांची सहानुभूति मिळत नाहीं हें कळून सुद्धां त्यांनीं विद्यापीठाचें मंदिर रचून दाखविलें. ह्याला कारण म्हणजे त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्त्व व जीवनविषयक प्रगाढ निष्ठा. हातीं घेतलेल्या कार्यावर आत्यंतिक निष्ठा, स्त्रीसमाजाबद्दल आत्यंतिक कळकळ, तपस्व्याला सुद्धां लाजवणारी एकमार्गी अचल भक्ति आणि हिमालयाला सुद्धां गवसणी घालूं असा अभेद्य आत्मविश्वास म्हणजेच महर्षि कर्वे होत. याच व्यक्तित्वांतून त्यांचें वैयक्तिक तत्त्वज्ञान निर्माण झालेलें आहे. त्यांच्या शब्दांत त्यांच्या तत्त्वज्ञानाची 'झलक' द्यावयाची असेल तर—

" मनुष्याची किंमत त्याच्या मतावर नाहीं; ती त्याच्या आचरणावर आहे. मनुष्य आस्तिक असो अगर नास्तिक असो, त्याचें या जगांतील जीवित ही एक अमोलिक चीज आहे व तिचा उपयोग फार दूरदर्शीपणानें व शहाणपणानें केला पाहिजे. अशा प्रकारची जाणीव उत्पन्न होऊन आपल्या आचरणाला दिशा लावण्याचा तो प्रयत्न करूं लागला म्हणजे त्याला नवजीवन प्राप्त होतें.

आत्मोन्नतीसाठीं तळमळ उत्पन्न होणें हें मनुष्यत्वाचें पहिलें चिन्ह होय व परोन्नतीच्या द्वारें आत्मोन्नति साधण्यासाठीं धडपडणें ही त्यावरची पायरी होय. या उभय विचारांचें आणि आचारांचें संमीलन ज्याच्या जीवितांत योग्य प्रमाणानें झालें त्यानें जन्माचें सार्थक केलें असें म्हणावयास हरकत नाहीं."

या तत्त्वज्ञानाच्या मदतीनेंच महर्षि कर्वे यांचें चारित्र्य आणि कार्य तपासलें तर तत्त्वज्ञान आणि आचरण यांची ही दुर्मिळ सांगड दुसरीकडे कोठें सांपडेल कीं नाहीं याची शंकाच आहे. स्वतःच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें त्यांनीं 'जीवनाचें सार्थक' केलें असेंच म्हणावें लागतें.

त्यामुळें महर्षि कर्वे यांच्यावर चोहों दिशांनीं, मान-सन्मानाचा व यशो-गौरवाचा वर्षाव झाला. एक दिवस त्यांच्या आयुष्यानें शेवट गांठला. तो दिवस शुक्रवार ता. ९ नोव्हेंबर १९६२ हा होय. या दिवशीं त्यांनीं आपली जीवितयात्रा संपविली.

अशा तऱ्हेनें त्यांची काया गेली पण कार्य चिरंतर राहिलें. भावी पिढ्या त्यांचें गुणगान केल्याशिवाय राहणार नाहीं.

x x x

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थल
अनुक्रम........................ वि: ..............
क्रमांक ........................ ......... दि ..............



## ४ ☆ पंडित मदन मोहन मालवीय

### परतंत्र देश आणि शिक्षणपद्धति

परतंत्र देशांतील स्वातंत्र्याचा लढा आणि राष्ट्रीय शिक्षणाची जोपासना हीं गाडीच्या दोन्ही चाकांसारखीं जावीं लागतात. राष्ट्रीय शिक्षणाशिवाय स्वातंत्र्ययुद्धास चांगलें बाळसें चढत नाहीं आणि स्वातंत्र्याच्या झगड्याचें स्वरूप जसजसें तीव्र होत जातें तसतसें राष्ट्रीय शिक्षणाचें स्वरूप अधिक रेखीव होऊं लागतें. त्यांत राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांत गुंतलेल्या धुरीणांनाच प्रामुख्यानें शिक्षणाकडे व शिक्षणविषयक क्रांतीकडे लक्ष द्यावें लागतें. हिंदुस्थानांत तर ह्याचा प्रत्यय आपणांस पदोपदीं येतो. ब्रिटिशांनीं इ. स. १८१८ मध्यें मुंबई प्रांत आणि त्यामुळें सर्व भारत आपल्या सत्तेखालीं आणल्यानंतर आपल्या सत्तेचे पाश करकचून आंवळण्यास सुरुवात केली. येथील उद्योगधंदे नष्ट करण्याच्या प्रयत्नांतून हिंदुस्थानांतील शिक्षणव्यवस्था खिळखिळी करण्याचा संकल्प निर्माण होणें अपरिहार्य होतें. सुरुवातीला आमच्या जीर्ण झालेल्या पाठशाला हातीं धरूनच त्यांनीं आम्हांला शिकविण्याचा परिपाठ

केला. हळूहळू आपलें राज्ययंत्र ठीक चालू राहावें म्हणून इंग्रजी शिकविण्याकडे त्यांचीं प्रवृत्ति होऊं लागली. इंग्रजीचा परिचय होतांच त्यांतून वाचावयास मिळणाऱ्या विचारसंपदेनें आमचेकडील शास्त्री पंडित दिपून गेले, आणि नुसतें इंग्रजी शिकणें व इंग्रजी पद्धतीचें अनुकरण करणें म्हणजेच त्या श्रेष्ठ विचारसंपदेचे धनी होणें असा एक भ्रामक समज आमच्या धुरीणांनीं सुद्धां करून घेतला. जित आणि जेते ह्यांच्या संबंधांत असें नेहमींच घडत असतें. जेते आणि त्यांची संस्कृति, त्यांची समाजव्यवस्था व त्यांची शिक्षणपद्धति सर्व कांहीं श्रेष्ठ व अनुकरणीय असेंच ' जित ' मानीत असतात, आणि जेते तर जिकलेल्यांची सर्वच संस्कृति सर्वथैव कशी नष्ट करतां येईल ह्याचा हेतुतः किंवा कांहीं वेळां नकळत प्रयत्न करीत असतात. जेत्यांच्या ह्याच प्रवृत्तींतून भारताला चांगली शिक्षणपद्धति न देण्याच्या निश्चयाचा जन्म झालेला दिसतो. प्रथमपासूनच तुमच्या शिक्षणाला आमच्याकडे पैसा नाहीं असें निर्धावलेलें उत्तर उदारमतवादी (?) इंग्रज राज्यकर्ते देत असत. पुढें पुढें प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी बरीचशी स्वीकारली गेली; पण माध्यमिक आणि उच्च शिक्षणाकरितां मात्र तुम्हीं तुमचा पैसा जमवा असें सांगण्यांत येत असे. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करण्याची जबाबदारी परकीय सरकारनें शेवटपर्यंत टाळलीच. कै. नामदार गोखले यांना त्याबद्दल फार चिकाटीनें भांडावें लागलें ! त्यामुळेंच भारतांत सरकारनें शिक्षण-विषयक भरीव कार्य केलेलें दिसतें. जें कांहीं केलें गेलें आहे तें प्रामुख्यानें भारतांतील स्वातंत्र्याच्या लढ्यांत महत्त्वाचा भाग घेणाऱ्यांनींच – त्यांत महात्मा गांधी, महर्षि टागोर, लाला लजपतराय, महात्मा फुले व पंडित मदन मोहन मालवीय यांचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं.

## पंडित मदन मोहन मालवीय : बालपण

पंडितजींचें शिक्षणविषयक कार्य म्हणजे आज भारतांत श्रेष्ठ दर्जाचें ठरलेलें ' काशी विद्यापीठ ' होय. विद्यापीठांच्या क्रांतीकडे पंडितजी कसे वळले हें समजून घेण्यापूर्वी ते ज्या कालांत वाढले त्याचें चित्र डोळ्यापुढें असणें आवश्यक आहे. त्या चित्राची चौकट पूर्ण झाली कीं त्याच्याच पार्श्वभूमीवर आपल्याला विद्यापीठाची श्रेष्ठता सहज समजेल. पंडितजींचा जन्म १८६१ सालीं

अलाहाबाद या क्षेत्रीं ता. २५ डिसेंबर रोजीं झाला. इ. स. १८६१ म्हणजे ब्रिटिश सत्ता दृढमूल होऊन पन्नास वर्षे होऊन गेल्यानंतरचें वर्ष होय. मालवीय या नांवावरून ते माळव्यांतले होते हें सहजच समजतें. माळव्यांतून त्यांचे पूर्वज अलाहाबादला येऊन स्थायिक झालेले होते. घराण्यांत परंपरा पंडिती थाटाची. प्रत्यक्ष त्यांचे पिताजी पंडित ब्रिजनाथ यांचें प्रवचन म्हणजे अलाहाबादेंत भक्तिरसाची मेजवानीच समजत. भागवत व पुराणें ह्यांच्या अनुषंगानें प्रवचन करण्यांत त्यांचा अगदीं हातखंडा असे. घराणें व्युत्पन्न असल्यानें त्याचा बराचसा संस्कार धार्मिकरीत्या मदन मोहन मालवीयजीं-वर झालेला होता व शिक्षणाकडे पण त्यांचें दुर्लक्ष होऊं शकलें नाहीं. त्या वेळच्या प्रथेप्रमाणें त्यांचें प्राथमिक शिक्षण प्रथम " धर्म-ज्ञानोपदेश पाठ-शाळा, " नंतर " विद्याधर्मवर्धिनी सभा " ह्या संस्थांतून झालें. अशा रीतीनें धार्मिक ग्रंथांच्या परिसरांतच पंडितजींच्या शिक्षणाचा ओनामा सुरू झालेला होता. घरांतहि वेदादि ग्रंथांचें अध्ययन आणि पाठशाळेंतहि धार्मिक वातावरण, ह्याचा चिरंतन टिकणारा ठसा पंडितजींच्या मनावर सहजच उमटला गेला. परंतु सुदैवानें पंडितजींच्या मनावर इंग्रजी शिक्षणाचे संस्कारहि व्हावयाचे होते. पाठशालेंतील प्राथमिक शिक्षणानंतर ते अलाहाबादेस इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. पं. रामनरेश चतर्जी ह्यांनीं मालवीयजींच्या बालपणाचें वर्णन फार बहारीचें केलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, शाळा सुटतांच मदन मोहननें घरीं यावें, पुस्तकें एकीकडे, जोडे भलतीकडेच आणि कपडे तिसरी-कडेच भिरकावून द्यावेत. तसेंच तडक बाहेर पडून व्यायामशाळेंत जाऊन कुस्ती, दंड-बैठका ह्यांत किंवा लुटुपुटीच्या मारामारींत गर्क व्हावें असा परिपाठ होता. अशा क्रमानेंच ते इ. स. १८७९ मध्यें विद्यापीठाची प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाले.

## कॉलेज-शिक्षण

प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर साहजिकच विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्याची आकांक्षा बळावली आणि पंडितजी 'मूर सेंट्रल कॉलेज'मध्यें दाखल झाले. कॉलेजमध्यें असतांना प्रथम श्रेणीचा विद्यार्थी म्हणून जरी पंडितजींनीं लौकिक मिळविला नसला तरी कॉलेजमध्यें अभ्यासेतर चळवळींत प्रामुख्यानें

भाग घेणारा विद्यार्थी म्हणून त्यांना त्यांचे शिक्षक चांगलेच ओळखीत असत. कॉलेजमध्यें पंडितजींच्या प्रेरणेनें व प्रयत्नानें 'वादविवादमंडळ' स्थापन करण्यांत आलें होतें. त्या मंडळानें घडवून आणलेल्या चर्चेत पंडितजी कधीं बोलले नाहींत असें सहसा होत नसे. वादविवादाच्या प्रयत्नांतूनच पंडितजी तेव्हांपासूनच धार्मिक व सामाजिक प्रश्नांत लक्ष घालूं लागले होते. कॉलेजांतील नाटचप्रयोगांत सुद्धां पंडितजींचा मोठा भाग असे. एक वर्ष कॉलेजांतील तरुणांनीं कालिदासाच्या "शाकुंतलाचा" प्रयोग केला. त्यांत पंडितजींच्या शकुंतलेच्या कामानें तर कमालच केली. नंतरच्या वर्षी शेक्सपिअरचें "मर्चंट ऑफ् व्हेनिस" करावयाचें ठरलें तर पंडितजी 'पोर्शिया 'चें काम करण्यास तयार. जुन्यानव्याच्या मनोवेधक मिश्रणाला येथूनच सुरुवात झाली होती असें दिसतें. महाविद्यालयांतील विविध उपायांशीं समरस होत असतांनाच पंडितजी इ. स. १८८४ मध्यें कलकत्ता विद्यापीठाचे पदवीधर झाले, कारण त्या वेळीं अलाहाबादला स्वतंत्र विद्यापीठ नव्हतें.

## शिक्षक मालवीयजी

बी. ए. ची पदवी प्राप्त करून घेतल्यानंतर साहजिकच पंडितजींना एम्. ए. व्हावेंसें वाटूं लागलें. कॉलेजमध्यें असतांनाच त्यांनीं लेखनाचा उपक्रमहि सुरू केला होता. त्या वेळच्या नवशिक्षितांच्या अनुकरणाची कुचेष्टा करण्याकरितां पंडितजींनीं एक 'जंटलमन' नांवाचें विनोदी प्रहसन लिहिलें होतें. आपण खूप शिकावें आणि मोठें व्हावें ही इच्छा नैसर्गिकरीत्याच त्यांच्या मनांत निर्माण झाली होती. पण दरिद्री लोकांच्या इच्छा निर्माण होत असतांनाच नष्ट झालेल्या असतात. पंडितजींना सुद्धां उदरनिर्वाहाच्या निकडीनें नोकरी करण्याचें ठरवावें लागलें. पण कधीं कधीं वाइटांतून चांगलें निघतें म्हणतात ना! त्याप्रमाणेंच येथेंहि झालें. मालवीयजींना परिस्थितीनें नोकरी करावयास भाग पाडलें, परंतु त्यामुळें श्रेष्ठ 'कुलपति' मालवीयजी भारतास मिळाले. कारण प्रथम नोकरी जी मिळाली ती अलाहाबादेंतील सरकारी विद्यालयांत 'शिक्षक' म्हणूनच. इ. स. १८८४ पासून ते इ. स. १८८७ पर्यंत शिक्षक म्हणून कार्य करीत असतांना पुढें उपयोगी पडणारा फार मोठा अनुभव ते मिळवीत होते. वेतन अगदीं थोडें होतें. सुरुवातीला तर

पन्नास रुपयेच दरमहा मिळत असत. ते विद्यालयांत कार्य करीत असतांना त्यांच्याबद्दल प्रा. सीताराम चतुर्वेदी म्हणतात :

"सच्चरिता, मृदुभाषिता और पांडित्य अध्यापकके इन तीन गुणोंसे अलंकृत होकर थोडे ही दिनोंमें मालवीयजीके आकर्षक व्यक्तिमत्त्वने गवर्नमेंट स्कूलके पूरे वातावरणमें एक प्रकारका सांस्कृतिक प्रभाव उत्पन्न कर दिया ! पढानेके सहानुभूतिपूर्ण ढंगने और उनके कोमल-स्निग्ध व्यवहारने छात्रोंको मंत्रमुग्ध कर दिया ।"

खरोखरीच स्वतःच्या चारित्र्यानें, विद्वत्तेनें आणि सहिष्णु वृत्तीनें विद्यार्थि-वर्गावर छाप पाडणारा शिक्षक विरळाच ! कारण पांडित्य असेल तर त्याबरोबर अहंकार हा अपरिहार्यरीत्या येतोच ! आणि पांडित्य नसलें तर शिकवितांना विद्यार्थी मंत्रमुग्ध कसे होणार ? पण मालवीयजींच्या बाबतींत मात्र सर्व गुणांचें सप्तरंगी सुंदर संमिश्रण झालेलें होतें. पंडितजींच्या त्या वेळच्या विद्यार्थिगणांतच डॉ. सतीशचंद्र बॅनर्जी होते एवढें म्हटलें म्हणजे पुरे.

## देशसेवेचा श्रीगणेशा

सरकारी शाळाखात्यांत नोकरी नाइलाजानें करीत असतांना पंडितजी कूपमंडूकवृत्तीनें अर्थातच राहूं शकले नाहींत. शाळा आणि वर्गाच्या चार भिंतींतच आपल्या कार्याची समाप्ति न मानतां पंडितजी सामाजिक कार्यांत लक्ष घालीत होतेच. इ. स. १८८५ त भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत पंडितजी नुसते उपस्थितच होते असें नाहीं, तर ठरावांवर भाषण करण्यासहि ते कचरले नाहींत. त्यांच्या ह्या पहिल्या भाषणाचा फारच बोलबाला झाला. मि. ह्यूम ह्यांनीं तर राष्ट्रीय सभेच्या वार्षिक वृत्तान्तांत मालवीयजींबद्दल मुद्दाम गौरवपर शब्द लिहून ठेवलेले आहेत. येथून पुढें मालवीयजी शाळेचें चिमुकलें जग सोडून त्यापेक्षां जास्त अशा विशाल प्रांगणामध्यें जाऊं लागले. त्यांनीं राष्ट्रीय सभेंत प्रकट केलेल्या विद्वत्तेचा परिणाम म्हणूनच कीं काय त्यांना इ. स. १८८७ त 'हिंदुस्थान' ह्या वर्तमानपत्राचें संपादकत्व स्वीकारण्याविषयीं विनंति करण्यांत आली. 'हातीं घेतलेल्या कार्यांत संपूर्णपणें यश मिळविणें' हा मालवीयजींचा दंडकच असल्यानें त्यांनी हें वर्तमानपत्र थोड्या अवधींतच अत्यंत लोकमान्य करून दाखविलें. ह्याच वेळीं वर्तमानपत्र

म्हणजे लोकशिक्षणाचें अत्यंत प्रभावी साधन होय ह्यावर त्यांचा संपूर्ण विश्वास बसला. संपादक म्हणून ताबडतोब त्यांची प्रसिद्धि इतकी झाली कीं, त्यांनीं वर्तमानपत्र हातांत घ्यावयाचा अवकाश कीं त्याची लोकप्रियता शिगेला पोहोंचलीच म्हणून समजावें. त्यानंतर पंडितजींनीं ' इंडियन युनियन ' ह्या पत्राचें संपादकत्व पत्करलें, ' अभ्युदय ' नांवाचें हिंदी वृत्तपत्र सुरू केलें आणि ' लीडर ' नांवाच्या इंग्रजी वर्तमानपत्राची स्थापना केली. वर्तमानपत्राचें संपादन चालू असतांना राष्ट्रीय सभेच्या कार्याला ते मदत करीत होतेच. त्यांची चिकाटी, कार्यक्षमता आणि कुशाग्र बुद्धि पाहून राष्ट्रीय सभेच्या चालकांना मात्र मालवीयांनीं ह्यापेक्षां जास्त कांहीं तरी करावें असें सारखें वाटत होतें. म्हणून त्यांनीं मालवीयजींना वकिलीची परीक्षा देण्याविषयीं आग्रह केला. त्यांत मि. ह्यूम ह्या राष्ट्रीय सभा स्थापन करणाऱ्या पुढाऱ्यांचा फारच मोठा भाग होता.

कलकत्ता येथील दादाभाई नौरोजी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेंत मालवीयजींनीं भाषण केल्याचा उल्लेख पूर्वीं आलेला आहेच. त्या व्याख्यानाचें वर्णन मि. ह्यूम ह्यांनीं खालील शब्दांत केलेलें आहे :

" परंतु सर्व व्याख्यानांत जास्त उत्साहानें कोणाच्या व्याख्यानाचें स्वागत झालें असेल तर पंडित मदन मोहन यांच्या व्याख्यानाचेंच. पंडितजींचा गौरवर्ण, आकृतिसौष्ठव आणि असामान्य विद्वत्ता यामुळें प्रत्येक व्यक्ति नुसती भारावून गेली. आपल्या उत्साहभरित आणि अविरत अशा वाक्यप्रवाहानें सर्व राष्ट्रीय सभा त्यांनीं संपूर्णपणें जिंकून टाकली." एका वर्षांतच त्यांनीं ' फेरोजशहा मेहता ' सारख्या धुरंधरांना सुद्धां आपलें व्याख्यान कान देऊन ऐकावयास भाग पाडलें. केवढा अलौकिक विजय !

ह्याच सुमारास त्यांनीं आपलें संघटनाचातुर्य राष्ट्रीय सभेच्या चालकांना दाखवून दिलें. इ. स. १८८७ त राष्ट्रीय सभेचें अधिवेशन मद्रास येथें भरणार होतें. आतांपर्यंत राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास सर्व प्रांतांतील प्रतिनिधि येत असत, परंतु वायव्य सरहद्द प्रांतांतून मात्र कोणीच येत नसत. त्यामुळें राष्ट्रीय सभेंत मोठीच उणीव राहात असे. हें शल्य पंडितजींना अर्थातच सहन झालें नाहीं. त्यांनीं वायव्य सरहद्द प्रांतांत दौरा काढून अधिवेशनाकरितां पंचेचाळीस प्रतिनिधि थेट मद्रासपर्यंत नेले. ह्याचें पारितोषिक म्हणूनच कीं काय, त्यांना

इ. स. १८८८ त भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे कार्यकारी कार्यवाह नेमण्यांत आलें. अशा रीतीनें राष्ट्रीय सभेच्या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर वाहत असतांनाच त्यांना वकिलीची परीक्षा देण्यास प्रवृत्त केल्यामुळें त्यांच्याकडून साहाजिकच हेळसांड होऊं लागली. आणि म्हणून लोकांनीं मि. ह्यूम ह्यांचेकडे तक्रारी सुद्धां केल्या.

## मि. ह्यूमची भविष्यवाणी :

त्या तक्रारींमुळें ह्यमसाहेब चिडून तर गेले नाहींतच. ते शांतपणें म्हणाले, " साहजिकच आहे तें ! श्री. मालवीयजींनीं कायद्याचा अभ्यास जास्त लक्षपूर्वक केलाच पाहिजे. मदनमोहन ! परमेश्वरानें असामान्य बुद्धिमत्तेची देणगी तुला दिली आहे. तूं कोणत्याहि गोष्टींत दहा वर्षेपर्यंत श्रम कर. तू त्यांतील अत्युच्च श्रेणीला गेल्याशिवाय राहणार नाहींस. कायद्याच्या अभ्यासानें तुझी जी प्रतिष्ठा वाढेल त्यामुळें तुझी सामाजिक उपयुक्तता वाढेल आणि तुला आपल्या देशाचें जास्तींत जास्त कल्याण करतां येईल." इ. स. १८९० मध्यें निघालेली भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरावी असा ईश्वरी संकेतच दिसतो ! ह्या सर्व प्रोत्साहनाचा परिणाम म्हणजेच मालवीयजींची एल्‌एल् . बी. ची परीक्षा इ. स. १८९१ मध्यें उत्तीर्ण होणें होय. त्यांनीं तरीहि दोन वर्षेपर्यंत वकिली केली नाहीं. प्रत्यक्ष वकिलीला सुरुवात इ. स, १८९३ मध्येंच केली. वकिलींत लक्ष घातलें असतें तर गजान्त लक्ष्मी पायाशीं लोळण घालीत आली असती; परंतु गजान्त लक्ष्मीला ठोकरणारे हे सुद्धां एक महान् महर्षि म्हणून भारताच्या उद्धाराकरितां झटणार होते. त्यामुळें साहजिकच संपत्तीचा मोह त्यांना भुरळ घालूं शकला नाहीं, आणि वकिलींत फारसें लक्ष घालावेंसें त्यांना कधीं वाटलें नाहीं.

## इतर सामाजिक कार्य :

भारतांत जें औद्योगिक औदासीन्य ब्रिटिश सरकारनें पसरविलें होतें त्याची पंडितजींना पुरेपूर जाणीव होती. राष्ट्रीय सभेनें स्वदेशीचा अधिकृतरीत्या पुरस्कार करण्यापूर्वीच त्यांचें लक्ष तिकडे वेधलें होतें. इ. स. १८८१ त त्यांनीं अलाहाबादेस एक स्वदेशी औद्योगिक कंपनी स्थापन करून स्वदेशीच्या

विधायक कार्यास सुरुवातहि केली होती. स्वदेशीच्या ह्या कार्यांत ते शेवटपर्यंत आत्मीयतेनें भाग घेत होते.

अलाहाबादेस ह्याच सुमारास प्लेग उद्‌भवला होता. त्या वेळीं पण मालवीयजींचें संघटनाचातुर्य पणाला लागलें होतें. नुसते वरवरचे उपाय न सुचवितां कांहीं तरी मूलग्राही असा उपाय सुचविणें आणि ती दुःखपरंपरा नाहींशी व्हावी म्हणून कोणत्या ना कोणत्या तरी शाश्वत स्वरूपाचा तोडगा त्यावर उपयोजावा ह्यांत मालवीयजींचा हातखंडाच ! त्यामुळें सर्व सांथीच्या रोगांपासून लोकांचा बचाव करतां यावा या कल्पनेनें पंडितजींनीं ' हेल्थ कॅंप 'ची निर्मिति केली. नगरपालिकेचे ते तेव्हां उपाध्यक्ष होते. त्यांच्या ह्या आरोग्य-शिबिरांत जवळजवळ १९०० कुटुंबें व्यवस्थितरीत्या वास करूं शकतील येवढी प्रचंड योजना त्यांनीं प्रत्यक्षांत उतरवून दाखविली.

असेंच आणखी एक प्रचंड कार्य त्यांनीं करून ठेवलेलें होतें. अलाहाबाद शहरांत विद्यार्थ्यांची संख्या खूपच. परंतु त्यांच्या राहण्याची व्यवस्था मात्र मुळींच नव्हती; आणि थोडक्या खर्चांत राहतां येण्याची तजवीज तर मुळींच नव्हती. त्यामुळें शेंकडों विद्यार्थ्यांची कुचंबणा होत असे. मालवीयजींच्या लक्षांत ही गोष्ट यावयाचा अवकाश, त्यांनीं फंड गोळा करण्यास सुरुवात केली व किमान अडीचशें विद्यार्थी राहूं शकतील असें मॅक्डोनल वसतिगृह निर्माण करून दाखविलें. असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं, बनारस विद्यापीठाच्या उभारणीस लागणारें कौशल्य ते संपादन करीत होते. कारण ह्याच योजनांना मूर्त स्वरूप देत असतांना त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होणें अपरिहार्य होतें.

सामाजिक कार्य करीत असतांनाच त्यांचें लक्ष भारतांतील धार्मिक अधःपतनाकडे लागलें होतें. मुळांतच धार्मिक संस्कार त्यांचेवर विशेष झालेले, त्यांत आणखी वेदवेदान्त, भगवद्‌गीता यांचा सखोल अभ्यास. त्यामुळें धार्मिक निष्ठा ही सर्व जीवननिष्ठेच्या बुडाशीं असते. येवढेंच नव्हे तर ह्या धार्मिक श्रद्धेंतूनच सर्व महानता आणि मांगल्य जीवनांत निर्माण करतां येतें असा त्यांचा दृढ विश्वास होता. ब्रिटिश संस्कृतीच्या संघर्षांत आणि इंग्रजी विद्येच्या अंधानुकरणांत आपल्या समाजाचीं आत्मिक आणि नैतिक मूल्यें धुळीस

मिळविली जात होती हें बघून त्यांना अत्यंत खेद होत असे. त्याविरुद्ध धडपड करीत असतांनाच त्यांचे हातून इ. स. १९०६ मध्यें 'सनातन धर्म महासभा' स्थापन केली गेली; किंवा हिंदुमहासभेच्या राजकारणाशीं पण ते निगडित केले गेले; किंवहुना ह्या श्रद्धेंतूनच स्वतंत्रपणें भारतीय आध्यात्मिक उन्नति करण्यास उपयोगी पडणारी शिक्षणयोजना अनुस्यूत झाली. पण ह्या धार्मिक श्रद्धेनें इतरांप्रमाणें जातीयवादी स्वरूप स्वीकारण्याचा दुराग्रह मात्र कधींच दाखविला नाहीं. इतकेंच नव्हे तर इतर धर्मीयांच्या सहकार्याची भीक मागणाऱ्या राष्ट्रीय सभेशीं ते अखेरपर्यंत सहकार्य करीतच राहिले.

## सरकारशीं सहकार्य

भारताचें कल्याण व्हावें हीच तळमळ त्यांना लागलेली असल्यानें तें कल्याण ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांच्या मदतीनें होत असलें तर त्यांच्याशीं मैत्री करण्यांत त्यांनीं कधींच मागें पुढें पाहिलें नाहीं. कोत्या लोकप्रियतेच्या आहारीं जाऊन त्यांनीं आलेली संधि कधीं वायां दवडली नाहीं. त्यामुळें राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान मंडित करीत असतांनाच ते व्हाइसरॉयच्या कौन्सिलांतले सभासदहि असत. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास उपस्थित राहून सरकारी धोरणाचे वाभाडे काढीत असतांनाच ते सरकारनियुक्त समित्यांच्या कार्यांत मग्न राहून विधायकरीत्या मिळतील त्या चार गोष्टी पदरांत पाडून घेण्याची खटपट करीत असत. मजुरांच्या जीविताचा विचार करणारी समिति असो अथवा भारताच्या औद्योगिक प्रगतींचा आढावा घेणारें एखादें कमिशन असो, मालवीयजी ह्या सर्व कमिशनचे सभासद असावयाचेच. पण त्यांचा एक विशेष मात्र नमूद करावयास पाहिजे; इतर 'मवाळ' पुढाऱ्यांप्रमाणें सरकारदरबारीं आपलें वजन वाढावें म्हणून लांगूनचालन वा देशाशीं प्रतारणा त्यांनीं कधींच केली नाहीं. स्वतःचीं मतें निर्भीडपणें मांडून, भारताच्या कल्याणाच्या दिशेनें उपयोगी पडतील अशा गोष्टी स्पष्टपणें सरकारच्या कानीं घालून त्यांनीं त्या वेळच्या मदांध झालेल्या अधिकाऱ्यांना फटकारे मारण्याचा क्रम कधींच खंडित केला नाहीं. हें ऋण मान्य करण्याकरितां कीं काय, त्यांना राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान दोन वेळां तरी देण्यांत आलें. स्वार्थत्याग आणि निर्लेप सेवेचा विजयच म्हणायचा तो !

## निवृत्ति-मृत्यु

अशा बहुविध कार्यांत मग्न असतांनाच त्यांनीं बनारस विद्यापीठाची स्थापना इ. स. १९०५ पासून तों १९१६ पर्यंत भगीरथ प्रयत्न करून केली होती. विद्यापीठ हें त्यांचें अत्यंत आवडतें अपत्य ! त्याच्या सान्निध्यांत, परिसरांत उर्वरित आयुष्य घालवावें असें वाटून ते प्रत्यक्ष राजकारणांतून इ. स. १९३५ पासूनच अंग काढून घेऊं लागले होते. नंतर ते जवळजवळ निवृत्त स्थितींतच जीवन कंठीत होते. इ. स. १९३८ त त्यांनीं कायाकल्पाचा एक महान् प्रयोग करून पाहिला. त्यामुळें मालवीयजी आणखी अनेक वर्षें भारताची सेवा करूं शकतील अशी नवीनच आशा निर्माण झाली होती. परंतु इ. स. १९४५-४६ च्या स्वातंत्र्यपूर्व दंग्यांनीं ही आशा नष्ट झाली. नौखाली आणि इतर ठिकाणचे अत्याचार आणि त्यामागचें कोतें धर्मवेड पाहून मालवीयजींच्या हृदयाचें पाणी झालें आणि त्याचे मानसिक क्लेश न साहून त्यांनीं १२ नोव्हेंबर इ. स. १९४६ रोजीं इहलोकींचा निरोप घेतला. मालवीयजी गेले ! पण बनारस विद्यापीठाच्या रूपांत ते निरंतर अमर झाले.

## भारतीय विद्यापीठांची करुण कहाणी

बनारस विद्यापीठाचें महत्त्व आणि उपयुक्तता समजून घेऊन पंडितजींच्या प्रचंड कार्याचें श्रेय लक्षांत यावें असें वाटत असेल तर त्या वेळच्या भारतीय विद्यापीठांची माहिती मिळविली पाहिजे आणि तीं पीठें कोणत्या परिस्थितींत निर्माण झालीं त्याची पण स्पष्ट कल्पना डोळ्यांसमोर ठेविली पाहिजे.

हिंदुस्थानांतील बराचसा मुलूख इंग्रजांनीं आपल्या सत्तेखालीं अठरावें शतक संपण्यापूर्वींच आणलेला होता. एकुणावीस शतकाच्या सुरुवातीला त्यांनीं मराठ्यांना नामोहरम करून आपल्या राज्याक्रमणाचा मार्ग पूर्ण केला. राज्य गिळंकृत करून अमाप पैसा मिळविण्याच्या त्यांच्या ह्या कार्यांत खंड नंतर पडणें अर्थातच शक्य नव्हतें. परंतु राज्यविस्तार जसजसा वाढत होता तसतसा त्या राज्यांतील शासनाचा प्रश्न जास्त गुंतागुंतीचा होत असे. त्याकरितां एतद्देशीयांची मदत अधिक अधिक घ्यावी लागत असे. राज्ययंत्र चालविण्याकरितां येथील लोकांची मदत घ्यावयाची म्हणजे त्यांना इंग्रजीचें

ज्ञान करून देणें अपरिहार्य होतें. आणखी पण एक अडचण होती. भारतांतील अशिक्षित, अडाणी लोकांच्या उद्धाराकरितां इंग्रजांचा अवतार आहे असें सर्व इंग्रज अधिकारी सांगूं लागले होते. तेव्हां दूरान्वयानें कां होईना, परंतु तें सत्य आहे असें सिद्ध करण्याकरितां येथील लोकांना शिक्षण देणें अटळ होतें. ह्यामुळें त्यांचें लक्ष भारतांतील लोकांना शिक्षण देण्याकडे लागलें. परंतु खूप द्रव्य खर्च करून चांगलें शिक्षण देण्याची आवश्यकता मात्र ब्रिटिश अधिकाऱ्यांना कधींच वाटली नाहीं. उलट अगदीं कमींत कमी खर्च करून शक्य तेवढ्या मोजक्या लोकांनाच शिक्षण देण्याची योजना व्यवहार्य म्हणून प्रत्यक्षांत उतरविण्यांत आली.

ह्या सर्व धोरणाचा परिणाम म्हणूनच इ. स. १८५७ पर्यंत भारतांत एकहि विद्यापीठ स्थापन केलें गेलें नाहीं. एक तरी विद्यापीठ असावें अशी स्पष्ट सूचना इ. स, १८४० त राज्याचा आढावा घेण्याकरितां नेमलेल्या समितीनें केली होती. पण त्या वेळीं ती सूचना अनावश्यक म्हणून फेटाळली गेली. इ. स. १८५४ मध्यें मात्र परिस्थिति थोडी बदलली. शैक्षणिक कामगिरीचा आढावा घेऊन सूचना कराव्यात म्हणून नेमलेल्या वुड्स समितीनें एक क्रांतिकारक अहवाल सत्ताधाऱ्यांना सादर केला. शैक्षणिक क्षेत्रांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणावें म्हणून प्रथमच इतका जोराचा प्रयत्न केला गेला. त्यांतील सूचनांप्रमाणें हिंदुस्थानांत 'विद्यापीठें' स्थापन करण्याच्या कल्पनेला राजमान्यता मिळाली. अनुक्रमें कलकत्ता, मुंबई आणि मद्रास अशीं तीन विद्यापीठें इ. स. १८५७ मध्यें स्थापन केलीं गेलीं. संपूर्ण नियंत्रण मात्र त्या त्या प्रांतांतील गव्हर्नरांचें ठेवलें गेलें. लोकनियुक्त सभासदांपेक्षां सरकारनियुक्त सभासदांचाच जास्त भरणा त्यांच्यांत हेतुतः ठेवला गेला. ह्या विद्यापीठाची उभारणी करीत असतांना लंडन विद्यापीठाचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. इंग्लंडमधील विद्यापीठें बरींच जुनीं असून त्यांच्या ध्येयांत आणि कार्यांत तदोपता पुष्कळच होती. त्यांत मुख्य दोष म्हणजे हीं सर्व विद्यापीठें इ. स. १८५४ पूर्वीं नुसती परीक्षा घेण्याचेंच कार्य बव्हंशीं करीत असत. त्यांच्याकडे प्रत्यक्ष शिकविण्याची अशी जबाबदारी मुळींच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. त्या विद्यापीठांचेंच

अनुकरण करावयाचें ठरल्यामुळें आपल्या ह्या तीन विद्यापीठांच्याकडे सुद्धां तीच कामगिरी देण्यांत आली. केवळ अभ्यासक्रम ठरवावेत आणि वर्षाच्या शेवटीं मॅट्रिकपासून पुढें सर्व परीक्षा घ्याव्यात. उत्तीर्ण होतील तेवढ्या विद्यार्थ्यांना पदवीदान करावें, हा त्यांचा मुख्य उद्योग. मग प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची वाढ, शीलसंवर्धन, नागरिकत्वाची शिकवण वगैरे बाबतींत दुर्लक्ष केलें गेलें, तरी त्याबद्दल कोणास विधिनिषेध वाटण्याचें कारणच नव्हतें. इकडे इंग्लंड देशांत मात्र सामाजिक क्रांति आणि आर्थिक सुबत्ता भूमितिश्रेणीनें प्रगत होत होत्या. त्या क्रांतीशीं सुसंवादी राहावें म्हणून तेथील विद्यापीठांत कायाकल्प तितक्याच शीघ्रतेनें घडवून आणला जात होता. नुसत्या परीक्षा घेणाऱ्या आणि पदव्या वांटणाऱ्या ह्या पेढ्यांचा इंग्लंडमधील प्रगत शिक्षणतज्ज्ञांना उबग आला होता. म्हणून विद्यार्थिजीवनावर मंगल संस्कार घडवून आणून जबाबदाररीत्या प्रत्यक्ष अध्यापन करणारीं विद्यापीठें त्यांतूनच निर्माण होत होतीं. ह्याच्या उलट आमचीं विद्यापीठें! एकदां घालून दिलेली चाकोरी तसूभरहि बदलण्याची तयारी आम्हीं इकडे दाखविली नाहीं. ज्या विद्यापीठांचें अनुकरण आम्ही करीत होतों, तीं विद्यापीठें आपलें स्वरूप बदलींत होतीं ही गोष्ट सुद्धां आम्ही दृष्टिआड आजतागायत केलेली आहे. विद्यापीठांची संख्या सुद्धां वाढवून देण्यास त्या वेळचें परकीय सरकार धजत नव्हतें. बनारस विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वीं म्हणजे इ. स. १९१६ पर्यंत भारतांत – एवढ्या प्रचंड देशांत नव्हे खंडांत – फक्त पांचच विद्यापीठें स्थापिलीं गेलीं होतीं. त्यांपैकीं तीन तर वर निर्दिष्टलेलीं आहेतच. चवथें 'पंजाब विद्यापीठ' इ. स. १८८२ त व पांचवें अलाहाबाद विद्यापीठ इ. स. १८८७ त स्थापन करण्यांत आलें होतें; आणि त्यांत आश्चर्य म्हणजे इ. स. १८८२ व इ. स. १९०२ मध्यें 'युनिव्हर्सिटी कमिशन्स' नेमून सुद्धां त्यांच्या मूलगामी सूचना ह्या ना त्या कारणानें स्वीकारल्या गेल्या नव्हत्या. विद्यापीठांच्या ह्या अवनतीची वा अधःपतनाची कल्पना आपल्याकडील फारच थोड्या पुढाऱ्यांना होती. पंडित मदन मोहन हे थोड्या द्रष्ट्या लोकांपैकींच एक होते. त्यांचें लक्ष इतर सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करीत असतांनाच उच्च शिक्षणाकडे विशेष आकर्षिलें गेलें होतें. इ. स. १९०४ मध्यें तर सर्व विद्यापीठविषयक प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करण्याची एक सुवर्णसंधि चालून आली.

# इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणावर आसूड

इ. स. १९०२ मध्यें, हिंदुस्थानांतील विद्यापीठांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण फारच कमी असतें ह्या सबबीवर विद्यापीठाच्या कार्याची चौकशी व्हावी आणि त्यांचे दोष उघडकीस आणून त्यांत सुधारणा व्हावी म्हणून लॉर्ड कर्झन ह्यांनीं एक ' चौकशी समिति ' नेमली होती. त्या समितीचा अहवाल इ. स. १९०४ च्या सुरुवातीस विधिमंडळापुढें आणि म्हणून त्या वेळच्या ' लोकसभे 'पुढें म्हणजे राष्ट्रीय सभेपुढें चर्चेकरितां आला होता. त्या समितीच्या अहवालाची चिरफाड पंडित मालवीयजींच्या इतकी विदारक अशी कोणींच केली नाहीं. त्यांनीं अत्यंत स्पष्ट शब्दांत लॉर्ड कर्झनची कानउघाडणी केली आणि सांगितलें कीं, " आमचेकडील तरुणांचा ह्यांत मुळींच दोष नाहीं. ज्या ज्या क्षेत्रांत हिंदी लोकांना संधि दिली जात आहे, त्या त्या क्षेत्रांत हिंदी मनुष्य हा गौरवर्णीयांना मागें टाकून सरस ठरत आहे. तेव्हां दोष आहे तो विद्यापीठांच्या धोरणांतच. राज्य टिकून राहावें म्हणून मोठमोठ्या पगाराचे लष्करी अधिकारी इकडे आणण्याइतका पैसा ब्रिटिश सरकारकडे आहे, राज्यशकट सुव्यवस्थित चालावा म्हणून लठ्ठ पगाराचे आय्. सी. एस् अधिकारी पोसण्याइतकें द्रव्य ह्या सरकारकडे आहे. परंतु आमच्या तरुणांचा सर्वांगीण विकास व्हावा, संशोधनाची आवड त्यांच्यांत निर्माण व्हावी, श्रेष्ठ शिक्षकांचा सहवास त्यांना लाभावा म्हणून मात्र पैसा खर्च करण्याची ह्या सरकारची दानत नाहीं. आणि असा पक्षपात जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत आमचीं विद्यापीठें खऱ्या अर्थानें विद्येचीं पीठें म्हणून कार्यक्षम होणारच नाहींत हें ह्या सरकारनें खास लक्षांत ठेवावें ! " भारतांतील विद्यापीठांचे दोष अशा निर्दयतेनें जगजाहीर करीत असतांनाच त्यांचें अंत:करण तिळतिळ तुटत होतें आणि केवळ विध्वंसनात्मक टीका करण्यापेक्षां विधायकरीत्या विद्यापीठांच्या अंतरंगांत समाजयुक्त क्रांति घडवून आणावी असे विचार त्यांच्या डोक्यांत डोकावूं लागले होते. बनारस विद्यापीठाची हीच खरी ' गंगोत्री. ' वेद आणि वेदकालीन समाजरचना ह्यांबद्दल त्यांना एक विशेषच आत्मीयता वाटत असे. त्यामुळें भारताचें वैशिष्ट्य कायम ठेवून आणि सांस्कृतिक पातळी पूर्वीसारखीच उंचावून विद्यापीठांत कशी सुधारणा करतां